

◀◀उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांविरोधात डिजिटल स्ट्राइक ◀◀ नाशिक आज

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी



◀◀ द्वारका-नाशिकरोड उड्डाणपुलाला मेट्रोचा 'मेगा ब्लॉक' ◀◀ नाशिक आज

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : २१० ■ नाशिक, शनिवार, दि. २६ एप्रिल २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा

## महत्त्वाचे ▶▶▶▶

### अमित शहांकडून बैठकांचा सपाटा

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्यानंतर गृहमंत्री अमित शहा यांनी बैठकांचा सपाटा लावला आहे. शहा यांनी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसोबत संवाद साधला. सर्व मुख्यमंत्र्यांना राज्यातल्या पाकिस्तानी नागरिकांची ओळख पटवण्याचे निर्देश दिले. यादी मिळाल्यानंतर पाकिस्तानी नागरिकांना बाहेर काढा, अशा सूचना त्यांनी दिल्या. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर आणि जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांच्यासोबत स्वतंत्र बैठक घेतली. दुसरीकडे उत्तर कश्मीरमध्ये भारताच्या राफेल विमानांच्या रात्रभर घिरट्या सुरू आहेत. राजस्थान सीमेवरच्या बीएसएफ फोर्सला सतर्कतेचे आदेश देण्यात आले.

### रत्नागिरीत पांढऱ्या रंगाचा बिबट्या

**रत्नागिरी :** रत्नागिरी जिल्ह्यात काजू लागवडीसाठी झाडे तोडण्याचे काम सुरू असताना मजुरांना बिबट्याची दोन पिल्ले दिसली. त्यातील एक पिल्लू पांढऱ्या रंगाचे आढळून आले आहे. सामान्यतः बिबट्याचा रंग पिवळसर किंवा हलका पिवळा रंगाचा असतो, ज्यावर गडद रंगाचे रोझेट्स (गुलाबासारखे ठिपके) असतात. काही बिबट्यांमध्ये, रंग गडद लालसर-नारंगी किंवा अगदी काळाही असू शकतो. पण रत्नागिरीत आढळलेला बिबट्या पांढरा आहे. अशा रंगाचा बिबट्या बर्फाळ प्रदेशात आढळतो. असे असले तरी हा बिबट्या स्नो लेपर्ड नाही. महाराष्ट्रात पहिल्यांदाच अशा रंगाचे पिल्लू आढळून आल्याने वन्यप्रेमींच्या मनात उत्सुकता आहे.

### राज्यात पावसासह गारपिटीचा इशारा

**मुंबई :** महाराष्ट्रभर नागरिकांना सध्या तीव्र उन्हाचा सामना करावा लागत आहे. अशातच राज्यात पुढील चार दिवस मिश्र स्वरूपाचे वातावरण राहणार असल्याची माहिती भारतीय हवामान विभागाने दिली. विदर्भात २७ आणि २८ एप्रिलला काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे. अकोला आणि चंद्रपूरमध्येच उष्णतेच्या लाटेचा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर आता गारपिटीचाही अंदाज आहे. ज्यासाठी हवामान विभागाने आता चंद्रपूर आणि गडचिरोलीसाठी २७ एप्रिलला ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. मराठवाड्यात आणि मध्य महाराष्ट्रात देखील मिश्र वातावरण असणार असून, गडगडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. दक्षिण कोकणात गडगडाटासह पाऊस येण्याची शक्यता आहे.

### इस्रोचे माजी अध्यक्ष कस्तुरीरंगन यांचे निधन

**नवी दिल्ली :** भारतीय अंतराळ संशोधन संघटनेत (इस्रो) महत्त्वपूर्ण योगदान देणारे आणि भारताला विज्ञानाच्या क्षेत्रात नवीन उंचीवर नेणारे शास्त्रज्ञ यांचे निधन झाले आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे माजी अध्यक्ष के. कस्तुरीरंगन यांचे शुक्रवारी बेंगळुरू येथे निधन झाले. इस्रोचे माजी प्रमुख हे महत्त्वाकांक्षी नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) तयार करणाऱ्या मसुदा समितीचे अध्यक्ष होते. ते ८४ वर्षांचे होते आणि त्यांच्या पश्चात दोन मुले आहेत, असे कुटुंबातील सूत्रांनी सांगितले. गेल्या काही महिन्यांपासून ते वयाशी संबंधित आजारांनी ग्रस्त होते. आज सकाळी त्यांचे बेंगळुरू येथील निवासस्थानी निधन झाले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यांचे पार्थिव २७ एप्रिल रोजी रमण संशोधन संस्थेत (आरआरआय) सार्वजनिक दर्शनासाठी ठेवण्यात येईल.

# मदतकार्यावरून श्रेयवाद रंगला

## पक्षाकडून चार विमानांची सोय केल्याचा शिवसेनेचा दावा

**मुंबई : पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर काश्मीरमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांना परत आणण्यावरून सत्ताधारी महायुतीतील भाजप व एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेमध्ये श्रेयवाद सुरू झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्विट करत आतापर्यंत तीन विशेष विमानांनी पर्यटकांना सुखरूप आणण्यात आल्याची माहिती दिली होती. दुसरीकडे शिवसेनेने दावा केला आहे की, त्यांच्या पक्षाकडून ४ विमानांची सोय करण्यात आली. ज्यामधून आतापर्यंत ५२० पर्यटकांना सुखरूप परत आणण्यात आले आहे.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या अधिकृत एक्स हँडलवर माहिती देण्यात आली की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार राज्य सरकारने आयोजित केलेल्या विशेष विमानांची व्यवस्था केली जात आहे. आतापर्यंत ५०० पर्यटकांना राज्यात परत आणण्यात आले आहे. शिवसेना मात्र उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना याचे श्रेय देत आहे. शिवसेनेच्या नेत्याचे म्हणणे आहे की, ५२० पर्यटकांच्या विमानाचा खर्च शिवसेनेने उचलला आहे. खुद्द एकनाथ शिंदेंनी या मदतकार्यात लक्ष घातले आहे. यातच मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयीन निवेदनात नमूद करण्यात आले की, शुक्रवारी २३७ पर्यटकांची आणखी एक तुकडी महाराष्ट्रात दाखल होणार आहे. फडणवीस यांनी गुरुवारी कॅबिनेट मंत्री गिरीश महाजन /-...४



### आदिलच्या कुटुंबास शिंदेंकडून ५ लाखांची मदत

पर्यटकांवर हल्ला होत असताना स्वतःच्या जीवाची पर्वा न करता पर्यटकांच्या रक्षणासाठी धावून जाणारा सय्यद आदिल हुसेन शाह या अवघ्या २० वर्षांच्या स्थानिक युवकाचा मृत्यू झाला. माणुसकी दाखवत धाडसाने दहशतवाद्यांना सामोरे जाणाऱ्या सय्यदच्या कुटुंबीयांना राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वैयक्तिक पाच लाख रुपयांची मदत केली. पहलगाम येथे मदतीसाठी गेलेले शिवसेना कार्यकर्ते आणि सरहद संस्थेचे पदाधिकारी यांच्या माध्यमातून सय्यदच्या कुटुंबीयांना धनादेश देण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सय्यदच्या कुटुंबीयांशी संवाद साधत त्याचे हौतात्म्य वाया जाणार नाही, अशा शब्दात सांत्वन केले. तसेच त्यांच्या कुटुंबाचे मोडकळीस आलेले घर नव्याने बांधून देण्यासाठी मदत करू, अशी ग्वाहीही दिली.

### बिबट्याच्या हल्ल्यात तरुणीचा मृत्यू

**दिंडोरी : प्रतिनिधी**



तालुक्यातील वनारवाडी शिवारात घास कापण्यासाठी गेलेल्या पायल राजेंद्र चव्हाण या २० वर्षीय महाविद्यालयीन युवतीचा बिबट्याने केलेल्या हल्ल्यात मृत्यू झाला.

नाशिक-कळवण रस्त्याजवळ वाघाड कॅनॉललगत असलेल्या राजेंद्र चव्हाण यांच्या वस्तीवर त्यांची मुलगी पायल ही सायंकाळी गुरांना घास कापण्यासाठी गेली असता, बिबट्याने तिच्यावर हल्ला केला. नातेवाइकांनी तातडीने धाव घेत बिबट्याला पिटाळून लावले, मात्र बिबट्याच्या हल्ल्यात पायल गंभीर जखमी झाली. तिला तत्काळ दिंडोरी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. उपचारांदरम्यान तिचा मृत्यू झाला. या घटनेनंतर नागरिकांनी हळहळ व्यक्त करत वनविभागावर रोष व्यक्त केला. परिसरात सातत्याने बिबट्याचे दर्शन होत जनावरांवर हल्ले होत /-...४



## मालेगावला ईडी, प्राप्तिकर विभागाचे नऊ ठिकाणी छापे

**मनमाड : प्रतिनिधी** मालेगाव महापालिकेतील जन्म-मृत्यू दाखले प्रकरणात अटकेत असलेले कर्मचारी तव्वाब शेख व गजाला परवीन यांच्या घरांसह शहरातील वेगवेगळ्या भागात ९ ठिकाणी ईडी व प्राप्तिकर विभागाने संयुक्त छापेमारी केली. काल शुक्रवारी सकाळीच ईडीचे पथक दाखल झाले होते. दुपारपर्यंत घरांची झाडाझडती घेण्यात आली. या झाडाझडतीत नेमके काय हाती लागले याचा तपशील मात्र समजला नसला तरी काही कागदपत्रे पथकाने जप्त केल्याचे सांगितले जात आहे. भाजप नेते किरीट /-...४

### एक हजार बांगलादेशींचे पलायन?

किरीट सोमय्या यांनी मालेगाव शहरातून जवळपास १ हजार बांगलादेशी नागरिक पळून गेल्याचे पत्रकार परिषदेत सांगितले होते. जर असे घडले असेल तर राज्य सरकार व केंद्र सरकारचे गृहखाते यांचे हे अपयश आहे, असे मालेगावमधील स्थानिक नेत्यांनी म्हटले आहे. केवळ मालेगाव शहराला बदनामी करण्यासाठी हे सर्व सुरू असल्याचा आरोपदेखील स्थानिक नेत्यांनी केला आहे.

# दहशतवाद मोडला म्हणणाऱ्या सरकारमध्ये कुठेतरी कमतरता

## दहशतवादी हल्ल्यावर पवारांची पहिली प्रतिक्रिया

**मुंबई :** गेले काही दिवस सरकारतर्फे सतत सांगितले जात होते की, आम्ही दहशतवाद मोडून काढला आहे. आता काही चिंता नाही. असे होत असेल तर आनंद आहे. पण घडलेली घटना बघितल्यानंतर कुठे ना कुठे कमतरता आहे हे स्पष्ट आहे. ही कमतरता सरकारने घालवायला हवी. सरकारने अधिक गांभीर्याने घ्यावे. त्यांनी तातडीने पावले टाकावीत. काही कामात आमचे सहकार्य राहील, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिली आहे.

काश्मीरमधील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर शरदचंद्र पवार यांनी पहिल्यांदा प्रतिक्रिया दिली आहे.



ते म्हणाले, काश्मीरमध्ये जे झाले त्या प्रश्नाकडे सगळ्या देशवासीयांनी एका विचाराने सरकारसोबत राहिले पाहिजे. देशाच्या विरुद्ध कोणी असे निर्णय घेत असेल तर तिथे राजकारण करायचे नसते. सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली. त्यामध्ये आमच्या पक्षातर्फे सुप्रिया सुळे उपस्थित होत्या. इंटेलिजन्स फेल्युअर सरळ दिसत आहे. पहलगाम हे त्यातल्या त्यात अधिक सुरक्षित आहे. दोन-तीन महिन्यांपूर्वीच मी तिथे जाऊन आलो. सातत्याने /-...४

### पीडितांच्या नातेवाइकांना भेटा : फडणवीस

शरद पवारांच्या या वक्तव्यावर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शरद पवार काय म्हणाले ते मी ऐकले नाही. पण ज्यांचे नातेवाईक मारले गेले, जे स्वतः त्या ठिकाणी होते. ते काय म्हणाले मी ऐकले आहे. पवार साहेबांचे ते जर मत असेल तर त्यांनी ते जाऊन ऐकावे.

### हॉटेल, गाडीमालकाने पैसेही घेतले नाही : सिंह

**नवी दिल्ली :** पहलगामध्ये हल्ल्यावेळी दहशतवाद्यांकडून उच्चारलेल्या शब्दांमुळे देशामध्ये उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. यानंतर धर्म पुछा, जाती नही, असे म्हणत स्थानिक काश्मिरी लोकांना टार्गेट करण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र, प्रत्यक्षदर्शी अमरेंद्र कुमार सिंह यांनी केलेल्या ट्विटमुळे धर्मांधांना चपराक बसली आहे. अमरेंद्र कुमार सिंह सपत्नीक काश्मीर पर्यटनासाठी गेले होते आणि त्यांनी जो काही रक्तपात बैसरन व्हॅलीमध्ये झाला तो त्यांनी प्रत्यक्ष पाहिला. स्थानिक लोकांनी कशा पद्धतीने मदत केली याबाबत त्यांनी सांगितले आहे. मात्र, ज्या ठिकाणी हॉटेलवाल्यांनी पेमेंट घेतले नाही, गाडीवाल्यांनी पैसे घेतले नाहीत, ड्रायव्हरसुद्धा रडत होता. जबरदस्ती केल्यानंतर त्याने टिप्स घेतली. मात्र, त्याचवेळी श्रीनगर ते दिल्ली विमान तिकीट ३८ हजार झाले होते, अशा शब्दात त्यांनी संताप व्यक्त केला.

## आदिल गुरी, आशिफ शेखची घरे उडवली

**नवी दिल्ली :** पहलगाम हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने शोधमोहीम अधिक तीव्र केली आहे. पहलगाम हल्ल्यात दहशतवादी आसिफ शेख आणि आदिल गुरी यांची नावेही समोर आली आहेत. पोलिस आसिफ आणि आदिलच्या घरी शोधमोहीम राबवण्यासाठी गेले होते. यादरम्यान पोलिसांना संशयास्पद वाटले. त्यानंतर लष्कर-ए-तोयबाचा दहशतवादी आदिल ठोकर, ज्याला आदिल गुरी म्हणूनही ओळखले जाते, त्याचे घर पाडण्यात आले, असे अधिकाऱ्यांनी शुक्रवारी (दि.२५) सांगितले.

जम्मू आणि काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील बिजबेहरा ब्लॉकमधील गुरी गावातील रहिवासी आदिल गुरी हा पहलगाम हल्ल्यात सहभागी असल्याचे मानले जाते. त्याला मोस्ट वॉन्टेड घोषित करण्यात आले आहे आणि



अनंतनाग पोलिसांनी त्याच्या अटकेसाठी कोणत्याही विशिष्ट माहितीसाठी २० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. आदिल २०१८ मध्ये बेकायदेशीरपणे पाकिस्तानला गेला होता, जिथे त्याने दहशतवादी प्रशिक्षण घेतल्याचे वृत्त आहे. लष्कर-ए-तोयबाचा दहशतवादी आदिल ठोकर, ज्याला आदिल गुरी म्हणूनही ओळखले जाते, तो बिजबेहरा येथील गुरी येथील रहिवासी आहे. त्याचे घर उद्ध्वस्त करण्यात आले आहे. /-...४

## सिंहस्थ प्राधिकरण स्थापनेच्या प्रक्रियेला वेग

### उपमुख्यमंत्री शिंदे यांना आराखडा सादर



**नाशिक : प्रतिनिधी** प्रयागराजच्या धर्तीवर सिंहस्थ प्राधिकरण स्थापण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यानुसार, प्राधिकरण स्थापनेच्या प्रक्रियेला वेग आला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्रालयात बैठक घेत प्रयागराज आणि उज्जैनच्या धर्तीवर नाशकातही सिंहस्थ प्राधिकरण स्थापण्यात येणार असून, त्यासाठी आयएएस अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात येणार असल्याचे म्हटले.

या बैठकीला पालक सचिव एकनाथ डवले उपस्थित होते. तर विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, मनपा आयुक्त मनीषा खत्री यांची ऑनलाइन उपस्थिती होती. सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर नाशिकचे पथक प्रयागराज येथील महाकुंभाची माहिती घेण्यासाठी पाठविले होते. या पथकाने केलेल्या सूचना व त्याअनुषंगाने सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली. त्यानुसार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाशिकमध्ये /-...४

## इतिहास माहिती नसताना स्वातंत्र्यसैनिकांबाबत बोलू नका

### सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधींना फटकारले

**नवी दिल्ली :** स्वातंत्र्यवीर सावरकर अवमान प्रकरणात लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरुद्ध लखनौ न्यायालयाने काढलेल्या समन्सला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली. तसेच तुम्हाला इतिहास माहीत असता तर तुम्ही सावरकरांबद्दल असे बेताल वक्तव्य केले नसते. भविष्यात पुन्हा असे विधान केले तर न्यायालय त्या विधानाची दखल घेईल, असा इशाराही दिला आहे.

सुमारे अडीच वर्षांपूर्वी १७



डिसेंबर २०२२ रोजी भारत जोडो यात्रेदरम्यान, राहुल गांधी यांनी अकोल्यात सावरकरांबद्दल एक विधान केले होते. त्यांनी सावरकरांचा उल्लेख ब्रिटिशांचा सेवक असा केला होता, त्यांना ब्रिटिश सरकारकडून पेन्शन मिळत असे, असे म्हटले होते. याप्रकरणी अलाहाबाद उच्च न्यायालयाने समन्स रद्द करण्यास नकार दिला होता. यानंतर राहुल गांधींनी सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले होते. यावर झालेल्या सुनावणीदरम्यान या समन्सला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती देत राहुल गांधी यांना फटकारले आहे. तुम्ही महाराष्ट्रात असे विधान केले. तिथे लोक त्यांची पूजा करतात. राहुल गांधी स्वातंत्र्यसैनिकांविरुद्ध वाईट बोलू शकत नाही. तुमच्या आजीनेही सावरकरांचे कौतुक /-...४

## समाजात फूट पाडण्याचा दहशतवाद्यांचा उद्देश

### राहुल गांधींनी साधला जखमींशी संवाद

**श्रीनगर :** पहलगाममध्ये जे घडले त्यामागे समाजात फूट पाडणे, भावाभावांत लढाई लावणे हाच उद्देश आहे. पण दहशतवादी जे करण्याचा प्रयत्न करत होते, त्याचा पराभव करण्यासाठी प्रत्येक भारतीयाने एकजूट राहणे, एकत्र उभे राहणे महत्त्वाचे आहे, असे लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सांगितले.

राहुल गांधी हे शुक्रवारी (दि. २५) श्रीनगरच्या दौऱ्यावर होते. यादरम्यान त्यांनी जम्मू आणि काश्मीरच्या मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. दहशतवादी हल्ल्यातील पीडित लोकांशी संवाद साधला. राहुल गांधी माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले की, जम्मू आणि काश्मीरच्या संपूर्ण लोकांनी या भयानक कृत्याचा निषेध केला आहे आणि त्यांनी देशाला पूर्ण पाठिंबा दिला आहे. आम्ही सरकारसोबत बैठक घेतली आणि सरकार जे काही करू इच्छिते, त्याला आमचा पाठिंबा राहिल. दरम्यान, राहुल गांधींनी जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला आणि उपराज्यपालांची भेट घेतली. तेथील परिस्थितीचा आढावा घेतला आणि त्यांच्याशी चर्चाही केली.

# नाशिककरांची वाट खड्ड्यांतूनच! पुन्हा रस्ते खोदणार

## सिंहस्थासाठी चार हजार सीसीटीव्ही कॅमेरे लागणार

**नाशिक : प्रतिनिधी** दोन वर्षांनी सिंहस्थ कुंभमेळा होत असून, यावेळी एक कोटी भाविक नाशिकमध्ये येण्याची शक्यता आहे. दरम्यान, प्रयागराज येथील कुंभमेळ्यात भाविकांची संख्या लक्षात घेऊन राज्य व केंद्र शासनाचे त्यामुळे नाशिकमध्ये विशेष लक्ष असणार आहे. गर्दीच्यावेळी कुठलीही अनुचित घटना घडू नये यासाठी स्मार्ट सिटीच्या माध्यमातून तब्बल चार हजार सीसीटीव्ही कॅमेरे विविध भागात लावणार आहे. या कॅमेऱ्यांच्या केबलसाठी रस्ते खोदले जाणार असल्याने नाशिककरांना पुन्हा एकदा खड्ड्यांना सामोरे जावे लागणार आहे.

याआधी गॅस कंपनीकडून पाइपलाइन टाकण्यासाठी, बीएसएनएल व इतर मोबाइल कंपन्यांकडून केबल टाकण्यासाठी शहरातील रस्ते फोडण्याचे आले. अद्यापही हे काम सुरू आहे. विशेष म्हणजे पालिकेच्या बांधकाम विभागाने नुकतेच बांधकाम केलेले सिमेंट काँक्रीटचे, डांबराचे रस्ते खोदण्यात आले. त्यामुळे खड्ड्यांतून प्रवास करताना वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. याविरोधात नागरिकांनी आंदोलने करून संताप व्यक्त केला आहे. पावसाळ्यात तर खड्ड्यांतून मार्गक्रमण करताना अपघाताच्या घटना होऊन वाहनधारक जखमी झाले आहेत. मागील दीड-दोन वर्षापासून नाशिककरांना खड्ड्यांचा अनुभव येतो आहे. असे असताना आता पुन्हा चार हजार सीसीटीव्ही बसवण्यासाठी चांगले रस्ते खोदले जाणार आहे.

स्मार्ट सिटी लवकरच केबल टाकण्यासाठी निविदा काढणार आहे. ते पाहता नाशिककरांना खड्ड्यांतूनच वाट काढून कसरत करावी लागणार आहे. कुंभमेळ्यात गर्दी नियंत्रण व सुरक्षा हा महत्त्वाचा मुद्दा ठरेल. त्यासाठी शहरात तब्बल चार हजार सीसीटीव्ही बसवण्याचे नियोजन आहे. सीसीटीव्हीद्वारे सर्व नियंत्रण केले जाईल. /-...४



> सिंहस्थ कुंभमेळ्यात सुरक्षेच्या दृष्टीने शहरात चार हजार सीसीटीव्ही बसवले जाणार आहे. लवकरच केवल टाकण्यासाठी त्यांच्याकडून निविदा काढली जाणार आहे. सदर काम स्मार्ट सिटीकडून केले जाणार आहे.
>
> **-करिष्मा नायर,** अतिरिक्त आयुक्त, मनपा

## आळंदी देवस्थान विश्वस्तपदी प्रथमच एका महिलेला मान

### रोहिणी पवार यांनी इतिहास रचला

**पुणे :** संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदी देवस्थानच्या विश्वस्तपदी प्रथमच एका महिलेची निवड करण्यात आली आहे. ॲड. रोहिणी पवार यांनी पहिल्या महिला विश्वस्त होण्याचा मान मिळवत इतिहास रचला आहे. झी टॉकीजच्या गजर कीर्तनाचा आणि बिग बॉस फेम पुरुषोत्तम महाराज पाटील तसेच चैतन्य महाराज कबीर लोंढे यांचीही विश्वस्तपदी निवड झाली आहे. देवस्थान कमिटीच्या एकूण सहा विश्वस्तांपैकी तीन जागा रिक्त होत्या. या जागांवर ॲड. पवार, पाटील आणि लोंढे यांची निवड झाली. यापूर्वी ॲड. राजेंद्र उमाप, डॉ. भावार्थ देखणे आणि योगी निरंजनाथ हे विश्वस्त म्हणून कार्यरत होते. दोन दिवसांपूर्वीच उच्च न्यायालयाने देवस्थान कमिटीमध्ये महिला विश्वस्त निवडीसंदर्भातील रिट याचिका फेटाळली होती. त्यामुळे महिला विश्वस्त निवडीची शक्यता धूसर झाली होती. मात्र, जिल्हा न्यायाधीशांच्या निर्णयाने अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाली. ॲड. रोहिणी पवार या कायदेतज्ज्ञ असून, सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रातील त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. आळंदीतील नागरिकांचा /-...४

## महत्त्वाचे



### मडकीजांब-इंदोरे शिवरस्ता निकृष्ट; रस्त्यावर खड्डे पडण्यास सुरुवात

**दिंडोरी :** मडकीजांब-इंदोरे शिवरस्त्याचे काम साधारण गेल्या पंधरा दिवसांपूर्वी सुरू करण्यात आले. या रस्त्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा आरोप मडकीजांब सरपंच रोहिणी मोरे, गोकुळ वडजे यांनी केला आहे. या रस्ताकामाच्या अंदाजपत्रकाची मागणी वारंवार करूनही देण्यात आले नाही. रस्ताकामाबाबत माहिती देणारा कुठलाही फलक लावण्यात आला नाही. रस्ताकामाचा दर्जा इतका निकृष्ट आहे की, तो मोठ्या प्रमाणावर फुटण्यास सुरुवात झाली आहे. सदर रस्ताकामाची दर्जा तपासणी तातडीने करावी. कामाच्या दर्जात सुधारणा होऊन खालचे थर दुरुस्त केल्याशिवाय वरील थर टाकू न देण्याची भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे. तसेच संघटितपणे फसवणूक करून ग्रामस्थांवर अन्याय करणारे ठेकेदार, अधिकारी यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावे आणि ग्रामस्थांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली.




### करवा कंपनीतर्फे इंटरॲक्टिव्ह पॅनल भेट

**मुकणे :** इगतपुरी तालुक्यातील बांडेवाडी जिल्हा परिषद मॉडेल स्कूल येथे करवा कंपनीतर्फे शाळेला इंटरॲक्टिव्ह पॅनल देण्यात आले. इंटरॲक्टिव्ह पॅनल मिळवून देण्यासाठी व कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी जानोरी गावातील शिक्षणप्रेमी मंगेश भोर यांनी प्रयत्न केले. याप्रसंगी कमर्शियल हेड परफेक्ट कंटेनर्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे कमर्शियल हेड संजय पिंगळे, लविना शेंडगे, अनिता सावंत, रोशन पाटील, अतुल वजे, नागेश राठोड, पराशर, बाजार समितीचे माजी संचालक तुकाराम वारघडे, तुकाराम भोर आदींच्या उपस्थितीत पॅनलचा उद्घाटन सोहळा पार पडला. शाळेच्या प्रगतीचा लेखाजोखा शाळेच्या मुख्याध्यापिका गीतांजली परदेशी यांनी मांडलो. शाळेतर्फे सर्वांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी गावातील सर्व ग्रामस्थ, महिला, शाळा व्यवस्थापन अध्यक्ष व सर्व सदस्य तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.



### निफाड डॉक्टर्स असोसिएशनकडून निषेध

**निफाड :** जम्मू-काश्मीर येथील पहलगाम येथील पर्यटकांवर हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांना कठोर शिक्षा व्हावी व त्यांच्या 'आकांना' कायमचा धडा शिकविला जावा, अशा आशयाचे निवेदन निफाड डॉक्टर्स असोसिएशनतर्फे तहसीलदार विशाल नाईकवाडे यांना देण्यात आले. याप्रसंगी निफाड तालुका डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. उत्तमराव डेर्ले, उपाध्यक्ष रोहित धोक्रट, विलास नाठे, रूपेश वाघ, सुनील कापसे, अरुण कातकाडे, अमोल पवार, मकरंद कुलकर्णी, सीमा डेर्ले, सचिन ढेमसे हे उपस्थित होते.




### सकल हिंदू समाजातर्फे मशालज्योत यात्रा

**अभोणा :** काश्मीरच्या पहलगाममध्ये अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ अभोण्यात सकल हिंदू समाजबांधवांतर्फे शांती मशाल ज्योत यात्रा काढून हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. भारत सरकारने कठोर पाऊल उचलावे. अतिरेक्यांसह त्यांच्या पाठीराख्यांचा त्वरित खात्मा करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या असुरी कृत्याचा अभोणा सकल हिंदू समाजबांधवांतर्फे जाहीर निषेध करण्यात आला.

### बंद घरातून रोख रक्कम, दागिन्यांची चोरी

**सटाणा :** शहरातील चौगाव रोड येथील सप्तशृंगी कॉलनीत बंद घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा सुमारे तीन लाख चोवीस हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली. नरेंद्र मोरे हे घराला कुलूप लावून कुटुंबासमवेत आघार येथे गेले होते. घरावर चोरट्यांनी पाळत ठेवत घरी कुणी नसल्याचे पाहून दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. लोखंडी कपाटाचे लॉकर तोडून त्यामध्ये ठेवलेली अडीच तोळे सोन्याची पोत, सोन्याचे कॉइन, अंगठी व दुसऱ्या रूममध्ये कपाटात ठेवलेली रोख रक्कम दीड लाख रुपये, असा एकूण तीन लाख चोवीस हजारांचा ऐवज चोरून नेला आहे. याप्रकरणी सटाणा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला उपनिरीक्षक अतुल बोरसे तपास करीत आहेत.

### चांदवडला आज १२ वाजेपर्यंत बंदची हाक

**चांदवड :** पहलगाम येथे झालेल्या कथित इस्लामिक दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ सकल हिंदू समाज चांदवड तालुका यांच्या वतीने आज, शनिवार दि. २६ एप्रिल २०२५ रोजी चांदवड शहरात निषेध आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. शनिवारी सकाळी ९ वाजता रंगमहाल येथून आंदोलनाला सुरुवात होणार असून, ते पोलीस स्टेशन चांदवडपर्यंत जातील. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर चांदवड शहरातील व्यवहार दुपारपर्यंत, म्हणजेच १२ वाजेपर्यंत बंद ठेवण्यात येणार आहे. सकल हिंदू समाज चांदवड तालुका यांनी शांततापूर्ण मार्गाने आपला निषेध व्यक्त करण्याचे आवाहन केले आहे. प्रशासनानेही आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक ती खबरदारी घेतली आहे.

# कांदा निर्यातीत १० टक्क्यांची घट

## केंद्र सरकारच्या अस्थिर धोरणाचा शेतकऱ्यांना फटका

**लासलगाव : वार्ताहर**

भारतातील कांदा निर्यातीमध्ये गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने घट होत असून, यावर्षी तब्बल १० टक्क्यांनी कांदा निर्यात घसरली आहे. अपेडाच्या आकडेवारीनुसार, एप्रिल २०२४ ते जानेवारी २०२५ या दहा महिन्यांच्या कालावधीत भारतातून ९ लाख ५३ हजार मेट्रिक टन कांद्याची निर्यात झाली. यामधून सुमारे ३४६७ कोटी रुपयांचे परकीय चलन देशाला मिळाले. तर याच कालावधीत मागील वर्षी, म्हणजे एप्रिल २०२३ ते जानेवारी २०२४ दरम्यान, १६ लाख ९९ हजार मेट्रिक टन कांद्याची निर्यात होऊन ३८३७ कोटींचा व्यवसाय झाला होता. यावरून सुमारे ३७० कोटी रुपयांची घट स्पष्टपणे जाणवते.

या घटामागे अनेक कारणे असून, त्यात केंद्र सरकारच्या अस्थिर निर्यात धोरणाचा मोठा वाटा आहे. जागतिक बाजारपेठेत मागणी असूनही केंद्र सरकारने वेळोवेळी कांद्याच्या निर्यातीवर बंदी घालणे, निर्यातशुल्क लावणे यामुळे निर्यातदार अडचणीत आले आहेत. विशेषतः बांगलादेश सरकारने कांदा आयातीवर शुल्क लावल्यामुळे त्याचा परिणाम भारताच्या निर्यातीवरही झाला आहे. कांदा हे पीक भारताला मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळवून देणारे असून, निर्यातीत सातत्य ठेवले गेले असते तर यामध्ये लक्षणीय वाढ होऊ शकली असती. मात्र, देशातील स्थानिक गरजा, महागाई नियंत्रण इत्यादी कारणास्तव केंद्र सरकारने निर्यातीवर नियंत्रण आणले आहे, ज्याचा फटका थेट शेतकऱ्यांना आणि व्यापाऱ्यांना बसला आहे.

नाशिक जिल्ह्यातील प्रमुख कांदा बाजारपेठांतील व्यापाऱ्यांनीही सरकारकडे निर्यात धोरणात स्थैर्य आणण्याची मागणी केली होती. यानंतर केंद्राने कांदा निर्यातीवर लावलेले निर्यातशुल्क शून्य करून दिलासा देण्याचा प्रयत्न केला, मात्र एवढे करूनदेखील निर्यातीला समाधानकारक चालना न मिळाल्याने कांदा निर्यातदार संघटनेकडून कांदा निर्यातीला प्रोत्साहन देण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.



**निर्यातशुल्क सूट ५ टक्क्यांपर्यंत वाढवावी**

निर्यात केलेल्या उत्पादनांवरील शुल्क आणि करांमध्ये सूट दर केवळ १.९% इतका आहे. मात्र, सरकारने हा दर ५ टक्क्यांपर्यंत वाढविल्यास भारतीय कांदा निर्यातदारांना जागतिक बाजारपेठेत अधिक सक्षमतेने स्पर्धा करता येईल. वाढता लॉजिस्टिक खर्च, बंदर शुल्क, वीजदर आणि अन्य पायाभूत सुविधांच्या वाढत्या किमतींचा भार हलका होण्यास मदत होईल. दरवाढ ही फक्त आर्थिक मदत नसून, भारताच्या कृषी उत्पादनांच्या जागतिक ओळखीला बळकटी देणारे पाऊल ठरू शकते.

**– विकास सिंह, उपाध्यक्ष**
फलोत्पादन उत्पादक, निर्यातदार संघटना, नाशिक

| | निर्यात आकडे | परकीय चलन |
|---|---|---|
| २०१८-१९ | २१.८३ लाख टन | ३४६८ कोटी |
| २०१९-२० | ११.४९ लाख टन | २३२० कोटी |
| २०२०-२१ | १५.७७ लाख टन | २८२६ कोटी |
| २०२१-२२ | १५.३७ लाख टन | ३४३२ कोटी |
| २०२२-२३ | २५.२५ लाख टन | ४५२२ कोटी |
| २०२३-२४ | १७.१७ लाख टन | ३९२२ कोटी |

> कांदा दरांमध्ये चढ-उतार आणि निर्यातीतील अनिश्चिततेमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे कांद्याच्या निर्यातीसाठी एक दीर्घकालीन आणि शाश्वत धोरण हवे. केंद्र सरकारने परदेशात जास्तीत जास्त कांदा निर्यात होण्यासाठी आता तत्काळ कांदा निर्यातीवर अनुदान द्यावे आणि शेतकऱ्यांच्या कांद्याचे दर वाढण्यासाठी सरकारने तत्काळ उपाययोजना कराव्यात.
>
> **– सचिन होळकर,** कृषीतज्ज्ञ, लासलगाव



# बिबट्याचा फेव्हरेट स्पॉट मनमाडचा शीख मळा

**मनमाड : प्रतिनिधी**

चार दिवसांपूर्वीच एक बिबट्या जेरबंद करण्यात वनविभागाला यश आले होते, तोच एक दिवस गॅप देऊन दुसरा बिबट्या आल्याची चर्चा परवा रात्री होती आणि काल रात्री पुन्हा एकदा बिबट्या मनमाड शहरातील गुरुद्वारामागील शीख मळ्यात घुसल्याचे अनेक नागरिकांनी बघितले.

सुरुवातीला ही अफवा आहे असेच वाटत होते, मात्र अनेकांनी त्याला बघितले आणि काहींनी तर फोटोदेखील काढले. यामुळे बिबट्याचा फेव्हरेट स्पॉट शीख मळा आहे की काय, असेच म्हणण्याची वेळ शहरातील नागरिकांवर आली आहे. रात्री गुरुद्वारामधील सेवेदार वनविभाग कर्मचारी पोलीस मनमाड शहरातील नागरिक यांनी त्याला शोधण्याचा प्रयत्न केला, मात्र बिबट्या कुठेही आढळून आला नाही. आता पुन्हा पिंजरा लावून बिबट्या जेरबंद करण्यासाठी प्रयत्न केले जात आहे.

बिबट्या आला, बिबट्या आला ही केवळ अफवा ठरत होती; मात्र मागील आठवड्याभरात शहरात दोनदा बिबट्याने दर्शन दिले आहे. एक जेरबंद करण्यात आला असूनही दुसरा बिबट्यादेखील आता पुन्हा एकदा शीख मळ्यात गेला आहे. याचे अनेक साक्षीदार आहेत. त्याला शोधण्यासाठी काल रात्री उशिरापर्यंत प्रयत्न करण्यात आले.

मात्र, बिबट्या काही आढळून आला नाही. आता या बिबट्याला पकडण्यासाठी पुन्हा एकदा पिंजरा लावण्यात आला असून, हा बिबट्या जेरबंद व्हावा, अशी सर्वसामान्य मनमाडकर जनतेची मागणी आहे. शहरातील आययुडीपी या भागात हा बिबट्या फिरत असून, यामुळे या परिसरात राहणारे नागरिक भीतीमध्ये आहे. या बिबट्याला लवकरात लवकर जेरबंद करा, अशी मागणी आता मनमाड शहरातील नागरिकांकडून केली जात आहे.

# देवळ्यात पाकिस्तानी झेंड्याला जोडे मारो आंदोलन

**देवळा : प्रतिनिधी**

पहलगाम येथे पर्यटकांवर अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा देवळ्यात भाजपतर्फे निषेध करण्यात आला. अतिरेक्यांना शासनाने जशास तसे उत्तर द्यावे तसेच त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येऊन देवळा पाचकंदीलजवळ सकल हिंदू समाज व भाजपाच्या कार्यकर्त्यांनी पाकिस्तानी झेंड्याला जोडे मारो आंदोलन करून जाहीर निषेध व्यक्त केला.

देवळा तहसीलदार डॉ. मिलिंद कुलकर्णी व पोलीस निरीक्षक सार्थक नेहेते यांना निवेदन देण्यात आले.




यावेळी भाजपाचे तालुकाध्यक्ष अतुल पवार, भाजप युवा मोर्चा तालुकाध्यक्ष योगेश आहेर, माजी शहराध्यक्ष विजय आहेर, जिल्हा नेते पवन अहिरराव, संजय मांडगे, दत्तात्रेय देवरे, विजय इंगळे, प्रमोद शेवाळकर, धनंजय आहेर, वैजनाथ देवरे, सतीश राणे, मर्चंट बँकेचे व्हा. चेअरमन डॉ. प्रशांत निकम, माजी नगरसेवक बाळासाहेब आहेर, विष्णू शेवाळे, विलास आढाव, श्यामराव सूर्यवंशी उपस्थित होते.



लासलगाव : येथे बारदान दुकानास लागलेली आग विझवताना श्री सिद्धवीर हनुमान मित्रमंडळाचे कार्यकर्ते. (छाया : समीर पठाण)

# लासलगाव येथे बारदान दुकानास आग

**लासलगाव : वार्ताहर**

लासलगाव बाजार समितीत शेतकरी निवास येथील बारदान दुकानास आग लागल्याची घटना शुक्रवारी (दि. २५) दुपारी घडली. आग लागताच बाजार समितीच्या आवारात शेतकऱ्यांची व स्थानिक नागरिकांची एकच धावपळ उडाली.

लासलगाव बाजार समितीत शेतकरी निवासच्या शॉपिंग सेंटरमध्ये लीलाधर विस्ते यांच्या मालकीचे बारदान दुकान आहे. या बारदान दुकानास शॉर्टसर्किटने आग लागल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. या आगीत अंदाजे आठ ते दहा लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. या घटनेची माहिती समजताच श्री सिद्धवीर हनुमान मित्रमंडळाचा अग्निशमन टँकर व लासलगाव बाजार समितीचा पाण्याचा टँकर घटनास्थळी तातडीने दाखल झाले. या अग्निशमन टँकरच्या पाण्याच्या प्रेशरच्या सहाय्याने आणि मंडळाच्या कार्यकर्त्यांनी जोरदार प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. जवळपास एक तास यासाठी अतोनात प्रयत्न करण्यात आले.

# लासलगावी पहलगाम हल्ल्याचा मुस्लिम समाजाकडून निषेध

**लासलगाव : वार्ताहर**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ भारतीय निरपराध पर्यटक आणि स्थानिक नागरिकांचा बळी गेला. या अमानुष हल्ल्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी लासलगाव येथील समस्त मुस्लिम समाजाच्या वतीने शुक्रवारच्या नमाजनंतर शहरातील जामा मशीद ते लासलगाव पोलीस ठाण्यापर्यंत मूक मोर्चा काढण्यात आला.




यावेळी मोर्चाच्या अग्रभागी भारतीय तिरंगा ध्वज फडकत होता तसेच मुस्लिम बांधवांनी पाकिस्तान मुर्दाबाद, दहशतवादी मुर्दाबादचे फलक हातात घेऊन या दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला व अशा घटनांना आळा घालण्यासाठी केंद्र शासनाने कडक पावले उचलावीत व संबंधित दोषींवर कठोर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन लासलगाव पोलीस ठाण्याचे सपोनि भास्करराव शिंदे यांना समस्त मुस्लिम समाजाच्या वतीने देण्यात आले. भारताचे नागरिक म्हणून आम्ही सर्वधर्मीय लोक एकत्र आहोत आणि अशा हिंसक कृत्य करणाऱ्यांना कठोर शासन व्हायला हवे, अशी मागणी मुस्लिम समाजाच्या प्रतिनिधींनी यावेळी बोलताना केली. यावेळी शहरातील समस्त मुस्लिम बांधव यांच्यासह हिंदू समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# नळजोडणीसाठी थकबाकी भरण्याची सक्ती नको : शेख

**मनमाड : प्रतिनिधी**



हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे करंजवण पाणीयोजना मनमाड शहरासाठी तयार करण्यात आली असून, या योजनेतून मनमाड शहराला पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. याच योजनेचा भाग म्हणून शहरातील प्रत्येक वॉर्डात नवीन पाइपलाइन टाकून त्यावर नवीन कनेक्शन जोडणी करण्यात येत आहे. मात्र, ही जोडणी करताना थकीत घरपट्टी व पाणीपट्टी सक्तीने वसुली करण्यात येत असून, सर्वच जण आर्थिक सक्षम नसल्याने टप्प्याटप्प्याने पैसे भरण्यासाठी मुदत द्यावी व सक्तीची वसुली करू नये, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शहर उपप्रमुख खालिद शेख यांनी पत्राद्वारे मुख्याधिकारी शेषराव चौधरी यांच्याकडे केली आहे.

साडेतीनशे कोटी रुपये खर्च करून करंजवण धरण ते मनमाड शहर थेट हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे करंजवण पाणीयोजना मंजूर करण्यात आली. या योजनेचे काम अंतिम टप्प्याकडे आले असून, मनमाड शहरातील प्रत्येक वॉर्डात नवीन पाइपलाइन टाकून त्यावरून कनेक्शन देण्याचे काम पालिकेच्या वतीने हाती घेण्यात आले आहे.

मात्र, हे नवीन कनेक्शन देताना पालिकेचे कर्मचारी घरपट्टी व पाणीपट्टी थकबाकीदारांना घरपट्टी व पाणीपट्टी भरण्यासाठी सक्ती करत आहे. शहरातील प्रत्येक नागरिकाची परिस्थिती ही चांगली नाही. अनेक गोरगरीब कुटुंबं सकाळी कामाला जातील तर संध्याकाळी खातील अशा परिस्थितीत आहे. अशा नागरिकांना घरपट्टी व पाणीपट्टी भरण्यासाठी सक्ती करू नये. उलट अशा नागरिकांना पालिकेने सवलत देऊन टप्प्याटप्प्याने पैसे भरण्यासाठी मदत द्यावी व त्यांना तत्काळ कनेक्शन जोडणी करून द्यावी, अशी विनंती पत्राद्वारे केली आहे.

### चांदवड तालुका सरपंचपदासाठी महिला आरक्षण सोडत जाहीर

**चांदवड : वार्ताहर**

चांदवड तालुक्यातील सरपंचपदाच्या महिला आरक्षणाची सोडत उपविभागीय अधिकारी कैलास कडलग यांच्या अध्यक्षतेखाली मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीत काढण्यात आली. सोडतीत जाहीर झालेल्या आरक्षणानुसार, अनुसूचित जाती महिलांसाठी देवरगाव, भडाणे आणि सोग्रस ही गावे आरक्षित झाली आहेत. तर, अनुसूचित जमाती महिलांसाठी डोंगरगाव, वाहेगावसाळ, चिंचोले, तळवाडे, दिघवद आणि हिरापूर या गावांमध्ये महिला सरपंच विराजमान होणार आहेत.नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलांसाठी तळेगावरोही, मेसनखेडे खु., वाघदर्डी, राजदेरवाडी, कोकणखेडे, दुगाव, बहादुरी, राहुड, वडाळीभोई, वाद आणि साळसाणे या गावांमध्ये आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. याव्यतिरिक्त, तालुक्यातील आसरखेडे, उर्धुळ, कळमदरे, कानमंडाळे, खडकओझर, गणूर, चिखलांबे, जोपूळ, डोणगाव, दहेगाव म., न्हावे, पन्हाळे, परसूल, पाटे, पिंपळणारे, पिंपळद, बोराळे, रायपूर, रेडगाव, वडनेरभैरव, विटावे, शिंदे, शिरसाणे आणि शेलू या प्रमुख गावांमध्ये सर्वसाधारण महिलांसाठी सरपंचपद आरक्षित झाले आहे.

# उमराळे - दिंडोरी रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य

## रस्ता दुरुस्तीची नागरिकांकडून मागणी

**दिंडोरी : प्रतिनिधी**

रस्त्याच्या दुरवस्थेचे चित्र सध्या उमराळे ते दिंडोरीदरम्यानच्या रस्त्यावर दिसून येत आहे, मात्र याबाबत संबंधित विभाग डोळेझाकपणाचे अवसान आणत असून, याचा परिणाम रस्त्याहून येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनधारकांवर होत आहे. याबाबत दिंडोरी ते उमराळे रस्ता दोन महिन्यांपूर्वी सुरू झाला व रस्त्याचे कामही सुरू झाले. मात्र, सद्यपरिस्थितीत रस्त्याची अतिशय बिकट अवस्था असून, रस्त्यावर खड्डे पडण्यास सुरुवात झाली असून, येथील रस्त्याचा पूर्णपणे बोजवारा उडाला आहे.

दिंडोरी ते उमराळेदरम्यानचा रस्ता वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात असून, या रस्त्याची अशी अवस्था तर इतर रस्त्याची कशी असणार हे न समजणारे आहे, असा प्रश्न येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनधारकांनी उपस्थित केला असून, उमराळे परिसरातील शेतकरी तसेच नागरिक दिंडोरी येथे आपल्या खासगी किंवा सरकारी कामानिमित्त ये-जा करीत असतात, मात्र रस्त्याच्या या झालेल्या दुरवस्थेच्या अवतारामुळे वाहनधारक वैतागले असून, रस्ता दुरुस्ती कधी होणार, असा प्रश्न विचारत आहे.

सदरील रस्त्यावर छोटे-मोठे खड्ड्यांनी परंपरा सुरू झाल्याने याचा त्रास वाहनधारकांना होत असून, रस्त्यावरील खड्डेही बुजविण्याची मागणी करण्यात आली असून, रस्त्याचे काम हे निकृष्ट दर्जाचे असल्याचे वाहनधारकांचे म्हणणे आहे. या रस्त्याची लवकरात लवकर दुरुस्ती करून रस्त्यावर पडलेले खड्डे हे पूर्णपणे डागडुजी करून भरून काढण्यात यावे.



**रस्त्यावर रस्ता की खड्डा**

दिंडोरी व उमराळेदरम्यान रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था झाली असून, रस्त्यात खड्डा की रस्ता, अशी अवस्था निर्माण झाली असून, याचा सर्वाधिक फटका हा वाहनधारकांना बसत असून, याबाबत संबंधित विभागाने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

**रस्ता होऊनही 'जैसे थे' परिस्थिती**

उमराळे ते दिंडोरी रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था झाल्याने रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरत असून, याचा परिणाम येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनधारकांवर होत आहे; मात्र याबाबत संबंधित विभाग उदासीनतेचे ढोंग घेत असून, सदरील रस्ता हा गेल्या काही महिन्यांपूर्वीच झाला होता. रस्त्याचे कामही चांगल्या दर्जाचे दिसून येत होते, मात्र सद्यपरिस्थितीत रस्त्याचे बारा-तेरा वाजले असून, रस्ता खचून गेला आहे व या रस्त्यास कोणीच वाली नाही हे दिसून येत असल्याचे वाहनधारकांचे म्हणणे आहे.

गांवकरी

■ नाशिक, शनिवार, दि. २६ एप्रिल २०२५



# पाणीटंचाईप्रश्नी अधिकाऱ्यांनी तातडीने प्रस्ताव द्यावे : ना. झिरवाळ

## पेठ तहसील कार्यालयात आढावा बैठक

**नाशिक : प्रतिनिधी**

पेठ तालुक्यात पाणीटंचाई निवारण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संवेदनशील राहावे. पाणीटंचाईचे प्रस्ताव तातडीने सादर करावेत, अशा सूचना राज्याचे अन्न व औषध प्रशासन व विशेष सहाय मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिल्या.

पेठ तालुक्यातील पाणीटंचाईबाबत मंत्री श्री. झिरवाळ यांनी काल दुपारी तहसील कार्यालयात आढावा बैठक घेतली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी दिंडोरीचे उपविभागीय अधिकारी आप्पासाहेब शिंदे, गटविकास अधिकारी श्री. सूर्यवंशी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, सरपंच, लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ आदी उपस्थित होते.

मंत्री श्री. झिरवाळ यांनी सांगितले की, पेठ तालुक्यातील काही गावांना एप्रिल, मे या दोन महिन्यांत पाणीटंचाईची जाणवते. टंचाई निवारणार्थ सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे. वीज वितरण कंपनीने पाणीपुरवठा योजनांना तातडीने वीज जोडणी द्यावी. टंचाई काळात पाणीपुरवठा योजनांचा वीजपुरवठा खंडित करू नये. जलजीवन मिशन अंतर्गत साकारण्यात येणाऱ्या पाणी योजनांच्या कामांना गती द्यावी, असेही निर्देश त्यांनी दिले.

गटविकास अधिकारी सूर्यवंशी यांनी सांगितले की, पेठ तालुक्यात सद्य:स्थितीत तीन टँकर सुरू असून, तीन गावांचे टँकरसाठी प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. तालुक्यातील टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पाणीटंचाई निवारण्यासाठी पुरेशा प्रमाणात निधीची उपलब्धता असल्याचे त्यांनी सांगितले.

# गुंगीचे औषध पाजून तीन मुलींवर अत्याचार

**नागपूर :** शहरात एक धक्कादायक घटनेने खळबळ उडाली आहे. पैशांच्या लालचाने तीन अल्पवयीन मुलींना फसवून त्यांच्यावर अत्याचार करणाऱ्या भोंदूबाबाचा किळसवाणा चेहरा उघड झाला आहे. मानकापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या या घटनेत अब्दुल कादिर उर्फ कादिलबाबा याने आपल्या साथीदारांसह मध्यरात्री नग्नपूजेचा बनाव रचला आणि मुलींवर लैंगिक अत्याचार केले.

या प्रकरणी पोलिसांनी भोंदूबाबासह पाच जणांना अटक केली असून, न्यायालयाने त्यांना २५ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडीत पाठवले आहे..कसा रचला गेला कट?पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अब्दुल कादिर उर्फ कादिलबाबा हा स्वत:ला आध्यात्मिक गुरू म्हणवून घेत होता. त्याने आपला मित्र आशीष, त्याची लिव्ह-इन पार्टनर आणि इतर दोन साथीदारांच्या मदतीने हा घृणास्पद कट रचला. रविवारी मध्यरात्री या टोळीने तीन गरीब कुटुंबातील अल्पवयीन मुलींना पैशांचा लालच दाखवला. ''कपडे काढा, नग्नपूजा करा, मी तुमच्यावर पैशांचा पाऊस पाडेन,'' असं भोंदूबाबाने मुलींना खोटं आश्वासन दिलं. यासाठी त्याने मुलींना गुंगीचं औषध पाजल्याचा संशय आहे, ज्यामुळे त्या बेशुद्धावस्थेत होत्या.

# विभागात ५० लाख ६८ हजार अर्ज निकाली

## आयुक्त चित्रा कुलकर्णी : लोकसेवा हक्क कायदा

**नाशिक : प्रतिनिधी**

'आपली सेवा-आमचे कर्तव्य' असे सांगणाऱ्या लोकसेवा हक्क कायद्याच्या अंमलबजावणीस सोमवार, २८ एप्रिल २०२५ रोजी दहा वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त २८ एप्रिल हा दिवस सेवा हक्क दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या दिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या कायद्यांतर्गत नाशिक विभागातील पाचही जिल्ह्यांत १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत विविध लोकसेवांसाठी एकूण ५५ लाख ४८ हजार ४८५ अर्ज प्राप्त झाले.

५१ लाख ३७ हजार ४७४ अर्ज निकाली काढण्यात आले. त्यापैकी ५० लाख ६८ हजार १३३ अर्ज निश्चित केलेल्या कालमर्यादेत निकाली काढण्यात आले, अशी माहिती लोकसेवा हक्क आयोगाच्या नाशिक विभागाच्या आयुक्त चित्रा कुलकर्णी यांनी दिली. नागरिकांना दैनंदिन जीवनात विविध दाखल्यांची आवश्यकता असते. कधी पाल्याच्या शालेय, महाविद्यालयीन प्रवेशासाठी उत्पन्न, अधिवास, नॉन क्रिमिलेअर, राष्ट्रीयत्व, शेतकरी, विवाह नोंदणी, दिव्यांग दाखला, जन्म- मृत्यू नोंद दाखल्यासह विविध दाखल्यांची आवश्यकता असते. त्यासाठी नागरिकांना विविध शासकीय कार्यालयांमध्ये जावे लागत असे. त्यात बराच कालावधी जात असे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागरिकांना आवश्यक सेवा ऑनलाइन आणि विहित केलेल्या कालावधीत उपलब्ध व्हाव्यात म्हणून सन २०१५ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम लागू केला. या अधिनियमाची अंमलबजावणी २८ एप्रिल २०१५ पासून सुरू झाली. या कायद्यांतर्गत 'आपले सरकार' पोर्टलवर आतापर्यंत ३८ विभागांच्या ९६९ सेवा ऑनलाइन उपलब्ध झाल्या आहेत.



महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायद्यामुळे शासनाच्या विविध विभागांकडून अधिसूचित केलेल्या लोकोपयोगी सेवा ठराविक मुदतीत प्राप्त करून घेण्याचा अधिकार नागरिकांना प्राप्त झाला आहे. या कायद्यामुळे वेळ व पैसा यांचा अपव्यय न होता विनासायास, निश्चित केलेल्या कालावधीत सेवा मिळविण्याचा हक्क प्राप्त झाला असून, मुदतीत सेवा प्राप्त न झाल्यास नागरिक संबंधित कार्यालयातील प्राधिकाऱ्यांकडे प्रथम व द्वितीय अपील करू शकतात.

**–श्रीमती चित्रा कुलकर्णी, आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग**

### इतके अर्ज निकाली

या कायद्यांतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यात १२ लाख १५ हजार २५, धुळे जिल्ह्यात ६ लाख ७५ हजार १४१, जळगाव जिल्ह्यात ११ लाख ६१ हजार ४२८, नंदुरबार जिल्ह्यात ४ लाख ७७ हजार ९६३, तर नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक १६ लाख ७ हजार ९१७ अर्ज ३१ मार्च २०२५ अखेर निकाली काढण्यात आले आहेत.

# मोबाइलचा डिस्प्ले फोडल्याच्या वादातून दोन तरुणांना चाकूने भोसकले

**शहापूर : प्रतिनिधी**

मोबाइलचा डिस्प्ले फोडल्याच्या वादातून दोन तरुणांना डोक्यात चाकूनं भोसकून माथेफिरुनं गंभीर जखमी केले.

या हल्लेखोराचा शांतीनगर पोलिसांनी ४८ तासात शोध घेऊन त्यास मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस रेल्वे स्थानकातून ताब्यात घेऊन बेड्या ठोकल्या आहेत. मेराज उर्फ पिंकी मेहमूद शाह असं अटक केलेल्या हल्लेखोराचं नाव आहे. खळबळजनक बाब म्हणजे जखमी झालेले दोन्ही तरुण भांडणात मध्यस्थी करत असतानाच त्यांच्यावर हल्लेखोर मेराजनं चाकू हल्ला केला.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भिवंडीतील शांतीनगर परिसरातील न्यू आझाद नगरमध्ये शेजारी राहणारा वैस अख्तर हुसैन अन्सारी (१९) याचा भाऊ अख्तर हुसैन अन्सारी हा घरासमोर पार्क केलेल्या दुचाकीवर बसून मोबाइल बघत असतानाच त्याचा शेजारी आरोपी मेराजनं त्याच्या मोबाइलवर हाताने जोरात झटका मारला. त्यामुळे अख्तरचा मोबाइल खाली पडून मोबाइलचा डिस्प्ले फुटला. त्यानंतर मोबाइल फोडल्याचा जाब आरोपी मेराजला विचारला असता त्याच रागातून आरोपीनं अख्तरला शिवीगाळीसह मारहाण करत असल्यानं वैसचे मित्र कैफ आणि इरफाननं भांडण सोडवण्यासाठी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याच वेळी आरोपी मेराजनं दोघांच्या डोक्यात चाकूहल्ला करत दोघांनाही गंभीर जखमी केलं. तसेच तक्रारदार वैस याची आई सईदावरही चाकूहल्ला करून तिलाही जखमी केलं.दरम्यान भांडणात मध्यस्थी करणारे कैफ आणि इरफान या दोघांना डोक्यात चाकू भोसकल्यानं दोघांची प्रकृती गंभीर आहे. त्या दोघांनाही मुंबईतील सायन रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं. वैस याच्या तक्रारीवरून आरोपी मेराजच्या विरोधात शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर पोलिसांची कुणकुण लागताच मेराज फरार झाला. दरम्यान या गंभीर गुन्ह्याच्या अनुषंगानं आरोपी मेराजचा शोध घेण्यासाठी वेगवेगळी पोलीस पथकं तयार करण्यात आली. त्यातच तपास पथकातील प्रशांत बर्वे, खबऱ्यामार्फत मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी मेराज हा २४ एप्रिल रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसनं दुसऱ्या राज्यात पलायन करणार असल्याचं समजलं. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकातील सहायक पोलीस निरीक्षक सुरेश चोपडे, उपनिरीक्षक रविंद्र आव्हाड, हवालदार रिझवान सय्यद, निलेश महाले, भूषण पाटील, दीपक सानप आदि पोलीस पथकानं छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथील आरपीएफ पोलिसांच्या मदतीनं मेराजच्या मुसक्या आवळून त्यास अटक केली. आरोपीला न्यायालयाने २६ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली.

# क्रेडाई नूतन कार्यकारिणीचा धोरणात्मक आराखडा

## सहासूत्री कार्यक्रमांवर भर देणार : गौरव ठक्कर

**नाशिक : प्रतिनिधी**

बांधकाम व्यावसायिकांची देशातील सर्वांत मोठी संस्था असलेल्या क्रेडाई नाशिक मेट्रोच्या २०२५-२७ साठीच्या नूतन कार्यकारिणीने अध्यक्ष गौरव ठक्कर यांच्या नेतृत्वाखाली पदभार स्वीकारला असून, येत्या २ वर्षांतील नियोजनाचा आराखडा त्यांनी सादर केला.

यानुसार आगामी दोन वर्षांत नावीन्य, मार्गदर्शन, भागीदारी, उत्तरदायित्व, सामाजिक बांधिलकी, बदल या सहा सूत्रांनुसार कामकाज करण्यात येणार असल्याचे ठक्कर यांनी सांगितले.

सहा सूत्री कार्यक्रम :

**नावीन्य :** रिअल इस्टेटसंबंधी अभ्यास दौरे व ज्ञानाचे आदानप्रदान, नेक्स्ट जनरेशन मार्केटिंग व ब्रॅन्डींग सेमिनार्स, बांधकामात आधुनिक तंत्रज्ञानाचा तसेच आकर्षक व टिकाऊ पर्यायांचा वापर, प्रॉपटेक स्टार्टअप्ससाठी धोरणात्मक सहकार्य, कौशल्य विकास व तांत्रिक बाबींसाठी प्रशिक्षण, सदस्यांमधील सहकार्यासाठी डिजिटल माध्यमांचा वापर.

**मार्गदर्शन :** युवा विकासकांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रम, शासकीय व इतर संस्थांसोबत भागीदारी, वैयक्तिक स्तरावर सल्लागार कक्ष

**भागीदारी :** आर्किटेक्टस व टाऊन प्लानिंग करणाऱ्या संस्थांसोबत सामंजस्य करार, बँका व गृहवित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांसोबत टायअप, प्रॉपटेक व कन्स्ट्रक्शन टेक स्टार्टअप्ससोबत सहकार्य, स्थानिक व राज्य पातळीवरील शासकीय संस्था,बिगर शासकीय (NGO) संस्थांसोबत सामाजिक व पर्यावरणीय बाबींसंबंधी सहकार्य, बांधकाम साहित्य पुरवठादार व विक्रेते यांच्यासाठी एकत्रित व्यासपीठ, व्यवसायाच्या प्रसिद्धीसाठी विविध प्रसारमाध्यमांशी धोरणात्मक सहकार्य

CREDAI NASHIK METRO An ISO - 9001 : 2015 Certified Association

**उत्तरदायित्व:** विकासकांशी पारदर्शी संवाद, नियमित आर्थिक अहवाल व ऑडिट, वादग्रस्त प्रकरणे सोडविण्यासाठी व अभिप्राय यासाठी स्वतंत्र विभाग

**सामाजिक बांधिलकी :** स्थानिकांच्या सहकार्याने नाशिकच्या सांस्कृतिक वैभवाची जपणूक, बांधकाम व्यवसायासंबंधी प्रशिक्षण कार्यक्रम, महिला व मुलांच्या सक्षमीकरणासाठी प्रकल्प राबविणे, वृक्षारोपण व स्वच्छता मोहीम, विकासकांकडून पायाभूत सुविधांसाठी योगदान, कामगार वर्गासाठी आरोग्य अभियान, परवडणाऱ्या घरांना प्राधान्य, आगामी कुंभमेळ्यासाठी नाशिकमध्ये २५ कोटी भाविक येण्यासाठी मार्केटिंग व संबंधितांना सहकार्य

**बदल :** क्रेडाईच्या कामकाजाचे व सभासदांना पुरवित असलेल्या सेवांचे डिजिटायझेशन, शहरी पायाभूत सुविधांना प्राधान्य देणे, पर्यावरणपूरक व टिकाऊ इमारती बांधण्यास प्राधान्य, धोरणात्मक व नियामक बाबींचे सुलभीकरण, सार्वजनिक-खासगी भागीदारी प्रकल्पांची अंमलबजावणी, आधुनिकीकरण व त्याबद्दल विकसकांच्या क्षमता वाढवणे, सर्वसमावेशक व समान क्षेत्रीय विकास. यावेळी अध्यक्ष गौरव ठक्कर, मानद सचिव -तुषार संकलेचा, आयपीपी - कृणाल पाटील उपाध्यक्ष- अनिल आहेर, मनोज खिंवसरा, अंजन भालोदिया, उदय घुगे,कोषाध्यक्ष - श्रेणिक सुराणा,सहसचिव- सचिन बागड, नरेंद्र कुलकर्णी, ऋषिकेश कोते, हंसराज देशमुख, समिती सदस्य-श्यामकुमार साबळे, अनंत ठाकरे, विजय चव्हाणके, सागर शाह, निशित अटल, सुशील बागड, निरंजन शाह, वृषाली हिरे, दीपाली बिरारी सहयोगी सदस्य-सतीश मोरे, सुशांत गांगुर्डे, अभिषेक महाजन, समीर सोनवणे, आमंत्रित सदस्य-मनोज लाडानी, हर्षल हणमंते, भूषण कोठावदे, शिवम पटेल, हिरेन भडजा, मयुरेश चौधरी, ऋषभ तोडरवाल, क्रेडाई युवा विंग समन्वयक आदित्य भातंबरेकर, सहसमन्वयक अजिंक्य नहार उपस्थित होते.

# भररस्त्यात पोलीस हवालदारावर उगारली तलवार

**शहापूर : प्रतिनिधी**

विविध गंभीर गुन्ह्यासह एका वर्षासाठी हद्दपार करण्यात आलेल्या तडीपार गुंडानं कर्तव्यावरील पोलीस हवालदारांना तलवारीचा धाक दाखवत दहशत पसरवण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. हा प्रकार भिवंडी शहरातील अन्सार नगर मैदानाच्या बाजूला घडला आहे. याप्रकरणी गुंडाच्या विरोधात शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. सफरअली उर्फ गफू मोहम्मद युनूस शेख (४२ रा. गैबीनगर, भिवंडी) असे तडीपार गुंडाचं नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तडीपार सफरअली उर्फ गफू हा पोलीस रेकॉडवरील सराईत गुन्हेगार आहेत. त्याच्यावर विविध पोलीस ठाण्यात डझनभर गुन्ह्यांची नोंद आहे. त्याला पोलिस उपायुक्त परिमंडळ - २ च्या निर्देशानुसार ६ मार्च २०२५ पासून एका वर्षासाठी ठाणे, पालघर या महसूली जिल्ह्यांच्या क्षेत्रातून हद्दपार करण्यात आलं आहे. मात्र, हद्दपार असतानाही तो भिवंडीत कारसह अवैध शस्त्रासह येथील २४ एप्रिल रोजी सकाळी सव्वा सात वाजताच्या सुमारास एका कारमधून जाताना सशस्त्र आढळून आला होता. पोलिसांना पाहताच तो पळून जात असताना पोलीस हवालदार लक्ष्मण पोपट सहारे यांनी झडप घालून त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. तेव्हा गुंड सफरअलीनं कारमधून उतरून तलवार पोलिसांच्या दिशेनं भिरकावली. कोणी पकडण्यासाठी आल्यास त्यास तलवारीनं मारून टाकेन, अशी धमकी देत दहशत पसरवण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र तरीही या तडीपार गुंडाला पोलिसांनी झडप घालून अटक केली. पोलीस हवालदार लक्ष्मण सहारे यांच्या तक्रारीवरून गुंड सफरअलीच्या विरोधात शांतीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. त्यास अटक केली आहे.

पोलिसांनी आरोपीकडून मारुती कंपनीची कार क्र.एम एच ०२/बीएम ५३२५ आणि एक तलवार, अँड्रॉइड मोबाईल, रोख रक्कम असा एकूण १ लाख २९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी दिली आहे. अटक आरोपीला न्यायालयात हजर केलं असता २८ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. तसेच या आरोपीवर १२ गुन्हे दाखल असल्याची माहितीही त्यांनी दिली आहे. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश चोपडे करीत आहेत.


**श्री रेणुकामाता मल्टीस्टेट को-ऑप. अर्बन क्रेडिट सोसायटी लि. अहिल्यानगर**

**कार्यालय :–** ''रेणुकाभवन'',सर्व्हे नं.३५/२अ/२ब, पुष्पक हॉटेल जवळ, एकविरा चौक,पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर, फोन नं.- 1800-233-4140 /9225320280

मेल :- callcentre@renukamatamultistate.com recruitment@renukamatamultistate.com

**पाहिजेत**

संपूर्ण भारतात शाखा असलेल्या व बँकिंग क्षेत्रातील अग्रगण्य असलेल्या श्री रेणुकामाता मल्टीस्टेट या संस्थेत नाशिक जिल्ह्यातील मालेगाव, मनमाड, सिन्नर, पिंपळगाव बसवंत, येवला व नाशिक शहर शाखांमध्ये खालील पदे भरायची आहेत.

| | |
|---|---|
| ● **शाखा व्यवस्थापक**<br>**पात्रता :** एम.कॉम/ एम.ए. / एम.एस्सी / एम.बी.ए फाइनान्स<br>**अनुभव :** कमीत कमी ०७ वर्षाचा बँकिंग क्षेत्रातील अनुभव आवश्यक | ३ जगा |
| ● **सहायक शाखा व्यवस्थापक**<br>**पात्रता :** एम.कॉम/ एम.ए. / एम.एस्सी / एम.बी.ए फाइनान्स<br>**अनुभव :** कमीत कमी ०५ वर्षाचा बँकिंग क्षेत्रातील अनुभव आवश्यक | ४ जागा |
| ● **पासिंग ऑफिसर**<br>**पात्रता :** एम.कॉम/ एम.ए. / एम.एस्सी / एम.बी.ए फाइनान्स<br>**अनुभव :** कमीत कमी ०३ वर्षाचा बँकिंग क्षेत्रातील अनुभव आवश्यक | ५ जागा |
| ● **कॅशिअर**<br>**पात्रता :** बी.कॉम / बी.ए. / बी.एस्सी<br>**अनुभव :** कमीत कमी २ वर्षाचा बँकिंग क्षेत्रातील अनुभव आवश्यक | ७ जागा |
| ● **क्लार्क**<br>**पात्रता :** बी.कॉम / बी.ए. / बी.एस्सी<br>**अनुभव :** कमीत कमी २ वर्षाचा बँकिंग क्षेत्रातील अनुभव आवश्यक | १५ जागा |
| ● **मार्केटिंग क्लार्क**<br>**पात्रता :** १२ वी पास<br>**अनुभव :** कमीत कमी १ वर्षाचा मार्केटिंगचा क्षेत्रातील अनुभव आवश्यक | २० जागा |

इच्छुक उमेदवारांनी 7 दिवसांच्या आत खालील दिलेल्या मेल आयडी वरती व हल्लअळरअढढ वरती आपला बायोडाटा व शैक्षणिक कागदपत्र पाठवावे. **WHATSAPP NO.:** 9225320280

**मेल:–** callcentre@renukamatamultistate.com recruitment@renukamatamultistate.com

**टीप: – रिटायर कर्मचार्यांना प्राधान्य (शासकीय व निमशासकीय)**


परिशिष्ट-१३
फॉर्म क्र. २२
नियम ३७(१) पहा)
सर्व परवानगीयोग्य मोडद्वारे

सत्यमेव जयते

**वसुली अधिकारी यांचे कार्यालय**
**कर्ज वसुली प्राधिकरण,मुंबई (डीआरटी-३)**

पहिला मजला, एमटीएनएल टेलिफोन एक्सचेंज इमारत, सेक्टर ३० अ, वाशी नवी मुंबई-४००७०३.
आरपी क्रमांक १५५/२०२३

लिलाव विक्रीची तारीख: २९/०५/२०२५

## विक्रीची घोषणा : स्थावर मालमत्ता

**आयकर कायदा १९६१ च्या सह वाचल्या जाणाऱ्या बँक आणि वित्तीय संस्था देणी वसुली नियम १९९३ च्या नियम ३७, ३८ आणि ५२(१)(२) च्या द्वितीय परिशिष्टानुसार विक्रीची घोषणा**

**बँक ऑफ बरोडा**

**वि.**

**श्री. मधुकर रामक्रिष्णा बोरस्ते आणि इतर**

**प्रति,**
**सीडी १. श्री. मधुकर रामक्रिष्णा बोरस्ते (मयत)**
**(त्यांचे कायदेशीर वारसद्वारे)**
रा.मु.पो. हतनोरे, ता. दिंडोरी, जिल्हा नाशिक - ४२२२०२.
**सीडी १(अ). श्रीमती भीमाबाई मधुकर बोरस्ते**
रा.मु.पो. हतनोरे, ता. दिंडोरी, जिल्हा नाशिक - ४२२२०२.
**सीडी १(ब). श्री. मोतीराम मधुकर बोरस्ते**
रा.मु.पो. हतनोरे, ता. दिंडोरी, जिल्हा नाशिक - ४२२२०२.
**सीडी १(क). सौ. सुशिला हिरामण आहेर**
रा.मु.पो. बहादुरी, ता. चांदवड, जिल्हा नाशिक - ४२२२०५.
**सीडी २. श्री. सुनिल शिवाजी पाटील**
रा.मु.पो. पाडे, ता. दिंडोरी, जिल्हा नाशिक.
**सीडी ३. श्री. समाधान निवृत्ती जाधव**
रा.मु.पो. दिंडोरी, ता. दिंडोरी, जिल्हा नाशिक.

ज्याअर्थी ओए/११९०/२०१६ मधील वसुली प्रमाणपत्र क्रमांक आरसी/१५५/२०२३, माननीय पीठासीन अधिकारी, कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी ३) यांनी नमूद रकमेच्या वसुलीसाठी रु.२६,५०,६८३.०० (रुपये सव्वीस लाख पन्नास हजार सहाशे त्र्याऐंशी फक्त) काढले. व्याज आणि सीडीवरील खर्चासह, आणि तुम्ही, सीडी प्रमाणपत्र धारक बँकेची देय परतफेड करण्यात अयशस्वी झाला.

आणि जेव्हा अधोस्वाक्षरीने सदर रिकव्हरी सर्टिफिकेटचे समाधान होण्यासाठी खालील शेड्यूलमध्ये नमूद केल्यानुसार प्रमाणपत्र कर्जदाराच्या गहाण/जोडलेल्या मालमत्तेची विक्री करण्याचा आदेश दिला आहे.

याद्वारे नोटीस दिली जाते की स्थगितीचा कोणताही आदेश नसताना, सदर मालमत्तेची विक्री २९/०५/२०२५ रोजी सकाळी ०१:००: ते दु. ०२:०० दरम्यान लिलावाद्वारे केली जाईल आणि ऑनलाइन/ऑफलाइन: वेबसाइटद्वारे https://www.bankeauctions.com. द्वारे बोली लावली जाईल. लिलाव सेवा प्रदात्यासाठी अधिकृत संपर्क व्यक्तीचे तपशील, नाव: C1 INDIA Pvt. Ltd. **श्री. भाविक पंड्या, मोबाईल नंबर-८८६६६८२९३७** Email-maharashtra@c1india.com.

लिलाव सेवा प्रदात्यासाठी अधिकृत बँक अधिकाऱ्याचा तपशील असा आहे, नाव: **श्री.देवराज भाईदास पाटील मोबाईल नं. ७५०६०८६९८०** ई-मेल : sarnas @bankofbaroda.com.

खाली दिलेल्या शेड्यूलमध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी/सीडी वरील नावाच्या मालमत्तेची विक्री केली जाईल आणि या मालमत्तेशी संलग्न दायित्वे आणि दावे, जोपर्यंत ते निश्चित केले गेले आहेत, त्या प्रत्येक लॉटच्या विरूद्ध शेड्यूलमध्ये निर्दिष्ट केल्या आहेत.

शेड्यूलमध्ये नमूद केलेल्या लॉटमध्ये मालमत्ता विक्रीसाठी ठेवली जाईल. जर वसूल करावयाची रक्कम मालमत्तेच्या काही भागाच्या विक्रीद्वारे समाधानी असेल, तर उर्वरित भागाच्या संदर्भात विक्री त्वरित थांबविली जाईल. या प्रमाणपत्रात नमूद केलेली थकबाकी + व्याज+खर्च (विक्रीच्या खर्चासह) जमा करण्यापूर्वी विक्री करणाऱ्या अधिकाऱ्याला सादर केल्यास किंवा त्यांच्या समाधानासाठी पुरावा दिला गेल्यास, विक्री देखील थांबविली जाईल. प्रमाणपत्र, व्याज आणि खर्च खालील स्वाक्षरीदारांना अदा करण्यात आला आहे.विक्रीच्या वेळी, सामान्यतः लोकांना वैयक्तिकरित्या किंवा योग्य अधिकृत एजंटद्वारे बोली लावण्यासाठी आमंत्रित केले जाते. तथापि, या विक्रीच्या संदर्भात कोणतेही कर्तव्य बजावणारे अधिकारी किंवा इतर व्यक्ती, तथापि, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, विक्री केलेल्या मालमत्तेमध्ये कोणतेही व्याज मिळविण्यासाठी बोली लावू शकत नाही, मिळवू शकत नाही किंवा मिळवण्याचा प्रयत्न करू शकत नाही.

विक्री आयकर कायदा, १९६१ च्या दुसऱ्या शेड्यूलमध्ये विहित केलेल्या अटींच्या अधीन असेल आणि त्याखाली बनवलेले नियम आणि पुढील पुढील अटींच्या अधीन असतील:-

१) संलग्न शेड्यूलमध्ये नमूद केलेले तपशील हे खालील स्वाक्षरी करणाऱ्याच्या सर्वोत्तम माहितीसाठी सांगितले आहे, परंतु घोषणेमध्ये कोणत्याही त्रुटी, चुकीचे विधान किंवा वगळले असल्यास अधोस्वाक्षरीदार जबाबदार राहणार नाहीत.
२) ज्याच्या खाली मालमत्ता विकली जाणार नाही अशी राखीव किंमत शेड्यूलमध्ये नमूद केल्याप्रमाणे आहे.
३) ज्या रकमेने बोली वाढवायची आहे. रकमेच्या बोलीबद्दल किंवा बोली लावणाऱ्यांबाबत कोणताही वाद उद्भवल्यास, लॉट पुन्हा लिलावासाठी ठेवण्यात येईल किंवा रद्द केला जाऊ शकतो.
४) सर्वोच्च बोली लावणाऱ्याला कोणत्याही लॉटचा खरेदीदार म्हणून घोषित केले जाईल, जर तो/ती/ते कायदेशीररित्या बोली लावण्यासाठी पात्र आहेत आणि पुढे दिलेल्या रकमेची बोली राखीव किंमतीपेक्षा कमी नसेल. जेव्हा ऑफर केलेली किंमत इतकी स्पष्टपणे अपुरी दिसते की असे करणे अयोग्य होईल तेव्हा सर्वोच्च बोलीची स्वीकृती नाकारणे हे अधोस्वाक्षरीच्या विवेकबुद्धीनुसार असेल.
५) प्रत्येक इच्छुक बोलीदाराने डीडी/पे ऑर्डरद्वारे बयाणा रक्कम जमा (ईएमडी) RECOVERY OFFICER, DEBTS RECOVERY TRIBUNALMUMBAI (DRT 3) आरओ/कोर्ट लिलावकर्ता, DEBTS RECOVERY TRIBUNAL MUMBAI (DRT 3) च्या बाजूने जमा करणे आवश्यक आहे. किंवा ऑनलाइन RTGS/NEFT द्वारे/थेट खाते क्रमांक 10430100022945 मध्ये बँक ऑफ बडोदाचे नाव आयएफएससी कोड क्रमांक BARB0VASHIX आणि मालमत्तेच्या तपशीलासह पॅन कार्डची प्रत, पत्त्याचा पुरावा आणि ओळखपत्र, ई-मेल आयडी, मोबाईल क्रमांक आणि कंपनी असल्यास किंवा इतर कोणतेही दस्तऐवज, कंपनीचे प्रतिनिधित्व/वकील आणि अशा ठेवीची पावती/काउंटर फॉइलची पुष्टी करणे. त्यानंतर जमा केलेली बयाणा रक्कम लिलावात सहभागी होण्यासाठी पात्र मानला जाणार नाही.

**बयाणा रक्कम (इएमडी), राखीव किंमत आणि बोली वाढ, खालीलप्रमाणे निश्चित करा:**

| अ. नं. | मिळकतीचे वर्णन | बयाणा रक्कम (रुपयांमध्ये) | राखीव किंमत (रुपयांमध्ये) | च्या पटीत बोली वाढ रक्कम (रुपयांमध्ये) |
|---|---|---|---|---|
| १ | सर्व मालमत्तांचे तुकडे आणि पार्सल शेतजमीन धारणा गट क्र. ३१८(पी) क्षेत्र ० हे. ३६ आर गाव हतनोरे, तालुका दिंडोरी जिल्हा नाशिक | रु. १,१०,०००/- | रु. १०,८०,०००/- | रु. १०,०००/- |
| २ | सर्व मालमत्तांचे तुकडे आणि पार्सल शेतजमीन धारणा गट क्र. ३१९(पी) क्षेत्र ० हे. ६६ आर गाव हतनोरे, तालुका दिंडोरी जिल्हा नाशिक | रु. १,८०,०००/- | रु. १८,००,०००/- | रु. १०,०००/- |
| ३ | सर्व मालमत्तांचे तुकडे आणि पार्सल शेतजमीन धारणा गट क्र. ३२१(पी) क्षेत्र ० हे. ११.९ आर गाव हतनोरे, ता. दिंडोरी जि. नाशिक | रु. ३५,७००/- | रु. ३,५७,०००/- | रु. १०,०००/- |
| ४ | सर्व मालमत्तांचे तुकडे आणि पार्सल शेतजमीन धारणा गट क्र. ३२२(पी) क्षेत्र २ हे. ६८ आर गाव हतनोरे, ता. दिंडोरी जि.नाशिक | रु. ८०,४००/- | रु. ८०,४०,०००/- | रु. २५,०००/- |

देय तारखेनंतर आणि वेळेनंतर मिळालेला बयाणा नाकारला जाईल आणि बयाणासाठी भरलेली रक्कम त्यांना ई-लिलाव फॉर्ममध्ये दिलेल्या पर्यायाद्वारे परत केली जाईल. बोली प्रक्रियेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला बोलीमध्ये सहभागी होण्यासाठी सक्रिय ई-मेल आयडी आणि इंटरनेट कनेक्शनसह संगणक टर्मिनल/सिस्टम आवश्यक आहे. ऑनलाइन बिडिंग दरम्यान कोणतीही कनेक्टिव्हिटी ही फक्त बोलीदाराची जबाबदारी असेल आणि या संदर्भात कोणतेही दावे विचारात घेतले जाणार नाहीत.

लिलावाच्या दिलेल्या वेळेच्या शेवटच्या ५ मिनिटांच्या आत बोली वाढवल्यास, लिलावाची वेळ आणखी ५ मिनिटांच्या अतिरिक्त वेळेने वाढवली जाते जेणेकरून इतर बोलीदारांना त्यांच्या बिडमध्ये वाढ करता येईल आणि आणखी वाढ न झाल्यास लिलाव प्रक्रिया समाप्त होईल. ५ मिनिटांच्या विस्तारित वेळेत केले जातात/केले जातात. जंगम/जंगम मालमत्तेच्या बाबतीत, प्रत्येक लॉटची किंमत विक्रीच्या वेळी किंवा विक्री धारण करणाऱ्या अधिकाऱ्याने निर्देश दिल्यानंतर लगेचच अदा केली जाईल आणि पैसे न भरल्यास, मालमत्ता पुन्हा लिलावासाठी पुनर्विक्रीसाठी ठेवली जाईल.

वर नमूद केलेल्या तपशिलानुसार यशस्वी बोलीदाराला पुढील दिवशी ईएमडीचे समायोजन केल्यानंतर विक्री उत्पन्नाच्या २५% रक्कम या खात्यात/डिमांड ड्राफ्ट/बँकर चेक/पे ऑर्डरमध्ये भरावी लागेल. दुसऱ्या दिवशी सुट्टी किंवा रविवार असेल तर पुढच्या पहिल्या ऑफिसच्या दिवशी. खरेदीदाराने मालमत्तेच्या विक्रीच्या तारखेपासून १५ व्या दिवशी किंवा त्यापूर्वी शिल्लक ७५% रक्कम जमा करावी, अशा दिवशी वगळता, किंवा १५ वा दिवस रविवार किंवा इतर सुट्टीचा असेल तर, १५ तारखेनंतरच्या पहिल्या कार्यालयीन दिवशी. वर सांगितल्याप्रमाणे विहित पद्धतीने दिवस. वरील व्यतिरिक्त खरेदीदाराने RecoveryOfficer DEBIS RECOVERY TRIBUNAL MUMBAI (DRT 3) कडे २% रु. १,०००/- पर्यंत आणि रु. १,०००/- च्या जास्त रकमेच्या १%. डीडीद्वारे Registrar, DEBTS RECOVERY TRIBUNAL MUMBAI (DRT -III) यांच्या नावे पाउंडेज फी देखील जमा करावी लागेल.

विहित कालावधीत देय न भरल्यास, ठेव, विक्रीचा खर्च चुकवल्यानंतर, खाली स्वाक्षरी केलेल्या व्यक्तीला योग्य वाटल्यास, सरकारकडे जप्त केली जाईल आणि चूक करणाऱ्या खरेदीदाराने मालमत्तेवरील किंवा कोणत्याही वरील सर्व दावे जप्त केले जातील. ज्या रकमेसाठी ते नंतर विकले जाऊ शकते त्याचा भाग.विक्रीची नवीन घोषणा जारी केल्यानंतर मालमत्ता पुन्हा विकली जाईल.

जोपर्यंत वसुली अधिकारी, कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी ३) द्वारे विक्रीची पुष्टी होत नाही तोपर्यंत सर्वोच्च बोली लावणाऱ्याचा मालमत्तेवर कोणताही अधिकार/शीर्षक असणार नाही.

अयशस्वी बोलीदारांनी जमा केलेली ईएमडीची रक्कम ऑनलाइन पद्धतीने जमा केल्यावर ईएमडी ऑनलाइन पद्धतीने परत केली जाईल. जर ईएमडी डीडी/बीसी/पे ऑर्डरच्या स्वरूपात जमा केली असेल तर ती हाताने परत केली जाईल, मूळ आयडी पुरावा ई-ऑक्शन ईएमडी फॉर्मसह पाठवलेली छायाप्रत आणावी लागेल. ईएमडी रकमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.ई-लिलाव ईएमडी फॉर्ममध्ये नमूद केलेल्या नावांव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीच्या नावांच्या विक्री प्रमाणपत्रामध्ये समावेश/प्रतिस्थापना करण्याची विनंती मान्य केली जाणार नाही. विक्रीसाठी आणलेल्या मालमत्तेच्या एकापेक्षा जास्त वस्तूंच्या बाबतीत, अशा मालमत्तेची विक्री सोयीनुसार होईल आणि विक्री सूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे क्रमाने जाणे बंधनकारक नाही.

अनिवासी भारतीय बोलीदारांनी त्यांच्या पासपोर्टच्या फोटो पृष्ठाची प्रत अनिवार्यपणे जोडणे आवश्यक आहे आणि भारतीय मिशनने (दूतावासाने) रीतसर मान्यता दिलेली त्यांची बोली मार्गी लावणे आवश्यक आहे. जंगम/जंगम मालमत्तेची विक्री जशी कुठे आहे आणि कोणत्या आधारावर आहे यावर केली जात आहे आणि नियमांनुसार प्रकाशन शुल्क, महसूल आणि इतर भारांच्या अधीन आहे. अवास्तव वाटल्यास कोणतीही किंवा सर्व बोली स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा कोणतेही कारण न देता लिलाव कोणत्याही वेळी पुढे ढकलण्याचा अधिकार अधोस्वाक्षरीने राखून ठेवला आहे.

या विक्रीच्या घोषणेचा तपशील www.drt.gov.in या वेबसाइटवर पाहता येईल.

**मालमत्तेचे परिशिष्ट**

| लॉट नं. | विकल्या जाणाऱ्या मालमत्तेचे वर्णन | मालमत्तेवर किंवा तिच्या भागावर मूल्यमापन केलेला महसूल | मालमत्तेची जबाबदारी असलेल्या कोणत्याही भारांचा तपशील | दावे, जर असेल तर, जे मालमत्तेवर मांडले गेले आहेत आणि त्याचे स्वरूप आणि मूल्य यावर इतर ज्ञात परिणाम |
|---|---|---|---|---|
| १ | सर्व मालमत्तांचे तुकडे आणि पार्सल शेतजमीन धारणा गट क्र. ३१८(पी) क्षेत्र ० हे. ३६ आर गाव हतनोरे, तालुका दिंडोरी जिल्हा नाशिक | माहीत नाही | माहीत नाही | माहीत नाही |
| २ | सर्व मालमत्तांचे तुकडे आणि पार्सल शेतजमीन धारणा गट क्र. ३१९(पी) क्षेत्र ० हे. ६६ आर गाव हतनोरे, तालुका दिंडोरी जिल्हा नाशिक | माहीत नाही | माहीत नाही | माहीत नाही |
| ३ | सर्व मालमत्तांचे तुकडे आणि पार्सल शेतजमीन धारणा गट क्र. ३२१(पी) क्षेत्र ० हे. ११.९ आर गाव हतनोरे, ता. दिंडोरी जि. नाशिक | माहीत नाही | माहीत नाही | माहीत नाही |
| ४ | सर्व मालमत्तांचे तुकडे आणि पार्सल शेतजमीन धारणा गट क्र. ३२२(पी) क्षेत्र २ हे. ६८ आर गाव हतनोरे, ता. दिंडोरी जि. नाशिक | माहीत नाही | माहीत नाही | माहीत नाही |

**टीप: लिलावाच्या तारखेनुसार म्हणजे २९/०५/२०२५, एकूण रु. ५४,३३,८२५/- सीडींकडे थकबाकी आहे. वर नमूद केल्याप्रमाणे मालमत्तांच्या तपासणीची तारीख २३/०५/२०२५ रोजी स.११ ते दु.४ दरम्यान निश्चित करण्यात आली आहे. २७/०५/२०२५ दुपारी ४:३० वाजेपर्यंत बिड्स मिळण्याची अंतिम तारीख निश्चित करण्यात आली आहे.**

**माझे सहीने व प्राधिकरणाचे शिक्क्यासह दिनांक १७/०४/२०२५ रोजी दिले.**

**(दीपा सुब्रमण्यन)**
**वसुली अधिकारी-।।**
**कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी-३)**

शिक्का

# चांदवडला दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ आंदोलन

**चांदवड : वार्ताहर**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ चांदवड शहरात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे तीव्र आंदोलन करण्यात आले. आठवडे बाजार गणूर चौफुली येथे रास्ता रोको करून पाकिस्तानविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. संतप्त शिवसैनिकांनी पाकिस्तानचा राष्ट्रध्वज पायदळी तुडवत भारतमाता की जय, पाकिस्तान मुर्दाबाद अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

यावेळी बोलताना शिवसेना पदाधिकाऱ्यांनी पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्ल्याचा तीव्र निषेध केला. या हल्ल्यात




निष्पाप पर्यटकांचा बळी गेल्याने शिवसैनिकांनी शोक व्यक्त केला. केंद्र सरकारने या हल्ल्याला जशास तसे उत्तर द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

यानंतर चांदवड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, पहलगाममधील दहशतवादी हल्ला मानवतेला काळिमा फासणारा आहे.

केंद्र सरकारने आता केवळ बघ्याची भूमिका न घेता, देशाच्या शांततेला आव्हान देणाऱ्यांना कठोर प्रत्युत्तर द्यावे. या आंदोलनात शिवसेना तालुकाप्रमुख विलास भवर, शहरप्रमुख प्रसाद प्रजापत, शहर संघटक सचिन खैरनार, तालुका संघटक केशव ठाकरे, वडाळीभोई गटप्रमुख अशोक शिंदे, उप तालुकाप्रमुख सागर बर्वे, उप शहरप्रमुख शंभूराजे खैरे, शहर समन्वयक सुरेश सोनवणे, उपशहर प्रमुख तोफिक शेख, वाहतूक सेनेचे तालुकाध्यक्ष अकबर पठाण, उप शहरप्रमुख मनोज जाधव, ज्येष्ठ शिवसैनिक विष्णू कोतवाल, वसीम शेख, युवा सेनेचे प्रमोद उशीर, नितीन निकम, सगर खान, याकुब तांबोळी, सौरव देशमाने, अदनान घासी, सुफियांन पठाण, संदीप गांगुर्डे, बाळासाहेब यठाडे यांच्यासह अनेक शिवसैनिक उपस्थित होते.

# जि.प. सीईओ आशिमा मित्तल यांची मंगरूळ शाळेस भेट

## आदर्श शाळा उपक्रमाची पाहणी

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी अकाल चांदवड तालुक्यातील मंगरूळ येथील जिल्हा परिषद शाळेला भेट देऊन आदर्श शाळा उपक्रमाची पाहणी केली. शाळेतील भौतिक सुविधा, शैक्षणिक उपक्रम आणि विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती घेऊन त्यांनी शाळेच्या प्रगतीची माहिती घेतली.



शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांशी संवाद साधून त्यांनी आदर्श शाळा उपक्रमांतर्गत शाळेत झालेल्या बदलांविषयी माहिती घेतली. शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधत डिजिटल शिक्षणासाठी आवश्यक सुविधा याबद्दल माहिती घेतली.

यावेळी त्यांनी शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी शिक्षकांनी अधिक प्रयत्न करावेत असे सांगत, शिक्षणात तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करण्यावर भर देण्याच्या सूचना केल्या. यावेळी गट विकास अधिकारी मच्छिंद्र साबळे यांच्यासह तालुकास्तरीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पान १ वरून....

## प्राप्तिकर विभागाचे नऊ ठिकाणी छापे

सोमय्या यांनी मालेगाव शहरात मोठ्या प्रमाणात बांगलादेशी घुसखोर राहतात. आलेल्याना बनावट जन्ममृत्यू दाखले दिले जात असल्याचा आरोप केला होता. त्यानंतर पोलिसांनी काही आरोपींना अटक करून गुन्हा दाखल केला आहे. या पार्श्वभूमीवर काल ईडी व प्राप्तिकर विभागाने छापे टाकले होते. काही ठिकाणांहून जन्म मृत्यूचे दाखले व काही कागदपत्रे मिळाल्याची माहिती आहे. किरीट सौमय्या यांनी काही महिन्यांपूर्वी शहरात मोठ्या प्रमाणात बांगलादेशी नागरिक राहतात. त्यांना मालेगाव महानगरपालिकेतर्फे बनावट जन्म दाखले देण्यात आल्याचा आरोप केला होता.त्यानंतर शासनाने एसआयटी चौकशी करण्यात आली. त्यात महानगरपालिका कर्मचारी, काही वकील, काही खासगी एजंट यांच्यावर गुन्हा दाखल करून कारवाई केली होती. आता पुन्हा नव्याने काही माहिती मिळाल्यानंतर मनपा तव्वाब शेख व गजाला परवीन याच्या घरासह शहरातील वेगवेगळ्या भागात ९ ठिकाणी ईडी व आयकर विभागाने संयुक्त छापेमारी केली असून या सर्व ठिकाणी घरांची झडती घेण्यात आली.

## बिबट्याच्या हल्ल्यात तरुणीचा मृत्यू

आहे. काही महिन्यापूर्वी गुराखी मुलाचा हल्ल्यात मृत्यू झाला होता. मात्र वनविभाग उपाययोजना करत नसल्याचा आरोप ग्रामस्थ्यांनी केला आहे. वनविभागाने पिंजरे लावत बिबट्याचा बंदोबस्त करावा. अशी मागणी नागरिकांनी केली आहे. पायल चव्हाण ही मविप्र महाविद्यालयात द्वितीय वर्षात शिकत होती अभ्यासात हुशार असलेल्या पायल च्या दुर्दैवी मृत्यूने हळहळ व्यक्त केली जात आहे.

## मदतकार्यावरून श्रेयवाद रंगला

यांच्यासमवेत काश्मीरमधील परिस्थितीचा आढावा घेतला आहे. उर्वरित पर्यटकांना परत आणण्यासाठी अधिक विमानांची आवश्यकता भासल्यास राज्य सरकार खर्च उचलणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले आहे. दहशतवादी हल्ल्यानंतर राज्य सरकारने काश्मीरमधील पर्यटकांना परत आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरु केले होते. खुद्द मुख्यमंत्री यांनी यात लक्ष घातले आणि स्थानिक प्रशासनाशी देखील संपर्क साधला. त्यांनी काश्मीर स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधण्यासाठी गिरीश महाजन यांची नियुक्ती केली आहे. हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांचे मृतदेह राज्यात आणले गेले तेव्हा कॅबिनेट मंत्री आशिष शेलार आणि मंगल प्रभात लोढा मुंबई विमानतळावर समन्वयासाठी होते. तर पुण्यातील जबाबदारी माधुरी मिसाळ यांच्याकडे सोपवण्यात आली होती. दुसरीकडे शिवसेनेने आपले मंत्री गुलाबराव पाटील आणि योगेश कदम यांना मुंबई विमानतळावर तैनात केले होते. पर्यंटकांना परत आणण्याच्या समन्वयासाठी शिंदे स्वतः बुधवारी श्रीनगरला रवाना झाले आणि त्यांनी दोन दिवस तिथेच तळ ठोकला होता.

**भाईंच्या उपकाराची परतफेड कधीही करू शकणार नाही**

हल्ला झाला तेव्हा छत्तीसगडमधील चिरमिरी येथील चार कुटुंबांचा एक गट पहलगाममध्ये उपस्थित होता. परंतु स्थानिक रहिवासी नजाकत अली यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून या लोकांचे प्राण वाचवले. छत्तीसगड येथील भाजपचे सक्रिय सदस्य तसेच भाजप युवा मोर्चाशी संबंधित अरविंद अग्रवाल यांनी नजाकत अली यांचे फेसबुकवर पोस्ट करत विशेष आभार मानले आहेत. फेसबुक पोस्टवर त्यांनी लिहिले आहे की, तुम्ही स्वतःचा जीव धोक्यात घालून आमचे प्राण वाचवले. नजाकत भाईंच्या उपकाराची परतफेड आम्ही कधीही करू शकणार नाही. मी लवकरच परत येईन, असे त्यांनी लिहिले आहे.

## अदील गुरी, आशिफ शेखची घरे उडवली

दरम्यान, शुक्रवारी सकाळी बांदीपोरा जिल्ह्यात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये गोळीबार झाला. दहशतवाद्यांच्या उपस्थितीबद्दल गुप्तचर माहितीच्या आधारे सुरक्षा दलांनी जिल्ह्यातील कुलनार अजस भागात शोध मोहीम सुरू केली होती, त्यानंतर चकमक सुरू झाली. त्याच्या घरात संशयास्पद वस्तूही आढळल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

## हल्ल्यावर पवारांची पहिली प्रतिक्रिया

आपले लोक तिथे जातात. दहशतवाद्यांनी आपले उद्दिष्ट साध्य केले, हा जो निष्कर्ष काढला जातो, तो अधिक सावधान करणारा आहे. आपण काळजी घ्यायला पाहिजे. पर्यटकांना हिंदू आहेत म्हणून गोळ्या घातल्या यामध्ये काय सत्य आहे? याबाबत मला माहिती नाही. पण तिथे जी लोक होते, त्यातील स्त्रियांना सोडले. मी एका भगिनीच्या घरी गेलो होतो, त्यावेळी त्यांनी सांगितले आम्हा महिलांना हात लावले नाही. त्यांनी फक्त आमच्या पुरुषांना हात लावला. दहशतवादी हल्ल्यानंतर काश्मीरमध्ये फिरण्यासाठी जाणाऱ्या पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. अनेक पर्यटकांनी आपल्या बुकिंग रद्द केल्या आहेत. काश्मीरच्या लोकांचे चरितार्थ हे पर्यटनावर आहे. लोक काही दिवस काश्मीरला जाणार नाहीत असेच दिसते. त्यामुळे काश्मीरच्या जनतेचे मोठे नुकसान होईल. .

## सिंहस्थ प्राधिकरण प्रक्रियेला वेग

सिंहस्थासाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्याची घोषणा केली. त्याचाच भाग म्हणून या प्राधिकरणाकडे पाहिले जात आहे. शिंदे यांच्या उपस्थितीत मंत्रालयात प्राधिकरण कायद्याचे सादरीकरण करण्यात आले. या प्राधिकरणाबाबत प्राथमिक चर्चा करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या सुचनांनुसार विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी प्राधिकरणाच्या कायद्याचे प्रारूप तयार केले आहे. प्राधिकरणाला कायदेशीर स्वरूप देण्याच्या दृष्टीने प्रारूप महत्वाचे समजले जात असून, त्याचेच सादरीकरण मंत्रालयातील बैठकीत करण्यात आले. सिंहस्थ अवघ्या दोन वर्षांवर येऊन ठेपला आहे. मात्र, प्रशासकीय तयारीच्या अनुषंगाने बैठका सोडल्यास अन्य ठोस कुठल्याही प्रकारची कार्यवाही होत नसल्याने लोकप्रतिनिधी आणि साधू महंतांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

## नाशिककरांची वाट खड्ड्यातूनच !

विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सिंहस्थ आढावा बैठकीत हे काम स्मार्ट सिटिला देण्यात आले. स्मार्ट सिटीने शहरात आठशे सीसीटीव्ही कॅमेरे बसवले असून त्यावेळी केबल टाकण्यासाठी शहरातील रस्ते खोदण्यात आले होते. आता पुन्हा उर्वरीत कॅमेऱ्यांसाठी रस्ते खोदले जाणार असल्याने नाशिकरांना रस्त्यातून वाट काढताना कसोटी लागणार आहे.

## रोहिणी पवारांनी इतिहास रचला

विश्वस्त कमिटीमध्ये सहभाग व्हावा, यासाठी वर्षभरापूर्वी स्थानिकांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले होते. या आंदोलनाला यश आले असून, चैतन्य महाराज आणि पुरुषोत्तम महाराज पाटील या आळंदीतील नागरिकांची निवड झाली आहे.

गांवकरी Classified जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

**पाहिजेत**

राणेनगर येथील टू व्हीलर व फोर व्हीलर शोरूमसाठी CRM/ DBM रिसेप्शनिस्ट, मेकॅनिक, सर्विस ॲडव्हायझर, स्पेअर पार्ट मॅनेजर, टेलीकॉलर, हाऊस कीपिंग, ऑफिस बॉय, वॉशिंग बॉय, अकाउंटंट त्वरित पाहिजेत. **संपर्क :** ९२७२०९१४२५

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे.श्री गिफ्ट ॲण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक. **संपर्क-** ९८९००१३१३६

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. ८२३७३११२११

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

**पाहिजेत**

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त कंपनीसाठी,आडगाव विंचूर गवळी शिवार नाशिक येथे कायमस्वरूपी कामासाठी फील्ड ऑफिसर पाहिजे. शिक्षण किमान १० वी पास, वय २१ ते ६५. **संपर्क** ९२२०२४२५५५

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे. **संपर्क-९८६०१३६५३६**

**महिला व पुरूष पाहिजेत**

Draftsman part time आटोक्याड नॉलेज-१, ऑफिस कामासाठी-४, कोर्ट व महापालिकेच्या कामासाठी-२, ड्रायव्हर-१, वकील पार्ट टाइम-१, अकाऊंटंट पार्ट टाइम-१, भटजी देवपूजा करण्यासाठी-१ **एन.एन. असोसिएटस्**, तिसरा मजला, आय. डी.बी.आय. बँकेच्यावर, साठे बाग, एम.जी.रोड, नाशिक. वेळ- सकाळी १२ ते ५. संपर्क- 8668862801

**विकणे आहे**

शरदचंद्र पवार फ्रुट मार्केट यार्डच्यामागे, विबगोर शाळा रोड, नाशिक येथील 2BHK फर्निचरनी सुसज्ज फ्लॅट त्वरित विकणे आहे. **संपर्क- ७२०८४९८५२३**

पाथर्डी फाटा, ज्ञानेश्वरनगर, साईसंकल्प बिल्डींग फ्लॅट विकणे आहे. पहिला मजला **संपर्क:** ९९७००३९०४६

**जमीन विकणे आहे**

मंजूर तालुका कोपरगाव, जिल्हा अहिल्यानगर येथे जमीन विक्री करणे आहे, शिर्डी-लासलगाव हायवेजवळ/गोदावरी गंगा नदीचे पासून १.५ किलो मीटर अंतरावर ८ एकर विहीर बागायती जमीन विक्री करणे आहे. गट नंबर २८४/२,३,४,५ शिर्डीपासून २८ किलोमीटर मागे. **संपर्क-** ८७८८०९२४१५

पान १ वरून....

## राहुल गांधींना फटकारले

करणारे पत्र लिहिले होते. महात्मा गांधी जेव्हा ब्रिटीश अधिकाऱ्यांना पत्रे पाठवत तेव्हा ते लिहित असत, तुमचा विश्वासू सेवक. त्यामुळे तुम्ही महात्मा गांधींना इंग्रजांचे सेवक म्हणणार का? असा प्रश्न करत न्यायालयाने स्वातंत्र्यसैनिकांचा अपमान करणे चुकीचे असल्याचे म्हटले आहे. यावर राहुल गांधींच्या वकिलाने सर्वोच्च न्यायालयात सांगितले की, त्यांच्या अशिलाचा चिथावणी देण्याचा हेतू नव्हता. यावर न्यायालयाने म्हटले की, त्यांना कोणालाही चिथावणी द्यायची नव्हती तर त्यांनी अशी विधाने का केली. स्वातंत्र्यसैनिकांबद्दल खोटी विधाने करण्याचा अधिकार कोणालाही नाही. ते राजकारणी आहेत, मग ते अशी विधाने का करतात. अशी विधाने पुन्हा केली तर आम्ही स्वतःहून दखल घेऊ, असे न्यायालयाने स्पष्ट केले.



# आश्रमशाळेत संस्कार अन् विचारांची शिदोरी

## 'रविवार माझा हक्काचा' उपक्रमात लोकप्रतिनिधींसह नामवंत व्यक्तींचे अनुभव कथन

**नाशिक : प्रतिनिधी**

आदिवासी समाजाच्या विद्यार्थ्यांनी समाजव्यवस्थेतील विविध घटकांशी आश्रमशाळेच्या माध्यमातून हितगुज साधून त्यांच्यापासून शिकावे. तसेच त्यांचा लोकप्रतिनिधींशीही संवाद होण्यासाठी नाशिक अपर आयुक्त कार्यालयाकडून 'रविवार माझा हक्काचा' उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमात लोकप्रतिनिधींसह नामवंत व्यक्ती मार्गदर्शन आणि अनुभव कथन करत आहे. त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांना आश्रमशाळेत संस्कार आणि विचारांची शिदोरी मिळत आहे. हीच शिदोरी विद्यार्थ्यांना नागरिक म्हणून समाजाला जबाबदार बनवतील आणि समाजात बदल घडविणार आहे. नाशिक अपर आयुक्त कार्यालयाकडून ठाणापाडा, शिरसगाव आणि आसरबारी येथील शासकीय आश्रमशाळेत 'रविवार माझा हक्काचा' उपक्रम सुरू करण्यात आला आहे. त्याअंतर्गत रविवारी शालेय सुट्टीच्या दिवशी विद्यार्थ्यांना वर्गाबाहेरील अनौपचारिक(जीवनाचे) शिक्षण दिले जाते. आतापर्यंत ५७ मार्गदर्शन सत्रे उत्साहात पार पडली आहे. या व्याख्यानांना विद्यार्थ्यांचा उस्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. या सत्रांसाठी विवध क्षेत्रातील तज्ज्ञ, कवी, साहित्यिक, पत्रकार, आंतरराष्ट्रीय खेळाडू आणि लोकप्रतिनिधी मार्गदर्शकाच्या भूमिकेत होते.

'रविवार माझा हक्काचा' उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना चालू घडामोडींपासून स्पर्धा परीक्षांच्या तयारीपर्यंतची माहिती होत आहे. व्याख्यात्यांच्या स्वअनुभ कथनातून विद्यार्थ्यांना जीवन जगण्याची नवीन उमेद मिळत आहे. दरम्यान, विपश्यना केल्याने मनाची एकाग्रता वाढते. त्यामुळे या उपक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थी विपश्यना करतात. त्यातून विद्यार्थ्यांना वक्त्यांचे विचार आत्मसात करणे सोपे होत आहे.

> शालेय जीवनात झालेले संस्कार आणि मिळालेले विचार हे विद्यार्थ्यांना समृद्ध बनवितात. या विचारांना आणि संस्कारांना काळानुरूप अनुभवाची जोड मिळाली, की ते आयुष्यभर विद्यार्थ्यांच्या मनावर कोरले जातात. त्या पार्श्वभूमीवर 'रविवार माझा हक्काचा' उपक्रम राबविण्यात येत असून, त्याला विद्यार्थ्यांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.
>
> **–अरुण बागले, अधीक्षक, शिरसगाव शासकीय आश्रमशाळा**

**या वक्त्यांनी केले मार्गदर्शन**

आमदार हिरामण खोसकर, सरपंच एकनाथ घाटाळ, सामाजिक कार्यकर्ते विष्णू जाधव, माजी सैनिक हिरामण शेवरे, सहायक प्रकल्प अधिकारी नितांत कांबळे, डॉ. सायली चिखलीकर, वनरक्षक महेश पखाणे, अधीक्षिका विद्या पाहुणे, शिक्षण विस्तार अधिकारी नामदेव भांगरे, सेवानिवृत्त सहाय्यक प्रकल्प अधिकारी अनिलकुमार मराठे, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत सोनवणे, डॉ. हेमंत राऊतमाळे, पोलीस उपनिरीक्षक दिलीप बोडके, डॉ. गौरी उपासणी, डॉ. कविता भालेराव, विजयाश्री खर्जुल, मिलिंद पगारे, प्रा. संकेत सांगळे, निर्माते अमित प्रतिमा नागराज जोशी, राष्ट्रीय खो- खोपटू दिलीप खांडवी, मंदार देशमुख, ॲड. संदीप पवार.

# साहित्य परिषद कोल्हापूरचा प्राचार्य डॉ. कृष्णा शहाणे यांना पुरस्कार

**नाशिक : प्रतिनिधी**



साहित्य परिषद कोल्हापूर यांच्या वतीने दिले जाणारे २०२५ चे साहित्यभूषण पुरस्कार जाहीर झाले आहेत.

साप्ताहिक गंगाधर आणि साहित्य परिषद कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिल्या जाणाऱ्या या पुरस्कारांमध्ये ज्येष्ठ साहित्यिक श्रीराम पचींद्रे, बिटकोचे प्रभारी प्राचार्य डॉ. कृष्णा शहाणे, ग्रामीण साहित्यिक बबनराव पोतदार आदींची निवड झाल्याची घोषणा कोल्हापूर साहित्य परिषदेचे अध्यक्ष आणि साहित्य संमेलनाचे संयोजक कमलाकर वर्टेकर यांनी केली.

कोल्हापूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय परिसंवाद आणि साहित्य संमेलनात सदर पुरस्कार वितरित केले जातील. डॉ. शहाणे हे अर्थशास्त्र आणि शेती या विषयातील जाणकार असून, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ मुंबई यांनी प्रसिद्ध केलेल्या १५ आणि एकूण १९ क्रमिक पुस्तकांचे ते लेखक म्हणून ते प्रसिद्ध आहेत.

मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्स मुलुंड मुंबई, के. टी. वझे केळकर कॉलेज मुंबई, गुरुनानक खालसा कॉलेज मुंबई या विद्यापीठ दर्जा असलेल्या स्वायत्त महाविद्यालयांच्या अर्थशास्त्र अभ्यास मंडळाच्या सदस्यपदी आहे

त्यांच्या निवडीबद्दल गोखले एज्युकेशन सोसायटीच्या सेक्रेटरी प्राचार्य डॉ. सौ. दीप्ती देशपांडे, संस्थेचे अध्यक्ष आर. पी. देशपांडे, विभागीय सचिव प्राचार्य डॉ. राम कुलकर्णी, संस्थेचे कुलसचिव गिरीश नातू, शाखा सचिव प्राचार्य डॉ. व्ही. एन. सूर्यवंशी, सहाय्यक शाखा सचिव उपप्राचार्य डॉ. प्रणव रत्नपारखी आदींसह अनेकांनी अभिनंदन केले आहे.

# चांदवड अभियांत्रिकी महाविद्यालयात ड्रोन एक्सलन्स सेंटरचे उद्घाटन

**चांदवड : वार्ताहर**

येथील श्री नेमिनाथ जैन ब्रह्मचर्याश्रम संचलित स्व.सौ. कांताबाई भवरलालजी जैन अभियांत्रिकी महाविद्यालयात ''एरोमेघ इंटेलिजेंस वापरून जीईओ एआय वर्कफ्लो'' ( पॅसेंजर ड्रोन रीसर्च प्रायवेट लिमीटेड) या विषयावर एक विशेष तांत्रिक सत्र आयोजित करण्यात आले. या सत्रासाठी निखिल बारवकर यांचे तज्ज्ञ मार्गदर्शन लाभले. त्यांनी ड्रोन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता व जिओ-डेटा यांचे एकत्रित उपयोग कसे करता येतात यावर सखोल माहिती दिलमी. यांनी या तंत्रज्ञानाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला आणि त्याच्या व्यावहारिक उपयोगांविषयी मार्गदर्शन केले.कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ड्रोन तंत्रज्ञानाच्या एकत्रित वापरातून होणारे विविध उपयोग, डेटा विश्लेषण, नकाशे तयार करणे, सर्व्हेक्षण इत्यादी बाबतीत बारवकर यांनी सखोल माहिती दिली.

**ग्रामपंचायत कार्यालय, नाईकवाडी ता. जि. नाशिक**

**जाहीर ई- निविदा सचना क्र. ०१/२०२५-२६ (प्रथम प्रसारण)**

सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत नाईकवाडी ता. जि. नाशिक येथे विविध विकास कामासाठी महाराष्ट्र शासनाच्या योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत पुरवठादार यांच्याकडून साहित्यासाठी ई- निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून दि. २५/०४/२०२५ ते ०२/०५/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येईल. इ निविदा संबंधीची सविस्तर माहिती अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी सरपंच**
**ग्रामपंचायत नाईकवाडी, ता. जि. नाशिक**

**दिंडोरी नगरपंचायत, दिंडोरी**
**ता. दिंडोरी, जि. नाशिक**
**फोन नं:-०२५५७-२२२७५७ टोल फ्री क्र.१८००२३३४००५**
email id:-dindorinagarpanchayat@gmail.com

**जाहीर ई-निविदा सूचना क्र.१० (२०२५-२६ प्रथम प्रसिध्दी)**

तमाम नोंदणीकृत ठेकेदार यांना कळविण्यात येते की, दिंडोरी नगरपंचायतीचे बांधकाम विभागाकडील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या परिक्षेत्रात अधिसूचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरविणे (सन २०२४-२५) प्रशासकीय मंजुरी रक्कम रु.९५.०० लक्षचे १ विकास कामाची स्वतंत्र ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

तरी नोंदणीकृत ठेकेदार यांच्याकडून ई-निविदा मागविण्यात येत असून सदर ई-निविदा शासनाच्या **https://www.mahatenders.gov.in** संकेतस्थळावर दाखल करता येईल. ई-निविदा संबधिची सविस्तर माहीती अटी व शर्ती सदर संकेत स्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

| | | |
|---|---|---|
| (श्री. संदीप चौधरी) | (सौ. माधुरी सांळुखे) | (श्रीमती. सुनिता लहांगे) |
| मुख्याधिकारी | उपनगराध्यक्ष | नगराध्यक्षा |
| दिंडोरी नगरपंचायत | दिंडोरी नगरपंचायत | दिंडोरी नगरपंचायत |

**जाहीर नोटीस**

नि.नं:०६नुसार प्रोसेस जमा

श्री. संजय एस.शिंदे
श्री.सुनील डी.आहिरे
ॲडव्होकेट, सटाणा, नाशिक

**वारस प्रमाणपत्र नं.८१/२०२५**

**सटाणा येथील मा. दिवाणी न्यायाधीश सो. क. स्तर यांचे न्यायालयात.....**

**१. श्री. पंडीत रोडू चौधरी,** वय - ५२ वर्षे, **२. श्री. काळू रोडू चौधरी**, वय - ४७ वर्षे, **३. श्री. म्हाळु रोडू चौधरी,** वय-४३ वर्षे, **४. सौ. डोंगरी रोडू चौधरी,** वय-३४ वर्षे, **५. सौ. ताईबाई तुकाराम अहिरे**, वय- ५६ वर्षे, **६. सौ. शेवंती बाई शिवाजी गावित**, वय-३७ वर्षे, **७. सौ. सुनिता अनिल पवार**, वय-३५ वर्षे, **८. श्री. सुनिल रोडया उर्फ रोड भोये**, वय - ३३ वर्षे, **९. श्री. सौन्या रोडया उर्फ रोड भोये**, वय-२९ वर्षे, **१०. सौ. मंजुळा विजय गावीत,** वय २५ वर्षे, नं. १ ते ३ रा. कांद्याचा मळा, ता. बागलाण, जि. नाशिक- नं. ४, ६, १० . अलियाबाद, ता. बागलाण, जि. नाशिक. नं. ५ रा. गौतमनगर, ता. बागलाण, जि. नासिक. नं. ७. मंडाणे, ता. साक्री, जि. धुळे, नं. ८ व ९ रा. आंबेपाडा, ता. साक्री, जि. धुळे.

**अर्जदार**

**विरूध्द**

**कोणीही नाही** **सा. वाला**

ज्याअर्थी प्रस्तुत अर्जातील अर्जदार क्र. १ ते ५ यांचे वडिल व अर्जदार क्र. ६ ते १० यांचे **आजोबा दगडू चौधरी** हे **दि. ५/११/२०१९** रोजी **मौजे कांद्याचा मळा**, ता. बागलाण येथे मयत झालेले असून अर्जदार क्र. १५ यांची आई व अर्जदार क्र. ६ ते १० यांची आजी **कै. बायजाबाई रोडू चौधरी** ही **दि.३/९/२०२१** रोजी कांद्याचा मळा, ता. बागलाण येथे मयत झालेली असून अर्जदार क्र. १ ते ५ यांची बहिण व अर्जदार ६ ते १० यांची आई **कै. जनाबाई रोडू भोये** ही **दि.७/३/२०२३** रोजी **मौजे दरेगाव** येथे मयत झालेली असून त्यांच मृत्यु पश्चात अर्जदार क्र. १ ते १० हेच मयतांचे कायदेशीर वारस असल्याबाबत अर्जदारांनी न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकामी प्रस्तुतवा अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस आहे/ नाहीत असे कोणाचे म्हणजे अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्दी झालेनंतर **दि.१६/०६/२०२५** रोजी स्वत: अगर वकिलामार्फत न्यायालयात हजर राहुन आपले लेखी म्हणणे सादर करावे. वरील मुदतीत कोणाचे काहीही म्हणणे न आल्यास में, न्यायालय योग्य तो पुरावा घेवुन पुढील आदेश करेल त्यांनंतर कोणाचे काहीही म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही. आज **दि.२३/४/२०२५** रोजी माझी सही व मे कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

**कामगिरी लिपिक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय**
**सटाणा, नाशिक**

शिक्का

**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय**
**सटाणा, नाशिक**

**श्रीमान सुगनमलजी सुराणा व्यापारी सहकारी पतसंस्था मर्यादित, देवळा**
**धनसुगंध, सटाणा रोड, देवळा, ता. देवळा, जि. नाशिक फोन नं.(०२५९२) २२८२६३**

**कर्जाकरिता गहाण घेणेच्या मिळकतीबाबत जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या गहाण घेणेचे मिळकतीचे संबंधाने कळविण्यात येते की .

१. मौजे म. फुलेनगर, ता. देवळा, जि. नाशिक येथील बिनशेती ग.नं.५७९/४/अ, क्षेत्र ७०.०० चौ.मि., आकार रू.१०५०.०० पैसे मिळकत, यांसी चतु:सिमा पूर्वेस- नाला, पश्चिमेस - ग.नं.२९६, २८९/, २९४, २९३, २४२, दक्षिणेस - ग.नं. २४२ व नाला, उत्तरेस - ग.नं. ३३६, ३३९, ३४०, ३३७. येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत हो कर्जदार श्री. ललीतकुमार पोपटलाल जैन, रा. उमराणे, ता. देवळा, जि. नाशिक यांचे मालकी व कब्जे वहिवाटीतील आहे.

०१) कर्जदाराचे नांव : श्री. ललीतकुमार पोपटलाल जैन रा. उमराणे, ता. देवळा, जि. नाशिक

०२) सहकर्जदाराचे नांव : सौ. वैशाली ललीत बाफना रा. उमराणे, ता. देवळा, जि. नाशिक

०३) नोटीसीचा उद्देश : टायटल व्हेरिफिकेशन

२. वरील कर्जदार, सहकर्जदार यांनी **श्रीमान सुगनमलजी सुराणा व्यापारी सहकारी पतसंस्था मर्यादित, देवळा, मुख्य शाखा - देवळा** यांचेकडून वर नमुद केलेली कर्जदार व सहकर्जदार यांनी कलम १ मधील मिळकती गहाण/तारण देवून कर्जाची मागणी केली आहे.

३. वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या कर्जदार व सहकर्जदार यांची मिळकत ही पूर्णपणे निर्वेध व बिनबोजाची आहे असे सांगून कर्ज मागणी केलेली आहे. वरील मिळकतींवर **गजानन महाराज पतसंस्था** यांचे कर्ज असल्याचे दिसून येते. या व्यतिरिक्त वरील मिळकतोवर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, अधिकार, साठेखत, करारनामा, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, वारसाहक्क, मनाई हुकूम, कोर्ट जप्ती वगैरे स्वरूपाचा काही हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **सात (०७)** दिवसांच्या आत आमच्या खालील पत्यावर व संस्थेच्या कार्यालयात संबंधित कागदपत्रे व साक्षी पुराव्यानिशी समक्ष येवून लेखी हरकत नोंदवावी. मुदतीनंतर व परस्पर वर्तमानपत्रात हरकत प्रसिद्ध केल्यास ती विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून गहाण / तारण घेतली जाईल व कर्ज दिले जाईल.

करिता जाहिर नोटीस असे.

**स्थळ: सटाणा, दिनांक : २४/०४/२०२५** **श्री. महेश दिनकर जोशी, व्यवस्थापक**

**आमचे मार्फत प्रसिद्ध**

**श्री. के. पी. भदाणे, (ॲडव्होकेट/नोटरी)**
**दिवाणी न्यायालयासमोर, सटाणा, ता. बागलाण (नाशिक)**

**चौकशीची जाहीर नोटीस**

जावक क्रमांक/१११५/२०२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाशिक, जानकी प्लाज़ा, नाशिक-पुणे रोड, द्वारका सर्कल जवळ, नाशिक. दि.०२/०४/२०२४

एस.आर.एन.क्रमांक NSK/0245/1860/24
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक:

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक-पंचवटी वाणी मित्रमंडळ, पंचवटी, जि.नाशिक बाबत।**

**न्यासाचा पत्ता :- प्रभाकर वनजी कोठावदे,** फ्लॅट नं.३, शर्डे बंगला, ओंकार नगर, जुना जकात नाका, पेठरोड, पंचवटी, नाशिक.

**अर्जदार- प्रदीप नरहरी वाणी**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाशिक, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील १ | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | MEMBERSHIP FEE | ७०००.०० |

(अ) जंगम मिळकत :- रोख रु. ७०००/- मात्र (अक्षरी रुपये सात हजार मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किवा सर्वेक्षण क्र | क्षेत्र | मुल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मुल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | NIL | NIL | NIL | NIL | NIL | 0.00 |

ब) स्थावर मिळकत: रोख रु.०/- मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून **तीस** दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक १-०४-२०२४ रोजी दिली.

शिक्का

**सही/-अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाशिक**

## महत्त्वाचे

### म्हसोबा महाराजांच्या यात्रोत्सवाला आजपासून प्रारंभ



**सिडको :** नंदिनी नदीच्या तीरावर असलेल्या आणि गर्द हिरव्या महाकाय वटवृक्षाच्या छायेत स्वयंभू उंटवाडीचा राजा अतिप्राचीन म्हसोबा महाराजांच्या दोन दिवसीय यात्रोत्सवाला आजपासून प्रारंभ होत आहे. उंटवाडीचा राजा अतिप्राचीन म्हसोबा महाराज यात्रेनिमित्त श्रींना अभ्यंगस्नान घालण्यात येणार आहे. त्यानंतर म्हसोबा महाराज यात्रा पंचकमेटीतर्फे जलाभिषेक आणि तळी भरण्यात येणार आहे. सकाळी ११ वाजता सत्यनारायण पूजन करण्यात येणार असून, दिवसभर देवदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी महाप्रसादाचेही वाटप करण्यात येणार आहे. सायंकाळी बहुचर्चित छावा चित्रपट दाखविण्यात येणार आहे. यात्रेच्या समाप्तीनिमित्त अतिप्राचीन म्हसोबा महाराज यात्रा कमेटीच्या वतीने कुस्त्यांची दंगल भरविण्याची परंपरा कायम ठेवत यंदाही कुस्तीप्रेमींसाठी दिनांक २७ एप्रिल रोजी सिटी सेंटर मॉलनजीक महाकाय आणि विशाल वटवृक्षाच्या छायेखाली अतिप्राचीन म्हसोबा महाराज मंदिराच्या प्रांगणात कुस्त्यांची दंगल भरविण्यात येणार आहे. उपस्थित राहण्याचे आवाहन म्हसोबा महाराज यात्रा कमेटीचे अध्यक्ष फकिरराव तिडके, माजी अध्यक्ष मधुकर तिडके यांच्यासह सदाशिव नाईक, अंबादास जगताप, रामचंद्र तिडके, बाजीराव तिडके, अण्णा पाटील, दत्ता पाटील, विलास जगताप, विष्णू जगताप, एकनाथ तिडके, जगन्नाथ तिडके, राजेश गाढवे, सुरेश जगताप, संतोष कोठावळे, बाळासाहेब तिडके, राम पाटील, प्रवीण जगताप, दत्तात्रेय तिडके आदींनी केले आहे.

### पोलीस असल्याची बतावणी करत लुटले

**पंचवटी :** पेठ रोडवरील शारदा हॉस्पिटल समोरून दुचाकीवरून आलेल्या दोघांनी आम्ही पोलिस आहोत, चेकिंग सुरू असून, खिसे चेक करत खिशातून ३० हजार रुपये काढून घेत पोबारा केला. याबाबत म्हसरूळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी महादू चिमणा भुसारे (५५, रा. मु.पो. करंजळी, ता. पेठ) त्यांचा मित्र यशवंत मल्हारी चौधरी (रा. सांबरपाडा, ता. पेठ) हे दोघे दि.२४ रोजी सकाळी ७.३० वाजता करंजाळी येथून नाशिक जाणाऱ्या बसमध्ये बसून ते नाशिक - पेठरोडवरील आरटीओ ऑफिसच्या बाजूला असलेल्या शारदा हॉस्पिटलसमोर सकाळी ९ वाजता उतरले. त्यावेळी ते दोघेही शरदचंद्र मार्केट यार्ड येथे कांदे व बटाटे घेण्यासाठी जात असताना शारदा हॉस्पिटल पेठरोडसमोर अंगात निळसर टीशर्ट असलेले ३० ते ३४ वयाचे दोघे जण मोटारसायकलवरून फिर्यादी महादू भुसारे यांच्याजवळ आले.आम्ही पोलिस आहोत. चेकिंग चालू आहे, असे सांगून खिसे चेक करून फिर्यादीच्या खिशातील कांदे व बटाटे घेण्यासाठी आणलेले ३० हजार रुपये काढून घेत मोटारसायकलवर तेथून आरटीओ सिग्नलकडे निघून गेले. याबाबत म्हसरूळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक अंकुश चिंतामण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार एस. बी. फुलपगारे करीत आहेत.

### कट का मारला म्हणून विचारत मारहाण

**पंचवटी :** देवळाली कॅम्प येथील मित्र कॉफी पिण्यासाठी चारचाकी वाहनाने शिलापूर येथे गेले असता तेथील काही युवकांनी मोटारसायकलला कट का मारला म्हणून मारहाण करून स्विफ्ट कारची उसाच्या टिपरान काच फोडून नुकसान केल्याबद्दल सहा जणांच्या विरोधात आडगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, दि.२४ रोजी रात्री १.३० वाजेच्या सुमारास मिलन अशोक हरक (३२) रा. विठ्ठलवाडी, देवळाली कॅम्प, नाशिक व त्याचे मित्र महेश हरिश्चंद्र शिंदे, शुभम लक्ष्मण कडभाने, सागर शंकर सातपुते व शुभम राजाराम भोर (सर्व रा. देवळाली कॅम्प) हे स्विफ्ट कार ( क्रमांक एम.एच. १५ जी.एल.०६७३) ने देवळाली गाव येथून निघून कॉपी पिण्यासाठी शिलापूर येथे गेले होते. त्यावेळी पवन कहांडळ, गोरख पवार, आदित्य कहांडळ व त्यांच्या सोबत असलेल्या तिघांनी आमच्या मोटारसायकलला कट का मारला, असे म्हणून मिलन आणि त्यांच्या मित्रांना मारहाण करून तुम्हाला जिवे मारतो, अशी धमकी दिली. तसेच पवन कहांडळ व त्याच्या मित्रांनी उसाच्या टिपराने स्विफ्ट कारची काच फोडली. याबाबत मिलन अशोक हरक (३२) रा. विठ्ठलवाडी, देवळाली कॅम्प, नाशिक यांनी आडगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलिस हवालदार राजुळे करीत आहेत.

### ट्रकची दुचाकीला धडक : वृद्धाचा मृत्यू

**पंचवटी :** दिंडोरी रोडवरील आकाश पेट्रोलपंपाकडून म्हसरुळकडे दिंडोरी रोडने जात असताना पाठीमागून येत असलेल्या ट्रकने वृद्ध नागरिकाच्या दुचाकीला धडक दिल्याने त्यांचा मृत्यू झाला. याबाबत अरविंद दादासाहेब थोरात (४२), रा. नायरा पेट्रोलपंपाच्या मागे, डेर्ले मळा, हॉटेल सिटी स्पाईस शेजारी, दिंडोरी रोड, म्हसरुळ यांनी म्हसरूळ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी अरविंद थोरात यांचे वडील दादासाहेब रंगनाथ थोरात (६६) ॲक्टिव्हा मोपेड गाडी क्रमांक ( एम.एच. १७ ओ.आर.८८८५) वरून आकाश पेट्रोलपंपाकडून म्हसरुळकडे दिंडोरी रोडने जात असताना पाठीमागून येत असलेल्या टाटा कंपनीचा ट्रक क्र.(जी.जे.१७ एक्स.एक्स ९५५५) वरील चालकाने ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने येत ॲक्टिव्हा गाडीला ओव्हरटेक करत असताना पाठीमागून जोरात ठोस मारली. यात फिर्यादीच्या वडिलांच्या छातीला जबर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला. याबाबत म्हसरूळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक मुदुपकर करीत आहेत.

### जम्मू-काश्मीरमधील हल्ल्याचा निषेध



**शिंदे :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या पर्यटकांवरील भ्याड हल्ल्याचा शिंदे ग्रामस्थांतर्फे निषेध आणि हल्ल्यातील मृत झालेल्या भारतीय पर्यटकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. शिंदे गावातील छत्रपती शिवाजी महाराज चौक व डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी ग्रामस्थांनी एकत्र येत पाकिस्तान मुर्दाबाद, भारतमाता की जय, वंदे मातरम्, सपोर्ट इंडियन आर्मी अशा घोषणा देत या भ्याड हल्ल्याचा निषेध केला. सरकारच्या पाठीशी सर्व नागरिक असून, सरकारने या हल्ल्याला जोरदार प्रतिउत्तर द्यावे, अशी मागणी यावेळी नागरिकांनी केली. याप्रसंगी अनेक ग्रामस्थांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी माजी सरपंच गोरख जाधव, संजय कापडणे, किशोर जाधव, दिनकर झाडे, धनाजी मते, संपत तुंगार, सुरेश बुवा जाधव, दत्तात्रय जाधव, सुभाष काकड, शशी पगारे, शशिकांत जाधव, सुखदेव मते, सचिन बिडवे, सुभाष जाधव, राजाराम जाधव, युवराज साळवे, सोमनाथ जाधव, चेतन जाधव, सुनील शहाणे, विलास काकड, संतू बंदावणे, भगवान सोनवणे, गणेश टिळे, रामदास तुंगार, दीपक तुपे, रामदास टिळे, रामनाथ दादा जाधव, भाऊराव पाटील तुंगार, बहिरू जाधव, रामकृष्ण मते, बाळासाहेब जाधव, पुंडलिक आव्हाड, दत्तात्रय शेलार, सुनील बोराडे, अनिल बोराडे, अनिल तुपे, राजाभाऊ नवशे, रवींद्र शिंपी, भानुदास जाधव, विष्णुपंत बोराडे, सागर साबळे, महेश नवशे, विष्णुपंत मते, संतोष बेदडे, वाल्मीक माळवे, द्वारकादास शेलार, हरी जाधव, संदीप जाधव आदी उपस्थित होते.

# सावकार मुन्ना राणेकडून १३ लाखांचा मुद्देमाल जप्त

## अंबड पोलिसांची यशस्वी कारवाई



**सिडको : विशेष प्रतिनिधी**

अंबड पोलीस ठाणे हद्दीत अवैध सावकारी करून नागरिकांची फसवणूक करणारा आणि मी सातपूर येथील पीएल ग्रुपचा सदस्य असल्याचे सांगणारा खुटवडनगर येथील विवेक उर्फ मुन्ना बारसू राणे या खासगी सावकाराकडून पोलिसांनी सुमारे १३ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या कारवाईत बलेनो कंपनीची एक चारचाकी कार आणि ट्रॅक्टर जप्त करण्यात आला असून, याप्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

अवैध सावकारी प्रकरणात संशयित विवेक उर्फ मुन्ना बरसू राणे हा गेल्या काही दिवसांपासून फरार होता. त्याच्या अटकेसाठी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, उपायुक्त परिमंडळ २ मोनिका राऊत, सहायक आयुक्त शेखर देशमुख, तसेच अंबड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राकेश हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू होता. प्रकरणाचा तपास उपनिरीक्षक नितीन फुलपगारे करत होते. गोपनीय माहितीच्या आधारे विवेक उर्फ मुन्ना बारसू राणे हा संशयित आरोपी पाथर्डी फाटा परिसरात येणार असल्याचे समजताच पोलीस कर्मचारी किरण गायकवाड, राहुल जगझाप, अनिल गाढवे, सचिन करंजे, राकेश पाटील, मयुर पवार, स्वप्निल जुंद्रे, तुषार मते, संदीप भुरे, दीपक निकम, समाधान शिंदे, सागर जाधव, घनश्याम भोये, प्रवीण राठोड, विष्णू जाधव, संदीप डावरे, दीपक पाटील यांनी साफळा रचुन ताब्यात घेऊन कारवाई केली.

अटक केल्यानंतर पोलिसांनी खासगी सावकारी करणारा संशयित आरोपी मुन्ना राणेला विश्वासात घेऊन विचारणा केली असता, त्याने व त्याचा मित्र नीलेश जाधव यांनी अनेक नागरिकांना अवैधपणे व्याजाने पैसे देऊन त्यांच्याकडून मारुती बलेनो कार, इनोव्हा क्रिस्टा, जॉन्डिअर कंपनीचा ट्रॅक्टर व टाटा ४०७ टेम्पो गहाण घेतल्याचे उघड झाले. पोलिसांनी त्याच्याकडून ६ लाख रुपये किमतीची मारुती बलेनो कार आणि ७ लाख रुपये किमतीचा जॉन्डिअर ट्रॅक्टर असा एकूण १३ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पुढील तपास उपनिरीक्षक नितीन फुलपगारे व अंमलदार दत्ता धिंदळे करीत आहेत.

**नागरिकांसाठी आवाहन**

मुन्ना राणे किंवा त्याच्यासारख्या अन्य अवैध सावकारांमुळे कोणत्याही नागरिकाला त्रास होत असल्यास त्यांनी तत्काळ अंबड पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. त्यांच्या समस्या पोलिसांकडून निश्चितपणे सोडवण्यात येतील.
– **शेखर देशमुख,** सहायक पोलीस आयुक्त, अंबड विभाग

# शिवसेनेच्या पुरस्कारांचा रविवारी वितरण समारंभ

## दादाभाऊ भुसे उपस्थित राहणार

**नाशिक : प्रतिनिधी**

गेल्या बारा वर्षांपासून नाशिक जिल्ह्यात शिक्षकी पेशात सातत्याने प्रामाणिकपणे सेवेत असणाऱ्या शिक्षकांना हेरून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिले जाणारे या वर्षाचे पुरस्कार रविवार दि. २७ रोजी सकाळी ११ वा. शिक्षणमंत्री ना. दादाभाऊ भुसे यांच्या हस्ते रावसाहेब थोरात सभागृहात दिले जाणार आहेत, अशी माहिती संयोजक संग्राम करंजकर यांनी दिली आहे. अध्यक्षस्थानी शिवसेना उपनेते विजय करंजकर राहणार असून, प्रमुख अतिथी म्हणून शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, खासदार भास्करराव भगरे, शिक्षक आमदार किशोर दराडे, आमदार सत्यजित तांबे, आमदार सुहास कांदे, मा.खा. हेमंत गोडसे, सहसंपर्कप्रमुख राजू अण्णा लवटे, महानगरप्रमुख प्रवीण तिदमे, शिक्षक नेते शिवाजी निरगुडे, बाळासाहेब सूर्यवंशी, रवींद्र मोरे, नानासाहेब देवरे उपस्थित राहणार आहेत. या वर्षाच्या पुरस्कारात जीवनगौरव पुरस्कार महाराष्ट्र समाजसेवा संघाचे अध्यक्ष सुधाकर शंकर साळी यांना तर आदर्श शिक्षण संस्था म्हणून निफाड तालुका एज्युकेशन सोसायटी पिंपळगाव बसवंत यांना देण्यात येणार आहे. या पुरस्कारात सर्व माध्यमाचे उपक्रमशील मुख्याध्यापक, राजकीय, साहित्य, सामाजिक, सहकार, अध्यात्म, समाजप्रबोधन, संघटन, नाट्य नृत्य, संगीत, पत्रकारिता, महिला सबलीकरण, विज्ञान तंत्रज्ञान, क्रीडा, चित्रकला, स्काऊट गाइड, दिव्यांग, एन.सी.सी., पर्यावरण आदी पुरस्कारही दिले जातात.



# फरार घरफोडीचा आरोपी अखेर गजाआड

## गुन्हे शाखा युनिट २ ची कामगिरी

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

अंबड पोलीस ठाणे हद्दीत २०२० मध्ये झालेल्या घरफोडी प्रकरणातील पाच वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला अखेर गुन्हे शाखा युनिट २ च्या पथकाने अटक केली आहे. अली हुसेन नुरअली शेख (वय ३७, रा. संजीवनगर, अंबड लिंक रोड, नाशिक) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

नाशिक शहर पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उपआयुक्त (गुन्हे) प्रशांत बच्छाव, तसेच सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील पाहिजे व फरार आरोपींविरोधात विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजी गुन्हे शाखा युनिट २ च्या पथकाने ही यशस्वी कारवाई केली.

गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी पवननगरमधील मार्केट परिसरात असल्याचे समजताच प्रभारी सहाय्यक पोलिस निरीक्षक हेमंत तोडकर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रेमचंद गांगुर्डे, पोलिस हवालदार नंदकुमार नांदुर्डीकर, संजय सानप, सुनिल आहेर, वाल्मीक चव्हाण यांच्या पथकाने सापळा रचून आरोपीस पकडले. पोलिसांची चाहूल लागताच आरोपीने पळून जाण्याचा प्रयत्न केला.

मात्र पाठलाग करून त्याला ताब्यात घेण्यात आले.अली शेख याच्याविरुद्ध अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून, तो गुन्हा घडल्यापासून फरार होता. अटक केल्यानंतर त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून, पुढील चौकशीसाठी त्याला अंबड पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले आहे. या कामगिरीसाठी गुन्हे शाखा युनिट २ चे अधिकारी व अंमलदार यांचे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडून कौतुक होत आहे.

# सहा महिन्यांपासून फरार असलेला आरोपी अटकेत

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

उपनगर पोलीस ठाणे हद्दीत घडलेल्या खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यातील सहा महिन्यांपासून फरार असलेल्या आरोपीस गुन्हे शाखा युनिट १ च्या पथकाने अटक केली आहे. शिवम उर्फ शुभम कोंडीराम हरगावकर (वय १८, रा. कोळीवाडा, भगवतीनगर, नानावली, नाशिक) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

दिनांक २४ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास नाशिक-पुणे रोडवरील घंट्या म्हसोबा मंदिराजवळ फिर्यादी हर्षल राजेंद्र देवरे यांच्यावर लखन काशिद, किश शिंदे व त्यांच्यासह त्याच्या ५-६ साथीदारांनी हॉकी स्टिक, लाकडी दांडके व धारदार शस्त्राच्या सहाय्याने गंभीर हल्ला केला होता. या हल्ल्यात फिर्यादीस डोक्याला, हातांना, पाठीवर आणि कमरेस गंभीर दुखापती झाल्या होत्या. त्यावरून उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानुसार गुन्हे शाखा युनिट १ चे पोलीस अंमलदार पोलिस अंमलदार विलास चारोस्कर व नितीन जगताप यांना गोपनीय माहिती मिळाली की, फरार आरोपी शुभम हरगावकर नानावली परिसरात येणार आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांच्या सूचनेनुसार सहाय्यक पोलिस निरीक्षक सुदाम सांगळे यांच्या नेतृत्वाखाली पथकाने नानावलीतील फेमस बेकरीजवळ सापळा रचून आरोपीस शिताफीने ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्यातील सहभागाची कबुली दिली असून, त्यास पुढील कारवाईसाठी उपनगर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई गुन्हे शाखा युनिट १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांच्या मार्गदर्शनाखाली हिरामण भोये, सुदाम सांगळे, पोहवा रमेश कोळी, देविदास ठाकरे, रोहिदास लिलके, धनंजय शिंदे, विलास चारोस्कर, जगेश्वर बोरसे, नितीन जगताप, व चालक किरण शिरसाठ यांच्या पथकाने केली.




# कांगोणी येथे उद्यापासून कीर्तन महोत्सव

## भाविकांनी लाभ घ्यावा : बाळकृष्ण महाराज



**नाशिक :** राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मशताब्दी महोत्सव आणि पार्वतीबाई किसन महाराज सुडके यांच्या रौप्य पुण्यतिथीनिमित्त नेवासा तालुक्यातील कांगोणी येथील संतनगरमधील श्री संत किसन महाराज सुडके आश्रम येथे पंचदिनी कीर्तन महोत्सवास रविवार(दि.२७) पासून सुरुवात होत आहे.

कीर्तन महोत्सव २ मेदरम्यान होणार असून, हभप बाळकृष्ण सुडके यांची सकाळी नऊ ते बारा वेळेत दररोज पुण्यश्लोक अहिल्यादेवी संगीत चरित्र कथा होणार आहे. रविवारी सात ते नऊदरम्यान ज्ञानोबा माऊली परभणीकर यांचे कीर्तन होणार आहे. सोमवारी श्री क्षेत्र देवगड संस्थानचे स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज, मंगळवारी निवृत्ती महाराज देशमुख, बुधवारी देवराम महाराज गायकवाड यांचे हरिकीर्तन तर गुरुवारी चंद्रशेखर महाराज देगलूरकर यांचे कीर्तन होईल. गुरुवारी १ मे रोजी सकाळी दहा वाजता पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांचे व्याख्यान होणार आहे. शुक्रवारी महंत भास्करगिरी महाराज देवगड यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. सप्ताहात दररोज ख्यातनाम गायक व वादक उपस्थित राहणार आहेत. यावेळी दररोज पहाटे चार ते सहा काकडा भजन, सात ते आठ विष्णुसहस्रनाम, नऊ ते बारा संगीत अहिल्यादेवी चरित्र कथा, दुपारी चार ते पाच हरिपाठ व सात ते नऊ कीर्तन होणार आहे. यावेळी प्रमुख उपस्थिती श्रीक्षेत्र भगवानगडचे महंत डॉ. नामदेवशास्त्री, रामायणाचार्य रामराव महाराज ढोक उपस्थित राहणार आहेत.

# पाथर्डी उपविभाग कार्यालयास महावितरणची मान्यता

## आ. सीमा हिरे यांच्या पाठपुराव्याला यश



**नाशिक : प्रतिनिधी**

पाथर्डी येथे प्रस्तावित असलेल्या उपविभाग कार्यालयाला मान्यता मिळावी, यासाठीच्या आ. सीमा हिरे यांच्या सततच्या प्रयनांना यश आले आहे. आमदार हिरेंकडून सुरू असलेल्या पाठपुराव्याची दखल घेऊन महावितरण प्रशासनाने पाथर्डी येथील उपविभाग कार्यालयाच्या प्रस्तावास मान्यता दिली. पाथर्डी येथे लवकर महावितरणचे कार्यालय सुरू होणार आहे. विजेच्या समस्या सोडविण्यासाठी कामटवाडा आणि पाथर्डी येथील नागरिकांना द्वारका सबस्टेशनला जाण्याची गरज भासणार नाही.

पश्चिम मतदारसंघातील दहा सेक्शनपैकी कामटवाडा आणि पाथर्डी हे सेक्शन द्वारका उपविभागांतर्गत येतात. खंडित वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी वा विजेसंदर्भातील समस्या सोडविण्यासाठी कामटवाडा, पाथर्डी परिसरातील नागरिकांना दहा किलोमीटर दूर अंतरावरील द्वारका सबस्टेशनला जावे लागत असल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत होती. यातून नागरिकांना दिलासा देण्यासाठी स्थानिक महावितरण विभागाने पाथर्डी येथे नवीन उपविभाग कार्यालय प्रस्तावित केले होते. या संदर्भातील मान्यतेसाठी मुंबई येथील महावितरण कार्यालयात पाठविलेला प्रस्ताव गेल्या काही महिन्यांपासून प्रलंबित होता. पाथर्डी उपविभाग कार्यालयाचा प्रस्ताव मार्गी लावण्याची विनंती महिनाभरापूर्वी आ. हिरेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली होती.

त्यानंतर चार दिवसांपूर्वी सीमा हिरे यांनी चार दिवसांपूर्वी महावितरणचे संचालक अरविंद भादीकर यांची भेट घेतली होती. कामटवाडा आणि पाथर्डी या दोन्ही सेक्शन अंतर्गत ग्राहकांची संख्या प्रत्येकी तीस ते पस्तीस हजारांच्यावर गेलेली असल्याने महावितरण कंपनीकडून ग्राहकांना पुरेशी सेवा देणे शक्य होत नाही.

ग्राहकांच्या संख्येत मोठी वाढ झाल्याने अनेकदा येथील सेवा कोलमडून पडत असते.

खंडित वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी आणि विजेसंदर्भातील तक्रारी वा समस्या सोडविण्यासाठी नागरिकांना तब्बल दहा किलोमीटर अंतरावरील व्दारका सबस्टेशन कार्यालयात यावे लागत असल्याचे आ. हिरेंनी संचालक भादीकर यांच्या निर्दशनास आणून दिले होते. आमदार हिरेंनी पोटतिडकीने मांडलेल्या व्यथा आणि सततच्या पाठपुराव्याची दखल घेत राज्याच्या महावितरण प्रशासनाने पाथर्डी येथील प्रस्तावित उपविभाग कार्यालयाच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे.

# लोकसहभागातून गावांचा विकास शक्य : मित्तल

## सय्यदपिंप्री, मोडाळे, अंदरसूल ग्रा.पं.चा सन्मान



**नाशिक : प्रतिनिधी**

राष्ट्रीय पंचायतराज दिवस प्रत्येक ग्रामपंचायतीने व ग्रामविकासातील प्रत्येक घटकाने उत्साहात साजरा करायला हवा. महात्मा गांधी यांनी खरा भारत हा ग्रामीण भागात वसतो, असे सांगितले होते. त्यामुळे ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास झाल्यास भारताचा विकास होईल. ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकाने ग्रामपंचायतीने दिलेल्या अधिकारांचा सकारात्मक वापर केल्यास लोकसहभागातून प्रत्येक ग्रामपंचायतीचा विकास होईल, असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

राष्ट्रीय पंचायतराज दिवस जिल्हा परिषदेत उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या.

राष्ट्रीय पंचायतराज पुरस्कारासाठी संपूर्ण राज्यातून नाशिक जिल्ह्यातील सय्यदपिंप्री ग्रामपंचायतीची निवड झाली होती. मोडाळे ग्रामपंचायतीने माझी वसुंधरा उपक्रमात उत्कृष्ट कामगिरी केली असून, अंदरसूल ग्रामपंचायतीने ई गव्हर्नन्स प्रकारात चांगले काम केले असल्याने या तिन्ही ग्रामपंचायतींचे सन्माननीय सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांचा सन्मान करताना आनंद होत असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले.

भारत सरकारच्या पंचायती राज मंत्रालयाच्या निर्देशानुसार दरवर्षी २४ एप्रिल रोजी राष्ट्रीय पंचायतराज दिवस साजरा केला जातो. यंदाच्या वर्षी 'पंचायत, सशक्त लोकशाहीचा पाया' ही संकल्पना अधोरेखित करत, नाशिक जिल्हा परिषदेच्या मार्गदर्शनाखाली सर्व ग्रामपंचायतींमध्ये विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. नाशिक जिल्हा परिषदेत पंचायतराज दिनी संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात येऊन मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे राष्ट्रीय पंचायत राज दिनानिमित्त बिहार प्रसारित होणारे विशेष संदेशाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. त्याचबरोबर सेवा हक्क कायदा जनजागृती करण्यात आली.

या कार्यक्रमात ग्रामपंचायत पिंप्री सय्यद (ता. व जि. नाशिक), ग्रामपंचायत मोडाळे (ता. इगतपुरी) व ग्रामपंचायत अंदरसूल (ता. येवला) यांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या ग्रामविकास व पंचायतराज सक्षमीकरणातील उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, ग्रामपंचायत विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. वर्षा फडोळ, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र परदेशी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे, कार्यकारी अभियंता संदीप सोनवणे, सहायक गट विकास अधिकारी प्रशांत पवार, कनिष्ठ प्रशासन अधिकारी मंगेश चव्हाण यांच्यासह सर्व विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**जिल्ह्यात पंचायतीराज दिवस उत्साहात साजरा**

जिल्ह्यात यानिमित्ताने विविध विकासकामांचे उद्‌घाटन, लाभार्थ्यांना योजना संबंधित मदतीचे वितरण, जलसंवर्धन, स्वच्छता अभियान, महिलांचे सशक्तीकरण, डिजिटल ग्रामपंचायत यांसारखे कार्यक्रम राबवले जाणार आहेत. ग्रामसभेच्या माध्यमातून गावकऱ्यांशी थेट संवाद साधून शासनाच्या योजनांची माहिती पोहचविण्यावर भर दिला गेला.

**सन्मानित सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी**

**ग्रामपंचायत पिंप्री सय्यद–** सरपंच भाऊसाहेब ढिकले व ग्रामपंचायत अधिकारी दौलत गांगुर्डे
**ग्रामपंचायत मोडाळे –** सरपंच शिल्पा आहेर व ग्रामपंचायत अधिकारी हनुमान दराडे
**ग्रामपंचायत अंदरसूल –** उपसरपंच रवींद्र वाकचौरे व ग्रामपंचायत अधिकारी बाळासाहेब बोराडे

## महत्त्वाचे



### पिंपळगावी मुस्लिम समाजातर्फे निषेध

**पिंपळगाव बसवंत :** पिंपळगाव बसवंत येथील सर्व मुस्लिम बांधवांनी शुक्रवारी (दि. २५) शहरातील जामा मशीद येथे एकत्र येऊन काश्मीरमध्ये झालेल्या भ्याड हल्ल्याचा काळ्याफिती बांधून जाहीर निषेध केला. दोन मिनिटं स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहिली. या गुंड अतिरेक्यांचा व पाकिस्तानाचा जाहीर निषेध केला. याप्रसंगी मुस्लिम समाज समाजाचे प्रमुख गफा भाई शेख, दस्तगीर भाई शेख, जाकीर खान, पठाण इलियास, कादरी इलियास, आत्तार इमरान, शेख जावेद, काझी भाऊद्दीन पटेल, दानिश पठाण, आरिफ काझी आदी उपस्थित होते. अतिरेकी, दहशतवादी यांना कोणतीही जात, धर्म नसतो. त्याच्याकडे मानवता नसते म्हणूनच मुस्लिम समाज या प्रवृत्तीला कधीच थारा देत नाहीत व देणार नाहीत, अशा शब्दांत मुस्लिम बांधवांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.




### चांदवडला 'उबाठा'तर्फे पहलगामचा निषेध

**चांदवड :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ चांदवड शहरात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने आठवडे बाजार गणूर चौफुली येथे रास्ता रोको करून पाकिस्तानविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. संतप्त शिवसैनिकांनी पाकिस्तानचा राष्ट्रध्वज पायदळी तुडवत भारतमाता की जय, पाकिस्तान मुर्दाबाद अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. यावेळी बोलताना शिवसेना पदाधिकाऱ्यांनी पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्ल्याचा तीव्र निषेध केला. यानंतर चांदवड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांना निवेदन सादर करण्यात आले. या आंदोलनात शिवसेना तालुकाप्रमुख विलास भवर, शहरप्रमुख प्रसाद प्रजापत, शहर संघटक सचिन खैरनार, तालुका संघटक केशव ठाकरे, वडाळीभोई गटप्रमुख अशोक शिंदे, उपतालुकाप्रमुख सागर बर्वे, उपशहरप्रमुख शंभूराजे खैरे, शहर समन्वयक सुरेश सोनवणे, उपशहरप्रमुख तौफिक शेख, वाहतूक सेनेचे तालुकाध्यक्ष अकबर पठाण, उपशहरप्रमुख मनोज जाधव, विष्णू कोतवाल, वसीम शेख, युवा सेनेचे प्रमोद उशीर, नितीन निकम, सगर खान, याकूब तांबोळी, सौरव देशमाने, अदनान घासी, सुफियांन पठाण, संदीप गांगुर्डे आदी उपस्थित होते.



### मुस्लिम समाजाकडून पोलिसांना निवेदन

**येवला :** पहलगाम येथे दहशतवाद्यांनी पर्यटकांवर गोळीबार करून ठार मारले. या घटनेचा येवला शहरात मुस्लिम समाजाच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. दरम्यान, या हल्लेखोर दहशवाद्यांवर केंद्र शासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने करण्यात आली आहे. पर्यटकांना ठार मारणाऱ्या दहशतवाद्यांवर कठोरात कठोर शासन करण्यात यावे, अशी मागणी मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आली असून, यासंदर्भातील निवेदन येवला शहर पोलिसांना देण्यात आले आहे. याप्रसंगी अकबरभाई शहा, माजी नगरसेवक अमजदभाई शेख, अन्सार शेख, अजिज शेख, दादाभाई फिटर, निसार लिंबुवाले, एजाज मेंबर, अकमल शेख, फारूक शेख आदींसह मुस्लिम उपस्थित होते.



### दिंडोरी कृउबात कांदा लिलावाचा शुभारंभ

**दिंडोरी :** दिंडोरी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या दिंडोरी येथील मुख्य आवारात गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर कांदा लिलाव व स्वच्छता अभियानाचा शुभारंभ खासदार भास्कर भगरे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी झालेल्या पहिल्याच लिलावात ३२०० रुपये प्रति क्विंटल भाव मिळाला. पहिल्याच दिवशी कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात कांदा विक्रीसाठी आणला होता. यावेळी राज्य सरकारने ठरवून दिलेल्या शंभर दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत स्वच्छता अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. खासदार भास्कर भगरे यांनी संसदेत कांद्यावरील निर्यातशुल्क हटविण्याची मागणी केली होती. त्यानुसार केंद्र सरकारने कांद्यावरील निर्यातशुल्क हटविले. त्याबद्दल खासदार भगरेंचा बाजार समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बाजार समितीचे सभापती प्रशांत कड, उपसभापती योगेश बर्डे, संचालक कैलास मवाळ, गंगाधर निखाडे, पांडुरंग गडकरी, दत्तू भेरे, श्याम बोडके, अमित चोरडिया, नंदलाल चोपडा, सुरेश डोखळे, विलास कड, शेखर देशमुख, दत्तू राऊत, दत्तू शिंगाडे, विठ्ठलराव अपसुंदे, डॉ. योगेश गोसावी, सहाय्यक निबंधक वैभव मोरडे, नाना मोरे, शहाजी सोमवंशी, गोपीनाथ पाटील, गुलाब जाधव, महेंद्र बोरा आदींसह शेतकरी व व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## निधन वार्ता

### संतोष चोभे



**निफाड :** कोठुरे येथील मृदंगाचार्य ह.भ.प. सर्वज्ञ संतोष चोभे (१२) याचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्याच्या पश्चात आजी-आजोबा, आई - वडील, काका-काकू, बहीण असा परिवार आहे. बालवयात पंचक्रोशीत भजन, कीर्तन यात पखवाज व मृदंग सेवा देण्याचे कार्य करत असे. त्याच्या निधनाने आध्यात्मिक क्षेत्रात पोकळी निर्माण झाली आहे.

### गणपतराव कडू



**मुकणे :** घोटी येथील आगरी सेनेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष गणपतराव महादू कडू (८४) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. गणपतराव कडू यांनी नाशिक जिल्हा परिषद सदस्य व घोटी ग्रामपालिकेचे सरपंचपद भूषवले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, बहीण, एक मुलगा, मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते सुरेश कडू यांचे ते वडील होत.

# दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ येवल्यात सकल हिंदू समाजाचा निषेध मोर्चा

## येवला शहर कडकडीत बंद

**येवला : प्रतिनिधी**

पहलगाम येथे दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला करीत २८ नागरिकांची गोळ्या झाडून हत्या केली तसेच येवला शहरात काही दिवसांपूर्वी गोरक्षकांवर करण्यात आलेल्या हल्ल्याचा तीव्र निषेध करीत येवला शहरात सकल हिंदू समाजाच्या वतीने निषेध मोर्चा काढण्यात आला तसेच या घटनेच्या निषेधार्थ येवला शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. पहलगाम येथे दहशतवाद्यांनी २८ निष्पाप नागरिक पर्यटकांची गोळ्या झाडून हत्या केली. अशा दहशतवाद्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी मोर्चात करण्यात आली. येवला शहरातील गंगादरवाजा येथील वनवासी राम मंदिरापासून मोर्चाला प्रारंभ करण्यात आला. सदर मोर्चात सकल हिंदू समाजातील नागरिक, महिला, युवक, युवती मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शहरातील विविध मार्गांनी मोर्चाचा शहरातील विंचूर रोड चौफुली परिसरात समारोप करण्यात आला. पहलगाम येथे दहशतवाद्यांनी २८ पर्यटकांची गोळ्या झाडून हत्या केली. या हत्येचा बदला केंद्र सरकारने घ्यावा.




दहशतवाद्यांना कठोर कारवाई करावी. भारत देशातील नागरिकांवर सातत्याने दहशतवादी संघटनांकडून हल्ला करण्यात येतो. या हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध करण्यात येऊन दहशतवादी संघटनांचा बीमोड करण्यात यावा, अशी मागणी सकल हिंदू समाजबांधवांनी बोलताना केली असून, या संदर्भातील निवेदन मोर्चाकऱ्यांच्या वतीने महिलांच्या हस्ते पोलीस उपअधीक्षक बाजीराव महाजन यांना देण्यात आले. सदर मोर्चात विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सकल हिंदू समाजाचे बांधव, महिला, तसेच युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवला.

पहलगाम येथे दहशतवाद्यांनी २८ पर्यटकांवर नागरिकांवर हल्ला करून गोळ्या झाडून ठार मारले. या घटनेचा सकल हिंदू समाजाच्या वतीने येवला शहरात मोर्चा काढण्यात आला. त्यानंतर या घटनेचा निषेध करण्यात येऊन येवला शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. सदर बंदमध्ये शहरातील व्यापारी, दुकानदार, किरकोळ विक्रेते यांनी सहभाग घेऊन सदर घटनेचा निषेध व्यक्त केला. दरम्यान, शहरातील काही भाग वगळता इतर ठिकाणी शहरात स्वयंस्फूर्तीने कडकडीत बंद पाळण्यात आला.

# येवला मर्चंट बँकेला १ कोटी २३ लाखांचा नफा

## चेअरमन पूजा काबरा यांची माहिती

**येवला : प्रतिनिधी**



येथील येवला मर्चंट्स को-ऑप. बँकेला १ कोटी २३ लाखांचा विक्रमी नफा झाल्याची माहिती बँकेच्या चेअरमन पूजा मनीष काबरा यांनी दिली.

गेल्या काही वर्षांपासून बँकेला अनेक आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागले. त्यातूनच ग्राहकांना उत्तमोत्तम सेवा देत बँकेने मागील काही वर्षांची आर्थिक तूट भरून काढली. नवीन संचालक मंडळाच्या नियुक्तीपूर्वी बँकेचा एनपीए हा २६.४७ टक्के होता. नवीन संचालक मंडळाने अथक प्रयत्नाने तो १९.६१ टक्क्यांनी कमी करून आजअखेर ६.८६ टक्के एवढा राखण्यात यश मिळविले आहे.


उत्तर महाराष्ट्रात सर्वांत जास्त सोनेतारण कर्जवाटप करणारी अग्रगण्य बँक म्हणून पंचक्रोशीत बँकेची ओळख आहे. बँक ग्राहकांच्या सेवेसाठी सतत काही ना काही नवीन उपक्रम राबवित असते. त्याचाच एक भाग म्हणून बँक लवकरात लवकर ग्राहकांसाठी क्यूआर कोडची सेवा चालू करीत आहे. सर्व संचालक मंडळाने वेळोवेळी बँक हिताचे निर्णय एकमताने घेतले. त्यामुळेच बँकेने प्रगतीचे आर्थिक शिखर गाठले असल्याचे बँकेच्या चेअरमन पूजा काबरा यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, बँकेला विक्रमी नफा झाल्याबद्दल बँकेचे व्हा. चेअरमन सारिका दिवटे, जनसंपर्क संचालक सुभाष गांगुर्डे, संचालक विकर्णसिंग परदेशी, सोनल पटणी, सुहास भांबारे, डॉ. महेश्वर तगारे, महेश भांडगे, चंद्रकांत कासार, छाया देसाई, सोनल राजपूत, प्रज्वल पटेल, नितीन काबरा, प्रमोद सस्कर, राहुल गुजराथी, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यनारायण त्रिपाठी आदींनी अभिनंदन केले आहे.

# लग्नसमारंभाऐवजी हळदीच्या कार्यक्रमांना पसंती

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

उन्हाची तीव्रता लक्षात घेता लग्नसमारंभांकडे नागरिकांनी पाठ फिरविली आहे. त्यापेक्षा हळदी समारंभ साजरा करण्यासाठी महिला सायंकाळी लवकर हजेरी लावतात. हळदी समारंभ रात्रीच्या वेळी असतो. त्यामुळे दिवसा कामधंद्यावर जाण्यास मोकळा वेळ मिळतो. तसेच पारा वाढल्याने लोकं हळदी समारंभाला उपस्थित राहण्यास पसंती देत आहेत.



उन्हाचा परिणाम म्हणून निफाडचा बाजार असून, बाजारपेठेत खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांची गर्दी कमी झाली आहे. सकाळी ११ वाजेपर्यंत व सायंकाळी पाचनंतर ग्राहक खरेदीसाठी बाहेर पडत आहेत. उन्हाचा तडाखा आणि घामाच्या धारांनी नागरिक बेजार झाले आहेत. गेल्या पाच-सहा दिवसांपासून उष्णतेच्या लाटेचा परिणाम तीव्रतेने जाणवू लागला. परिसरातील तापमान गुरुवारी (ता. २४) ४१ अंश सेल्सिअसच्या वर गेल्याने अस्वस्थता निर्माण झाली आहे.

रणरणत्या उन्हामुळे रस्ते आणि बाजारपेठांमध्ये दुपारी शुकशुकाट पाहायला मिळत आहे. उष्णतेमुळे अंगाची लाहीलाही होत असल्यामुळे सकाळी अकरा वाजताच्या आत नागरिक महत्त्वाची कामे आटोपण्यावर भर देत आहेत. दिवसेंदिवस उन्हाचा पारा वाढत चालल्याचे चित्र पाहायला मिळत असून, वाढत्या उन्हामुळे नागरिक हैराण झाले आहेत. उन्हातून प्रवास करणे जिकिरीचे होत आहे. अशा वातावरणात उष्णतेच्या लाटेने आजारी पडल्यावर पुरेसे उपचार व काळजी न घेतल्यास ते जीवावर बेतण्याची शक्यता नाकारता येत नाही. उष्माघात टाळण्यासाठी काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे. उन्हामुळे घराबाहेर पडणे देखील कठीण झाले आहे. सध्या उन्हाळ कांदा काढणीचे व साठवणुकीचे कामे सुरू आहेत.

मात्र, कडक उन्हामुळे शेती कामाचे वेळापत्रक बदलल्याचे चित्र ग्रामीण भागात दिसत आहे. यंदा मार्चपासूनच पारा वाढत आहे. मार्च अखेरीस ३७/३८ अंशांवर असलेला पारा आता एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यात ४१ अंशांवर गेला आहे. वाढत्या उन्हाचा परिणाम जनजीवनावर झाला असून, विशेषतः शेतीच्या मशागतीच्या कामावर जाणवत आहे. ग्रामीण भागात शेतीचे कामे युद्धपाताळीवर सुरू आहे. सध्या सर्वत्र लग्नतिथी खूपच दाट असल्याने अनेकांची धावपळ होत आहे. नातेवाईक, भावकीचे, प्रेमाचे सबंध असेल तिथे लग्नाला जावे लागते, मात्र अनेकांनी युक्ती लढवली आहे. शेतीकामे आटोपल्यानंतर संध्याकाळी सहकुटुंब हळदीच्या कार्यक्रमांना हजेरी लावत आहे. त्यामुळे शेतीकामातही व्यत्यय येत नाही. उन्हा-तान्हात प्रवास करण्याची गरज नाही अन् हळदीच्या कार्यक्रमाला वेळही भरपूर देता येतो. शिवाय जेवण निवांत होते. त्यामुळे सध्या लग्नापेक्षा हळदीच्या कार्यक्रमांना चांगली उपस्थिती असते.



# देवळ्यात जिजाऊ रथयात्रेचे स्वागत

**देवळा : प्रतिनिधी**

राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांच्या स्मरणार्थ निघालेल्या मराठा सेवा संघ संचलित रथयात्रेचे देवळा शहरात फटाक्यांची आतषबाजी करत या रथयात्रेचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

१८ मार्च रोजी संभाजीनगर जिल्ह्यातील भोसले गढी येथून सुरू झालेली जिजाऊ रथयात्रा ३९ दिवसांत ५ हजार किलोमीटर प्रवास करत असून, आतापर्यंत लाखो नागरिकांनी रथयात्रेचे स्वागत करून एकतेचा संदेश दिला आहे.

देवळा येथे प्रमुख मान्यवरांच्या हस्ते रथयात्रेतील सजवलेल्या रथावर विराजमान राजमाता माँ जिजाऊंच्या व शिवस्मारक छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला प्रथम कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती योगेश आहेर व मविप्रचे संचालक विजय पगार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून रथयात्रा पुढील ठिकाणी मार्गस्थ झाली.

यावेळी देवळा महाविद्यालयाचे प्राचार्य हितेंद्र आहेर, मविप्रचे माजी संचालक डॉ. विश्राम निकम, नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष मनोज आहेर, जितेंद्र आहेर, अतुल पवार, बाळासाहेब मगर, बाळासाहेब आहेर, सचिन सूर्यवंशी, दिलीप पाटील, जगदीश पवार, किशोर आहेर, जगदीश पवार, अमोल आहेर, नीलिमाताई आहेर आदी उपस्थित होते.



# नांदगावी हल्ल्याच्या निषेधार्थ सकल जैन समाजातर्फे मूक मोर्चा

**नांदगाव : प्रतिनिधी**

येथील सकल जैन समाजाच्या वतीने मुंबई येथील जैन मंदिर तोडल्याबद्दल तसेच काश्मीर येथे भारतीय पर्यटकांवर झालेल्या क्रूर हल्ल्याच्या निषेधार्थ मूक निषेध मोर्चा काढून नांदगाव पोलीस स्टेशन येथे निवेदन देण्यात आले.

मध्य प्रदेश येथे जैन साधूंवर झालेल्या भ्याड हल्ल्याचा, पतंजली कंपनीच्या रामदेवबाबा यांनी भगवान महावीरांच्या वरती केलेल्या विधानाचा व काही राजकीय नेत्यांनी धर्मावर केलेल्या टीकेचा यावेळी जाहीर निषेध करण्यात आला. या वेळी रस्त्यावरील अपघातांमध्ये पायी भ्रमण करणाऱ्या जैन साधू, साध्वी, संतांच्या अपघाती मृत्यूचे प्रमाण एकाएकी प्रचंड वाढले आहे. यावर चिंता व्यक्त करण्यात आली.

निवेदन देण्यापूर्वी जैन समाजबांधवांच्या वतीने मूक मोर्चा काढण्यात आला होता. पोलीस स्टेशनमध्ये मोर्चा आल्यानंतर ओसवाल भुवन प्रबंधक समितीचे अध्यक्ष दत्तराज छाजेड यांनी सकल जैन समाजाच्या वतीने दिलेल्या निवेदनाविषयी मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी खंडेलवाल दिगंबर जैन पंचायतीचे अध्यक्ष सुमेर कासलीवाल, महामंत्री महावीर ताराचंद पांडे, संघपती सुभाष लोढा, महामंत्री विजय चोपडा, ओसवाल भुवन प्रबंधक समितीचे उपाध्यक्ष कमलेश पारख, सचिन मनोहरमल पारख, महावीर पारख, आनंद कासलीवाल, आनंद चोपडा, सुशील कासलीवाल, महावीर सुराणा आदींच्या सह्या आहेत.

### अजमेर सौंदाणेत एकलव्य शाळेत मिलिटरी कॅम्प

**सटाणा :** बागलाण तालुक्यातील अजमेर सौंदाणे येथील एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल येथे राष्ट्रीय आदिवासी जनजातीय कार्य मंत्रालय व आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र शासन यांच्या उपक्रमानुसार मालेगाव उपप्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत शालेत विद्यार्थ्यांचा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली समर एनसीसी, मिलिटरी कॅम्प घेण्यात आला. या कॅम्पमध्ये विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम, सुरक्षा व कर्तव्य जबाबदारी याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य सुरेश देवरे हे होते. मोटार वाहन निरीक्षक ललित देसले, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक सोमनाथ घोलप, भारत भावाळ, शिवानी हांडगे यांनी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षासंदर्भात मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना उपप्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत रस्ता सुरक्षा संदर्भाची पुस्तके वाटप करण्यात आली. प्रमोद गोसावी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व गणेश गायसमुद्रे यांनी आभार प्रदर्शन केले.

# ओझर येथे जागतिक हिवताप दिन साजरा

**ओझरः प्रतिनिधी**

येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातर्फे जागतिक हिवताप दिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने विविध ठिकाणी व भागात रॅली काढण्यात आली.

राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम जिल्हा नाशिक अंतर्गत 'चला हिवतापाला संपवू या, पुन्हा योगदान द्या, पुनर्विचार करा, पुन्हा सक्रिय व्हा' या घोषवाक्यानुसार काल ओझर, ओझरटाऊनशिप, शेजवळवाडी, सोनेवाडी उर्दू शाळा, भगतसिंगनगर, दात्याणे, जिव्हाळे, थेरगाव, दिक्षी येथे जागतिक हिवताप दिनानिमित्त रॅली काढण्यात आली. रॅलीमध्ये गावातील ज्येष्ठ नागरिक, आशाताई, आरोग्य कर्मचारी, आशा सुपरवायजर, विद्यार्थी सहभागी झाले होते तसेच गावात ठिकठिकाणी गप्पी मासे सोडून त्याचे महत्त्व हिवताप निरीक्षक रवींद्र देवरे यांनी सांगितले.



वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद सुर्वे, डॉ. प्राची पवार, आरोग्य सहाय्यिका भारती कदम, प्रयोगशाळा वैद्यानिक अधिकारी पल्लवी कुलकर्णी, फार्मसी ऑफिसर सुमती ठाकूर, समुदाय आरोग्य अधिकारी प्रतिभा जुनागडे, आपला दवाखानाचे वैद्यकीय अधिकारी रिद्धी पाटील, कावेरी कदम, संगीता गाडे, आरोग्य सेविका मनीषा बागुल, दीपिका भामरे, करिष्मा काकड, प्रतिभा चौधरी, कारले सिस्टर, स्नेहल पवार, दवणे सिस्टर, नंदा देवर, केरूळकर सिस्टर, आरोग्य सेवक सतीश भामरे, प्रवीण राऊत, प्रशांत बिहाडे, मोतीराम थोरे, जयवंत राऊत, कमलेश पवार, रामटेके उमेश, समीर मुरुडेश्वर, विकास पीठे, अविनाश घोडविंदे तसेच सविता ढवळे, भारती लिलके, स्वाती पवार, मेघा वाघ, सुनीता निरभवणे, निर्मला जाधव, उन्हवणे ताई, चित्रा सुतार, पूनम गांगुर्डे, सुनीता तोंगारे, प्रा. आ. केंद्र स्वाती सिस्टर, सोनाली सिस्टर, सुवर्णा सिस्टर, वळवी सिस्टर लभडे सिस्टर, मोरे दीपाली यांनी प्रभातफेरी काढून आठवड्यातून एकदा कोरडा दिवस पाळायचे आवाहन केले,

घरी गप्पी मासे सोडण्याचा संकल्प कर्मचाऱ्यांनी केला. हिवतापावर सामुदायिक शपथ घेऊन हिवताप होऊ न देण्याचा संकल्प केला. पाण्याच्या टाक्या झाकून ठेवा, पाणी उघड्यावर ठेवू नका आदी आरोग्य शिक्षण दिले. रॅलीसाठी सर्व जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक, अंगणवाडी ताई, हायस्कूलचा शिक्षक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

# सहा दिवसांपासून बीएसएनएल नॉट रिचेबल

**नगरसूल : वार्ताहर**

येवला तालुक्यातील उत्तर-पूर्व भाग व नगरसूल व परिसरातील अनेक गावांमधील भारत दूर संचार निगम निगमची सेवा गेल्या शनिवारपासून ठप्प झाली आहे.

दूरसंचार निगमची मुख्य वाहिनी केबल तुटल्याने सेवा बंद असल्याचे कारण भारत दूरसंचार निगमच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. बीएसएनएल मोबाइल फोनधारकास नेटवर्कअभावी संपर्क तुटला आहे. त्यामुळे आर्थिक व्यवहार ठप्प झाले आहे. पोस्टातून व बँकेतून पैसे काढण्यासाठी आजूबाजूच्या गावामधील रहिवाशांची मोठी गर्दी पोस्ट ऑफिस व बँकेसमोर रोजच दिसत आहे. ग्रामीण रुग्णालयात असलेले टेलिफोन सुविधा देखील गेल्या सहा दिवसांत बंद आहे.




> येवल्याजवळ नांदगाव रोड परिसरात घर बांधकाम पाया खोदताना दूरसंचार सेवा वाहिनी केबल तुटली आहे. तेथील घरमालक सहकार्य करत नसल्याने व गावी निघून गेल्याने केबल जोडणीस विलंब होत आहे.
>
> **– एस. एन. मेंणदने,** विभागीय अभियंता, दूरसंचार निगम

> गेल्या सहा दिवसांपासून बीएसएनएलची नेटवर्क सेवा बंद पडल्यामुळे पोस्ट ऑफिस व जिल्हा बँक शाखेतील सर्व व्यवहार ठप्प झाले आहे. त्यामुळे रहिवाशांना अडचणीचा सामना करावा लागत आहे. त्वरित कारवाई करावी.
>
> **– डी. जी. भरते,** शाखा व्यवस्थापक, नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँक, नगरसूल

विकास सोसायटी व जिल्हा बँकेतून होणारे पीककर्ज वाटप खोळंबा झाला असल्याची तक्रार येथील शेतकरी संजय वैद्य, राजेंद्र धनवटे, गोरख बटवल, लक्ष्मण चव्हाण, दिलीप गिडगे, कारभारी कमोदकर, सुभाष बटवल, बाळनाथ साबळे, अनिल आहेर, रामनाथ कमोदकर, नवनाथ जाधव, अंबादास राऊत आदींनी केली आहे.

## त्र्यंबक तालुका ग्रामपंचायतींवर महिलाराज

**त्र्यंबकेश्वर : प्रतिनिधी**

त्र्यंबक तालुक्यातील ८५ ग्रामपंचायत सरपंचपदासाठी सर्व सरपंच अनुसूचित जमातीसाठी राखीव आहेत. त्यातील ५० टक्के स्त्री राखीव आरक्षण सोडत तहसील कार्यालयात प्रांताधिकारी ओमकार पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत काढण्यात आली.

यावेळी सन २०२० ते २०२५ दरम्यान स्त्री राखीव सरपंच असलेल्या ४२ ग्रामपंचायती वगळण्यात आल्या व उर्वरित ४३ ग्रामपंचायत सरपंचपद महिला राखीव असल्याचे जाहीर करण्यात आले. तालुक्यातील सन २०२५ ते २०३० या कालावधीतील अनुसूचित जमाती स्त्री राखीव सरपंच आरक्षण याप्रमाणे आहे.

टाकेदेवगाव, आळवंड, खरवळ, पेगलवाडी ना., रोहिले, सापगाव, वेळे, वाढोली, रायते, तोरंगण ह., देवडोंगरी, वायघोळपाडा, भुतमोखाडा, देवळा, कोणे, सामुंडी, खडकओहळ, कळमुस्ते ह., धुमोडी, गावठा, वाघेरा, डहाळेवाडी (विजयनगर), तोरंगण त्र्यं., मेटचंद्राची, अंबोली, पेगलवाडी त्र्यं., मेटघर किल्ला, सारस्ते, जातेगाव बु., गडदवणे, झारवड खु., कळमुस्ते त्र्यं., मुळेगाव, मुरंबी, देवडोंगरा, हरसूल, कोटंबी ह., पहिने, अंजनेरी, शिवाजीनगर, अस्वली हर्ष, चिंचओहळ, गोधड्याचापाडा.

# सेतू केंद्रावर ६९ तर घरपोच दाखल्यांसाठी मोजावे लागणार १२८ रुपये


## दरवाढीच्या आदेशाची २५ एप्रिलपासून अंमलबजावणी, शासनाने केली होती ५० व १०० रुपयांची तरतूद

**सिन्नर : भरत घोटेकर**

**आपले सरकार सेवा केंद्र किंवा सेतू केंद्रावर विविध प्रकारचे दाखले काढण्यासाठी आता सर्वसामान्यांना प्रति दाखला ६९ रुपये इतकी फी द्यावी लागणार आहे. याशिवाय घरपोच दाखल्यांसाठी १२८ रुपये मोजावे लागणार आहे. गेल्या महिन्यात अध्यादेश काढून शासनाने सेतू किंवा आपले सरकार सेवा केंद्रावर दाखल्यांसाठी ५० रुपये तर घरपोच दाखल्यांसाठी १०० रुपये फी आकारणी करण्यासंदर्भातील अध्यादेश काढला होता. प्रत्यक्षात मात्र त्यावर शासन कर आणि जीएसटी लादल्यामुळे मोठी वाढ झाली आहे.**

यापूर्वी २४ एप्रिल २०२५ पर्यंत सेतू केंद्रावर ऑनलाइन दाखला काढण्यासाठी २० रुपये पोर्टल फी, १० रुपये गव्हर्मेंट फी आणि १.८० पैसे प्रत्येकी केंद्र आणि राज्य शासनाचा जीएसटी असे मिळून ३३.६० रुपये इतक्या रकमेची पावती सामान्य ग्राहकांच्या हाती पडत होती. मात्र, ही रक्कम तोकडी असल्याने त्यात वाढ करावी, अशी मागणी राज्यभरातील सीएससी चालकांकडून होत होती. त्यानंतर राज्य शासनाने ही रक्कम ५० रुपये आणि घरपोच दाखल्यांसाठी १०० रुपये इतकी रक्कम आकरण्यासंदर्भातअध्यादेश काढला. प्रत्यक्षात मात्र त्यात ५० रुपये पोर्टल फी, १० रुपये गव्हर्नमेंट फी आणि प्रत्येकी ४.५० रुपये केंद्र आणि राज्य शासनाचा जीएसटी असे एकूण ६९ रुपयांची पावती हाती पडल्याने ग्राहकही अचंबित झाले आहे.


याशिवाय घरपोच दाखल्यांसाठी १०० रुपये आकारणी केली जाईल, असे शासनाने अध्यादेशात नमूद केले आहे. प्रत्यक्षात मात्र त्यातही तब्बल २८ रुपयांची वाढ करण्यात आली असून, घरपोच दाखल्यांसाठी आता ग्राहकांना १२८ रुपये मोजावे लागणार आहे.



| Setu Application | | |
|---|---|---|
| Portal Fee : | Rs. | 50 |
| Govt. Fee : | Rs. | 10 |
| Online Application Charges: | Rs. | 0 |
| S.G.S.T(9%) : | Rs. | 4.50 |
| C.G.S.T(9%) : | Rs. | 4.50 |
| Lamination Charges : | Rs. | 0 |
| Service Tax : | Rs. | 0.0 |
| Total Charges : | Rs. | 69.00 |

Inword Number : 000 12228404
Receipt No. : 26704
Applicant Name : 5219/ Deshmukh Vaibhavi Ashis
Service Name : Domicile Certificate
Setu Center : Setu Suvidha Kendra, Sinnar
Inword Date : 25/04/2025
Expected Issue Date : 10/05/2025

**१)नवीन दरानुसार सेतू केंद्रावर दाखल्यांसाठी आकारल्या जाणाऱ्या रकमेची पावती.**



| Charge | |
|---|---|
| Dept Fee | ₹ 0.00 |
| Govt Fee | ₹ 10.00 |
| Portal Fee | ₹ 100.00 |
| Other Charges | ₹ 0.00 |
| S.G.S.T (9%) | ₹ 9.00 |
| C.G.S.T (9%) | ₹ 9.00 |
| Total | ₹ 128.00 |
| Total Words | Rupees One Hundreds Twenty Eight Only |

**२) घरपोच दाखल्यासाठी आकारली जाणारी पावती.**

### सीएससी सेंटरवर पावती देण्याला बगल

यापूर्वी शासन नियमानुसार एका दाखल्यासाठी ३३.६० रुपये इतक्या रकमेची पावती शासनाच्या आपले सरकार सेवा केंद्राच्या पोर्टलवर निघत होती. प्रत्यक्षात मात्र गावोगावचे आपले सरकार सेवा केंद्राचे संचालक ग्राहकांना पावती न देताच एका दाखल्यासाठी सरासरी १०० ते १५० रुपये इतकी फी आकारात होते. नव्याने शासनाने दाखल्यांच्या रकमेत वाढ केल्याने सीएससी सेंटर चालकांकडून ग्राहकांची आणखी लूट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे तहसीलदारांनी शासन नियमानुसार सीएससी सेंटर चालकांनी प्रत्येक सामान्य ग्राहकाला अधिकृत पावती देणे बंधनकारक करावे, म्हणजे सामान्यांची लूट होणार नाही, अशी मागणी होत आहे.

### दरपत्रक लावणे बंधनकारक

सेवा हमी कायद्यानुसार प्रत्येक सीएससी चालकाने दर्शनीय भागात दरपत्रक लावणे बंधनकारक आहे. तशा सूचना सीएससी चालकांना दिल्या आहेत. शासनाने ठरवून दिलेल्या दरापेक्षा अधिकचे पैसे घेतल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यास, अशी केंद्र बंद करण्यात येतील. सीएससी चालकांवर वचक राहण्यासाठी रँडम तपासणीही करण्यात येणार आहे. – **सुरेंद्र देशमुख,** तहसीलदार, सिन्नर

## महत्त्वाचे



### सिन्नरला व्ही.आय.पी. इंडस्ट्रीजकडून पहलगाम हल्ल्याचा निषेध

सिन्नर : जम्मु-काश्मीरमधील पहलगाम बार्शियन खोरे येथे पर्यटनासाठी आलेल्या निष्पाप निरापराध, निशस्त्र पर्यटकांवर मंगळवारी (दि.२२) झालेल्या अमानवीय अतिरेकी हल्ल्याचा व्ही. आय. पी इंडस्ट्रीज लिमिटेड व व्ही. आय. पी. एम्प्लॉइज युनियनच्या वतीने निषेध करण्यात आला. पहलगाम बार्शियन खोरे येथे पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांवर पाक पुरस्कृत आतंकवादी संघटना टीआरएफने अंदाधुंद गोळीबार केला. या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झालेल्या पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या हल्ल्यात मृत्यू झालेल्याच्या कुटुंबियांना व जखमी झालेल्या नागरिकांना या दुःखातून सावरण्यास ईश्वर शक्ती देवो अशी प्रार्थना करण्यात आली. यावेळी व्ही. आय. पी. समूहाचे कार्यकारी संचालक आशिष कुमार साहा, एच. आर. आणि आय. आर. विभागाचे जनरल मॅनेजर सोपान गोडसे, व्ही. आय. पी. एम्प्लॉइज युनियनचे अध्यक्ष नरेंद्र कुमार व इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### प्रहार जनशक्ती पक्षाचे आंदोलन स्थगित

**सिन्नर :** शासनाकडून राज्यातील शेतकऱ्यांची फसवणूक केली जात असून, राज्यकर्त्यांना त्यांनी दिलेल्या आश्वासनांची आठवण करून देण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली दि. ४ मे रोजी करण्यात येणारे आंदोलन स्थगित झाले असल्याची माहिती तालुकाध्यक्ष कैलास दातीर यांनी दिली. विधानसभा निवडणुकीदरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. मात्र सत्ता मिळताच राज्यकर्त्यांना दिलेल्या आश्वासनांचा विसर पडला असून राज्यकर्त्यांना त्यांच्या आश्वसनांची जाणीव करून देण्यासाठी तसेच शेतकरी व कामगारांच्या प्रश्नांवर आवाज उठविण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली दि. ४ मे रोजी आंदोलन करण्यात येणार होते. मात्र, हे आंदोलन स्थगित करण्यात आले असून, दि. १४ मे रोजी मंत्र्यांच्या घरासमोर आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती तालुकाध्यक्ष कैलास दातीर यांनी दिली.

### आ. काळे यांचा सोमवारी जनता दरबार

**वावी :** सर्वसामान्य नागरिकांना विविध शासकीय कार्यालयांत येणाऱ्या अडीअडचणी समजून घेऊन त्या अडीअडचणी सोडविण्यासाठी आ. आशुतोष काळे यांनी जनता दरबार सुरू केल्यामुळे सर्वसामान्य जनतेला मोठा दिलासा मिळाला आहे. जनता दरबाराच्या माध्यमातून नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक होत असल्यामुळे सोमवार दि.२८ रोजी आ. आशुतोष काळे दुपारी २ वाजता कोपरगाव तहसील कार्यालयात जनता दरबार घेणार आहेत, अशी माहिती आ. आशुतोष काळे यांच्या जनसंपर्क कार्यालयाकडून देण्यात आली.

### वीजसमस्येने ग्रामस्थ त्रस्त



**सिन्नर :** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या पाथरे येथील ३३ केव्ही उपकेंद्रात वारंवार बिघाड होत असल्याने विजेच्या समस्यांनी पाथरेसह परिसरातील ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. पाथरे उपकेंद्रामध्ये कोट्यवधी रुपयांची झालेल्या निकृष्ट कामाबद्दलची चौकशी करण्यात यावी तसेच वीजपुरवठा सुरळीत करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात राज्याचे मुख्यमंत्री तथा उर्जामंत्री, कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, खासदार राजाभाऊ वाजे, सचिव विज वितरण कंपनी, अधीक्षक अभियंता नाशिक विभाग यांना निवेदन देण्यात आले आहे. पाथरे येथील उपकेंद्रात ना. माणिकराव कोकाटे यांच्या प्रयत्नातून १० एम.व्ही. ट्रान्स्फॉर्मर, नवीन ब्रेकर, नवीन गावठाण फिडर अशी कोट्यवधीची कामे करण्यात आली. परंतु सदरची कामे अधिकाऱ्यांच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे अतिशय नित्कृष्ट दर्जाची झाली असल्याची तक्रार ग्राहकांनी केली आहे. त्यामुळे पाथरे उपकेंद्रातून होणारा विजपुरवठा कायम खंडित होतो. ऐन उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये वीजपुरवठा सातत्याने खंडित होत असल्यामुळे ग्राहकांना, व्यावसायिकांना, शेतकऱ्यांना आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागत आहे. उपकेंद्रात सतत बिघाड होऊन वीजपुरवठा खंडित होत आहे. याकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याची तक्रार शेतकरी, ग्रामस्थांनी केली आहे. तसेच नवीन वीजवाहिनी ज्या शेतकऱ्यांच्या शेतातून टाकलेली आहे ते पोलही तिरपे झाले आहे. त्यापासून धोका निर्माण होऊ शकतो. संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत वारंवार कळवूनही त्यांच्याकडून उडवा उडवीचे उत्तरे ग्राहकांना मिळतात. त्यामुळे पाथरे व परिसरातील ग्रामस्थ, ग्राहक, शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या उपकेंद्राच्या झालेल्या निकृष्ट कामांची चौकशी करावी व वीजपुरवठा सुरळीत करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली.

# दूध उत्पादकांना जनावरांसाठी अनुदानावर पाळणा देण्याची मागणी

**सिन्नर : प्रतिनिधी**

जिल्ह्यातील दूध उत्पादकांना गायी व म्हैस यासाठी शासनामार्फत शंभर टक्के अनुदानावर पाळणा उपलब्ध करून देण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रेय गोसावी यांनी खासदार राजाभाऊ वाजे यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

नाशिक हा दूध उत्पादक शेतकऱ्यांचा जिल्हा असून, दूध व्यवसायातून शेतकऱ्यांना शेतीसाठी भांडवल तसेच दैनंदिन खर्चासाठी बऱ्यापैकी आर्थिक हातभार लागतो. परंतु सद्यस्थिती दूध उत्पादक शेतकऱ्यांना गाई म्हैस सांभाळणे अवघड झाले असून त्यांचा दैनंदिन खाद्यावरील खर्च मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे त्या प्रमाणात दुधाला दरदेखील मिळत नाही. जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य झालेले असून पशुधन सांभाळणे अत्यंत जिकरीचे झालेले आहे. उन्हाचा पारा ४० पेक्षापुढे गेल्यामुळे त्याचा



परिणाम होऊन अनेक गाई, म्हशींना आजाराचा सामना करावा लागत आहे. गायींना पक्षघाताचा झटका येऊन शरीर निकामी होणे, पाय मोडणे इत्यादी आजार उद्‌भवल्यास गायीला स्वतःच्या पायावर उभे राहता येत नाही.

त्यामुळे दूध उत्पादकांना दुधाची धार काढणे अवघड होत असते. त्यासाठी पाळण्यामध्ये गाई उभी करून गायीचे दूध काढले जाते. परंतु या पाळण्याची किंमत वीस ते पंचवीस हजार असून प्रत्येक दूध उत्पादकाला हा पाळणा विकत घेणे शक्य नसल्यामुळे गायीला आजार उद्‌भवल्यास काही ठिकाणाहून हा पाळणा भाड्याने आणावा लागतो.

# शिवडेकरांच्या विरोधापुढे न.प.ने टेकले गुडघे

## गळती काढण्याच्या कामास तूर्तास ब्रेक, लाखो लिटर पाण्याची नासाडी, पाणीपुरवठा पूर्ववत

**सिन्नर : प्रतिनिधी**

शिवडेकरांच्या वाढत्या विरोधामुळे नगरपालिका प्रशासन हातबल झाले आहे. शिवडे बंधाऱ्यातील लिकेज काढण्यास स्थानिक ग्रामस्थांचा असलेला विरोध दूर करण्यास पालिका प्रशासन अपयशी ठरले. त्यामुळे गळती न काढताच, आहे त्याच स्थितीत शुक्रवारी (दि.२५) पहाटेच नगरपालिकेने कडवा धरणातून पंपिंग सुरू करत सिन्नर शहराचा पाणीपुरवठा सुरू केला.

कडवा धरणातून दररोज २ कोटी लिटर पाणी पंपिंग करून सिन्नर शहरासाठी उचलले जाते. मात्र, शिवडे येथे असलेल्या बंधाऱ्यातील गळतीमुळे दररोज सुमारे ५० ते ६० लाख लिटर पाणी वाया जाते. त्यामुळे शहराला सहा दिवसांनी पाणी मिळते. तेही मुबलक प्रमाणात मिळत नाही. त्यामुळे ही गळती काढणे अत्यंत गरजेचे असतानाही नगरपालिका प्रशासन आणि शिवडे ग्रामस्थांच्या वादात पोलीस बंदोबस्तात हे काम करण्यास प्रशासन अपयशी ठरले. मुख्याधिकारी रितेश बैरागी १० दिवसांच्या रजेवर गेल्याने त्यांच्या अनुपस्थितीत गळती काढण्याचा केलेला प्रयत्न असफल ठरला. त्यामुळे मुख्याधिकारी रुजू झाल्यानंतर गळती काढण्यासंदर्भात ते कठोर भूमिका घेतात की नाही हे पहावे लागणार आहे. शिवडे ग्रामस्थ आणि नगरपालिका प्रशासन यांच्या वादावर तोडगा न निघाल्यास गळती तशीच सुरू राहील. आणि आगामी काळातही सिन्नरकरांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागेल.

### पोलीस बंदोबस्ताचा ६० हजारांचा खर्च पाण्यात

पालिका प्रशासनाने सुमारे ६० हजार रुपये पोलिस बंदोबस्तासाठी मोजून गळती काढण्यासाठी २४ एप्रिलचा मुहूर्त शोधला होता. त्यानुसार गुरुवारी पालिकेचे पथक बंदोबस्तासह गळती काढण्यासाठी शिवडेत गेले होते. मात्र दिवसभर चर्चा करूनही त्यातून तोडगा निघाला नाही. त्यामुळे त्यांना रित्या हाती परतावे लागले. त्यानंतरही शिवडेरांचा विरोध कायम असल्याने गळती काढणे शक्य नसल्याचे लक्षात येताच पालिका प्रशासनाने माघार घेतली. साहजिक बंदोबस्तासाठी भरलेला ६० हजार रुपयांचा खर्च पाण्यात गेला.

### असा आहे वाद

सिन्नर नगरपालिकेने गत पदाधिकाऱ्यांना आताशी धरून गावातील गावठाण हद्दीतून जलवाहिनी केल्याचा आरोप शिवडे ग्रामस्थांनी केला आहे. त्या गावाला अत्यल्प गावठाण असून तेथे ग्रामपंचायत इमारतीसाठी जागा आवश्यक असताना नगरपालिकेकडून जलवाहिनी असल्यामुळे ना हरकत मिळत नसल्याने सव्वा कोटीच्या इमारतीचे काम रखडले आहे. त्यामुळे ही जलवाहिनी गावाच्या बाहेर शिफ्ट करावी, अशी येथील ग्रामस्थांची मागणी आहे. तर नगरपालिकेने रीतसर परवानगी घेऊन जलवाहिनी टाकली आहे. ती नवीन जागेत स्थलांतरित करण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च येणार असून त्यासाठी निधी नसल्याने तूर्तास तरी हे काम अशक्य असल्याची भूमिका नगरपालिकेने घेतली आहे. त्यामुळे जोपर्यंत नगरपालिका जलवाहिनी शिफ्ट करत नाही तोपर्यंत शिवडे बंधाऱ्यातील लिकेज काढू न देण्याची भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे.

# १८ गरजू विद्यार्थ्यांना मोफत सायकलचे वाटप

## शिक्षणाची वाट होणार सुकर; गोंदेश्वर रोटरी क्लबचा समाजोपयोगी उपक्रम

**सिन्नर : प्रतिनिधी**

सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या येथील गोंदेश्वर रोटरी क्लबकडून तालुक्यातील पिंपळे माध्यमिक विद्यालयातील १५ आणि पुतळेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेतील ३ अशा एकूण १८ गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना मोफत सायकल वाटप केले. गोंदेश्वरच्या या उपक्रमामुळे या विद्यार्थ्यांची पायपीट थांबून त्यांची शिक्षणाची वाट सुकर होणार आहे.

रोटरी क्लबसाठी दरवर्षी डिस्ट्रिक्ट ग्रँडमधून काही कॉमन प्रोजेक्ट येत असतात. त्यासंदर्भात प्रत्येक क्लबने डिस्ट्रिक्ट ग्रँडकडे मागणी करायची असते. गोंदेश्वर रोटरी क्लबने १८ सायकलची मागणी डिस्टिक ग्रँडला केली होती व ती डिस्ट्रिक्ट ग्रँडने मान्य केली.



**पिंपळे व पुतळेवाडी येथील गरजू विद्यार्थ्यांना मोफत सायकल वितरण करताना गोंदेश्वर रोटरी क्लबचे पदाधिकारी.**

सायकलसाठी क्लब कडून काही प्रमाणात चार्जेस भरायचे असतात. सिन्नर तालुक्यातील पिंपळे येथील माध्यमिक विद्यालयातील गरीब होतकरू असे १५ विद्यार्थी व पुतळेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेतील मुलांसाठी ३ सायकलचे मोफत वाटप करण्यात आले.

यासाठी लागणारा सर्व खर्च माजी अध्यक्ष बाळासाहेब सदगीर व सेक्रेटरी दत्ता नवले यांनी केला. गोंदेश्वर रोटरी क्लबसाठी डिस्ट्रिक्ट ग्रँडकडून एकूण ७२ हजार रुपयाच्या १८ सायकल मिळाल्या. शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, विद्यार्थ्यांचे पालक यांना आमंत्रित करून हॉटेल पंचवटी येथे १८ सायकल हस्तांतरित केल्या. हे सर्व विद्यार्थी दररोज शाळेत ३ ते ४ किलोमीटर वरून पायी चालत चालत ये जा करतात. त्यांना सायकल मिळाल्याने रोजची पायपीट थांबणार असून, वेळेची बचत होण्याबरोबरच शिक्षणाचा मार्गही सुकर होणार आहे.

या प्रसंगी रोटरीचे अध्यक्ष सुरेश जोंधळे, सेक्रेटरी दत्ता नवले, किरण भंडारी, रवी मोगल, सुधीर जोशी, महेश बोराडे, राहुल शिंदे, कैलास शिंदे, प्रसाद पाटोळे, विनोद दंताळ, दीपक वर्पे, सतिश नेहे आदी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सातपूरच्या प्रादेशिक कार्यालयात उद्योजकांची अडवणूक

## १५ दिवस फाइल पडून राहत असल्याने नाराजी

### मुख्यमंत्र्यांच्या ७ कलमी कार्यक्रमाला हरताळ

मुख्यमंत्री देवेंद्री फडणवीस यांच्याकडून १०० दिवसांचा सात कलमी कार्यक्रम घोषित झाला आहे. यात उद्योजकांचे विविध प्रश्न सोडवण्यावर भर देण्यात आला आहे. मात्र, प्रत्यक्षात प्रादेशिक कार्यालयातच अडवणूक होत असल्याने मुख्यमंत्री यांनी घोषित केलेल्या सात कलमी कार्यक्रमालाच हरताळ फासला जात असल्याचे चित्र आहे.

**सिन्नर : प्रतिनिधी**

औद्योगिक विकास महामंडळाच्या सातपूर येथील प्रादेशिक कार्यालयाच्या कारभाराबाबत उद्योजकांत संताप व्यक्त केला जात आहे. १५ ते २० दिवस फाइल तशीच पडून राहते. त्यामुळे उद्योजकांना कामासाठी वारंवार चकरा माराव्या लागत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. उद्योजकांचे काम वेळेवर होत नसल्याने अधिकाऱ्यांच्या कामकाजाबाबत नाराजीचा सूर आहे.

प्रादेशिक कार्यालयात अनेक उद्योजकांच्या फाईल पडून आहेत. हस्तांतर, ट्राय पार्टी करारनामा, भाडेपट्टे करार, विविध कारणांसाठी दाखले, परवानग्या आदींसाठी उद्योजकांचा कायम प्रादेशिक कार्यालयाशी संपर्क येतो. परंतु, मंजुरीसाठी दिलेल्या फाईल अनेक दिवस पडून राहतात. त्याकडे अधिकारी ढुंकूनही पाहत नाहीत. या कामांसाठी उद्योजकांना उद्योग, महत्वाची कामे सोडून कार्यालयात चकरा माराव्या लागत आहेत.

सिन्नरसह, सातपूर, अंबड, दिंडोरी, विंचूर आदी ठिकाणचे उद्योजक या उदासीन कारभाराने वैतागले आहेत. अनेक उद्योजक काम होत नसल्याने चकरा मारुन मेटाकुटीस आले आहेत. उद्योजकांची होत असलेली ही अडवणूक जिल्ह्यातील आर्थिक भरभराटीस चांगली नाही.

### कन्सल्टंट पाहून फाइलचा निपटारा

प्रादेशिक कार्यालयात उद्योजकांना कामाचा कन्सल्टंट कोण आहे हे विचारून फाइलला हात लावण्याची प्रथा रूढ झाली आहे. अनेक उद्योजकांच्या याबाबत तक्रारी आहेत. उद्योजकाने कन्सल्टंट कोण याची माहिती दिल्यानंतरच फाइलला हात लावला जातो. शिवाय उद्योजक कारखाना सोडून जास्त वेळ देऊ शकत नाही. ही अडवणूक तातडीने थांबवावी. – **रतन पडवळ,** विश्वस्त, सीमा

# सिन्नर नागरीच्या थकबाकीदारांच्या मालमत्तेचा होणार लिलाव

## पतसंस्थेतील ठेवीदारांना पैसे मिळण्याची आशा

**सिन्नर : प्रतिनिधी**

थकबाकीदारांचे पैसे वसूल करण्यासाठी सर्व मार्गांचा अवलंब करून, कायदेशीर बाबी व पोलीस यंत्रणांच्या सहाय्याने थकबाकीदारांच्या तारण व इतर मालमत्तांचा लवकरच लिलाव करण्यात येईल. या कामासाठी अंतिम प्रस्ताव तयार करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असल्याचे आश्वासन सहाय्यक निबंधक संजय गिते यांनी ठेवीदारांना दिले.

नुकतीच सिन्नर नागरी पतसंस्थेच्या ठेवीदारांची व सहाय्यक निबंधक संजय गिते यांच्यासमवेत बैठक पार पडली. निबंधकांच्या कठोर भूमिकेमुळे अनेक वर्षांपासून अवसायनात निघालेल्या सिन्नर नागरी पतसंस्थेत व निबंधक कार्यालयात ठेवी परत मिळण्यासाठी चकरा मारून हवालदिल झालेल्या गुंतवणूकदारांना कष्टाचे पैसे परत मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. संस्थेची थकीत कर्जांची वसुली वाढविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत असून, लिलावाचे वेळी ठेवीदारांनी लिलावात भाग घ्यावा, असेही आवाहन वसुली अधिकारी शेंडे यांनी केले.

त्याचप्रमाणे संस्थेच्या मालकीच्या मालमत्तांचाही लिलाव करावा, अशी मागणी उपस्थित ठेवीदारांनी यावेळी केली. परंतु, संस्थेच्या मालमत्ता न्यायालयीन प्रक्रियेत असल्यामुळे न्यायालयाच्या परवानगीशिवाय मालमत्तांचा लिलाव करता येणार नाही, असे यावेळी अधिकाऱ्यांनी सांगितले. यावेळी संतप्त ठेवीदारांनी आमची रास्त मागणी लेखी स्वरूपात न्यायालयाला व संबंधित अधिकाऱ्यांना पाठवा अशी मागणी केली. जे ठेवीदार मृत झालेले आहेत त्यांच्या वारसांनी आपले वारस नोंद करून घेण्याचे आवाहन यावेळी केले. तत्पूर्वी सहाय्यक निबंधक यांच्यासह सर्व ठेवीदार, संबंधित अधिकारी यांनी ठेवीदारांचे गाऱ्हाणे मांडण्यासाठी सोमवार दि. २८ एप्रिल २५ रोजी सकाळी ११ वा. जिल्हा निबंधक कार्यालय नाशिक येथे हजर राहण्याचे ठरविण्यात आले. बैठकीत सर्वश्री शेळके, भुसे, डॉ. जी. एल. पवार, नाशिक प्रादेशिक परिवहन कार्यालयातील सेवा निवृत्त अधिकारी राजेंद्र घोगे, भाऊसाहेब सांगळे, दिवाकर पवार, कृष्णा पवार आदींनी चर्चेत भाग घेतला. यावेळी सभासद दशरथ लोंढे, तानाजी जाधव, सोमनाथ तांबे, सुरेश आव्हाड, श्रीकांत गुजराथी, संध्या बिडवे, मालन इंदूरकर, रोशन पवार, निवृत्ती डावरे, बाळासाहेब घोलप, सुबोध वाईकर, विनोद वाईकर, दत्तात्रय डोंगरे, शांता लोंढे आदी उपस्थित होते.



**अवसायनात निघालेल्या सिन्नर नागरी सहकारी पतसंस्थेच्या ठेवीदारांच्या बैठकीत मार्गदर्शन करताना निबंधक संजय गीते.**

### २० जूनला घेणार पुन्हा आढावा

थकबाकीदारांच्या मालमत्तांची लिलाव प्रक्रीया सुरु झाल्यानंतर त्याची वृत्तपत्र व इतर माध्यमातून करण्यात येणारी जाहिरात पतसंस्थेच्या सर्व सभासदांना व संबंधित अधिकाऱ्यांना सहाय्यक निबंधक व जिल्हा निबंधक कार्यालयाकडून करण्यांत येईल असे आश्वासन सहाय्यक निबंधक संजय गीते, वसुली अधिकारी शेंडे यांनी उपस्थित ठेवीदारांना दिले. याबाबत दि. १९ जुन २०२५ पर्यत झालेल्या व उर्वरित कार्यवाहीचा अहवाल व अंतीम निर्णय घेण्यासाठी दि. २० जुन २०२५ रोजी पुन्हा ठेवीदार व संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेण्यात येईल असे गीते यांनी सांगितले.

# वावी पोलीस ठाण्यात वाहनांचा लिलाव

**सिन्नर :** तालुक्यातील वावी पोलीस ठाण्याच्या आवारामध्ये वर्षानुवर्षे बेवारस व गुन्ह्यातील तसेच अपघातग्रस्त दुचाकी व चारचाकी वाहने मोठ्या प्रमाणात पडलेले असून, या वाहनांचा लिलाव करण्यात येणार असल्याची माहिती सहाय्यक पोलिस निरीक्षक गणेश शिंदे यांनी दिली. सध्या मुख्यमंत्र्यांचा १०० दिवसांचा कृती आराखडा अंतर्गत पोलीस ठाणे आवारातील निर्गती करणेबाबत वरिष्ठ पातळीवरून पोलिस ठाण्यांना आदेशित करण्यात आले आहे. वावी पोलीस ठाण्याच्या आवारात वर्षानुवर्षांपासून पडून असलेले बेवारस, गुन्ह्यातील तसेच अपघातग्रस्त वाहनांची कागदपत्रे वावी पोलिस ठाण्यात घेऊन येऊन कागदपत्रांची पडताळणी करून आपापले वाहन दि.२८ एप्रिलपर्यंतपावेतो घेऊन जावे, अन्यथा या वाहनांचे प्रादेशिक परीवहन अधिकारी यांनी ठरवून दिलेल्या मानंकाप्रमाणे लिलाव करण्यात येईल.



देवळ्यात जिजाऊ रथयात्रेचे स्वागत पान ६



उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी





येवल्यात सकल हिंदू समाजाचा निषेध मोर्चा पान ६



gavakari.in gavkarinews.com

नाशिक, शनिवार, दि. २६ एप्रिल २०२५


## महत्त्वाचे



### संत निरंकारी फाउंडेशनतर्फे २९१ बॅगा रक्त संकलन

**नाशिक :** संत निरंकारी मिशनद्वारे बाबा गुरबचनसिंहजी यांच्या पावन स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित रक्तदान शिबिरात २९१ दात्यांनी रक्तदान केले. या शिबिराचे उद्घाटन खासदार भास्कर भगरे व राजाभाऊ वाजे, मुंबई नाका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष नरुटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुंबई सेक्टर संयोजक श्रीधर पाटील व राजन आमले यांनी मान्यवरांचे स्वागत केले. मानव एकता दिवसाच्या याप्रसंगी मिशनकडून देशभर यावर्षीसुद्धा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनमार्फत सुमारे ५००हून अधिक शाखांमध्ये भव्य रक्तदान शिबिरांची अखंड शृंखला आयोजित करण्यात आली. संत निरंकारी हेल्थ सिटीच्या मेडिकल डायरेक्टर गीतिका दुग्गल यांनी माहिती देताना सांगितले, की आज संपूर्ण भारतभर आयोजित रक्तदान शृंखलेअंतर्गत सुमारे ३०,००० युनिट रक्त संकलित करण्यात आले. ज्यामध्ये केवळ दिल्ली येथील शिबिरात जवळपास १००० युनिट रक्त जमा करण्यात आले. हे महाअभियान केवळ रक्तदान नसून, सद्गुरू माता सुदीक्षाजी महाराज यांचा करुणा, सेवा आणि एकत्वाचा संदेश जीवनात उतरविण्याचे सजीव माध्यम आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

### गुरु गोबिंद सिंग अभियांत्रिकीत जागतिक पुस्तक दिन साजरा



**सिडको :** जागतिक पुस्तक दिनानिमित्त गुरु गोबिंद सिंग अभियांत्रिकी महाविद्यालय आणि संशोधन केंद्र, नाशिक यांनी महाविद्यालयाच्या ग्रंथालयात एक अर्थपूर्ण कार्यक्रम आयोजित केला. शिक्षक आणि विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी तसेच भारतीय ऐतिहासिक गोष्टी माहीत असाव्यात म्हणूनच अशा पुस्तकांचे वाटप करण्यात आले. सदर पुस्तके ही महाविद्यालयास, संस्थेचे सेक्रेटरी सरदार कुलजितसिंग बिर्दी सर यांनी शूर सेनापती संताजी घोरपडे यांवर आधारित व डॉ. बी. जी. शेखर पाटील लिखित पुस्तकाच्या ५०० प्रति महाविद्यालयास भेट म्हणून दिल्या. याप्रसंगी प्राचार्य डॉ. नीलकंठ निकम यांनी शैक्षणिक समृद्धी वाढवण्यासाठी सरदार कुलजितसिंग बिर्दी यांचे उदार योगदान आणि पाठिंब्याबद्दल मनापासून आभार मानले. प्रास्ताविक ग्रंथपाल निशिगंधा खैरे यांनी केले. कार्यक्रमासाठी संस्थेचे मुख्य प्रशासकीय अधिकारी आशुतोष शर्मा, डीन डॉ. सी. डी. मोहोड, रजिस्ट्रार मनोज कोळी तसेच विविध विभागांचे विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# जेलरोडला पाण्याची नासाडी

## मनपाचा पाणीपुरवठा विभाग मात्र निद्रावस्थेत

**नाशिक : प्रतिनिधी**

**शहरात एकीकडे नागरिक पाण्यासाठी संताप करत असताना, दुसरीकडे मात्र महापालिकेच्या दुर्लक्षामुळे जेलरोड परिसरात लाखो लिटर पाणी वाया जात आहे. मात्र, याप्रकरणी पालिकेचा पाणीपुरवठा विभाग निद्रिस्त अवस्थेत गेल्याचे चित्र आहे.**

याबाबत माहिती अशी की, जेलरोडच्या पाण्याच्या टाकीजवळ जलवाहिनी फुटल्याने दररोज सायंकाळी अक्षरश: लाखो लिटर पाणी वाया जात आहे. या फुटलेल्या जलवाहिनीचे पाणी खाली वाहत जात गोदावरी नदीला मिळत असल्याची माहिती नागरिकांनी दिली. जलवाहिनी त्वरित दुरुस्त करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. जेलरोडच्या इंगळेनगर चौकात महापालिकेचा जलकुंभ आहे. त्याच्याजवळ जलवाहिनी फुटल्याने मोठ्या प्रमाणावर पाणी वाहत आहे.

गेल्या काही दिवसांपासून पाण्याचे पाटच वाहत आहेत. ग्रामीण भाग व आदिवासी पाड्यांवर पाण्याची तीव्र टंचाई असताना नाशिक शहरात पाण्याची अक्षरश: पाण्याची नासाडी होत असल्याने तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. महापालिकेने त्वरित कार्यवाही करण्याची मागणी होत आहे. मागील काही दिवसांपासून शहरात कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांची पाण्यासाठी अक्षरश: दमछाक होत आहे. याविरोधात तर राजकीय पक्षांनी आंदोलनं केली. मात्र, दुसऱ्या बाजूला पालिकेच्या निष्काळजीपणामुळे लाखो लिटर पाण्याची नासाडी होत आहे.





मनपाच्या पाणीपुरवठा विभागाने तत्काळ लक्ष घालून वाया जाणारे पाणी थांबवावे. नागरिकांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असून, मनपाच्या दुर्लक्षामुळे पाण्याची नासाडी होत आहे. त्यामुळे पालिकेने वाया जाणारे पाणी थांबवावे. **-संतोष कांबळे,** सामाजिक कार्यकर्ते


# अंबडला जलवाहिनी फुटल्याने लाखो लिटर पाण्याचा अपव्यय

## विद्युत तारा भूमिगत करताना जेसीबीमुळे घडला प्रकार

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

अंबडमधील माऊली चौक, दत्तनगर परिसरात स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार विद्युत तारा भूमिगत करण्याच्या कामादरम्यान जेसीबीचा धक्का लागून मुख्य जलवाहिनी फुटल्याने हजारो लिटर पाणी वाया गेले. यामुळे परिसरातील हजारो घरांचा पाणीपुरवठा शुक्रवारी दिवसभर खंडित होता. नागरिकांना पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ आली.

महावितरण विभागामार्फत अंबडच्या घरकुल रोड व माऊली चौक परिसरात भूमिगत वीजवाहिनी टाकण्याचे काम सुरू आहे. गुरुवारी रात्री उशिरा खोदकाम सुरू असताना जेसीबीच्या धडकेत मुख्य जलवाहिनी फुटली. मात्र, याची वेळेवर दखल घेतली गेली नाही. शुक्रवारी पहाटे पाच वाजता पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर फुटलेल्या जलवाहिनीतून हजारो लिटर पाणी रस्त्यावर वाहून गेले. परिणामी, माऊली चौक, शिरसाठ मळा, दोंदे मळा, दातीर मळा, दत्तनगर या परिसरात सर्वत्र पाण्याचे ओहळ, चिखल व अस्वच्छता पसरली होती. पाणीपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांची मोठी गैरसोय झाली. पिण्याच्या पाण्यासाठी अनेकांना शेजारील भागांत धाव घ्यावी लागली. विशेष म्हणजे महापालिका प्रशासनाकडून तत्काळ कोणतीही कारवाई न झाल्यामुळे नागरिकांत नाराजी व्यक्त केली जात होती. दरम्यान, सामाजिक कार्यकर्ते शरद दातीर यांनी महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांना घटनेची माहिती दिल्यानंतर घटनास्थळी कर्मचारी दाखल झाले. दिवसभर जलवाहिनी दुरुस्तीचे काम सुरू राहिले, मात्र यामुळे अनेकांना सकाळी व दुपारी पाण्याशिवाय राहावे लागले. या संपूर्ण प्रकरणामुळे प्रशासनाचा अकार्यक्षम व नियोजनशून्य कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.



# बालविवाह रोखण्यासाठी सोशल मीडियाचा वापर करावा

## उपजिल्हाधिकारी : जिल्हा कृती दलाची बैठक

**नाशिक : प्रतिनिधी**

अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर होणारे बालविवाह रोखण्यासाठी सोशल मीडियाचा प्रभावी वापर करून, दुर्गम भागात जनजागृती करावी, अशा सूचना उपजिल्हाधिकारी (प्रशासन) तुकाराम हुलवळे यांनी काल दिल्या.

महिला व बालकल्याण विभाग जिल्हा परिषद नाशिक, युनिसेफ एस.बी.सी. ३ यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या बालविवाह निर्मूलन प्रकल्पांतर्गत बालविवाह निर्मूलन जिल्हा कृती दलाची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृह येथे उपजिल्हाधिकारी हुलवळे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी ते बोलत होते. बालविवाहाचे प्रमाण अधिक असलेल्या गावांमध्ये सक्षम युवा शक्ती कार्यक्रमांतर्गत सक्षम दिवस राबविला जाणार असल्याचे सांगितले. बालविवाहमुक्त जिल्हा कृती आराखडा तयार करण्यात आला असून, यामध्ये ग्रामपंचायत, महिला व बालविकास विभाग, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग तसेच जिल्हा बालसंरक्षण कक्ष या विभागांमार्फत आराखडा अंमलबजावणी सुरू असल्याचे सांगितले. बालविवाह जिल्हा मुक्त करण्यासाठी करण्यात येत असलेल्या उपाययोजना आणि १२५ शाळांत घेण्यात आलेल्या विद्यार्थी व पालक सत्राबाबत यावेळी माहिती दिली. सर्व यंत्रणांनी समन्वयाने गावागावांत जनजागृती करावी. यात प्रामुख्याने पोलीस विभाग, ग्रामपंचायत विभाग, शिक्षण व आरोग्य विभाग तसेच महिला व बालविकास विभाग यांनी बालकल्याण समितीच्या मदतीने गावात जनजागृती करावी तसेच बालविवाह रोखण्यासाठी १०९८ या नंबरवर माहिती द्यावी, असे हुलवळे यांनी सांगितले. या बैठकीस विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



# उन्हाळी सुट्ट्यांमुळे एसटीकडून प्रवाशांसाठी जादा बसेसची सोय

**नाशिक : प्रतिनिधी**

शाळांना कालपासून उन्हाळी सुट्ट्या लागल्यामुळे गावाकडे तसेच पर्यटनासाठी जाणाऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठी राज्य परिवहन महामंडळाने जादा बसेसची सोय केली आहे. गर्दीचा हंगाम लक्षात घेऊन २५ एप्रिल ते जून या कालावधीत या जादा बसेस सोडण्यात येणार आहेत.

नाशिक आगार क्रमांक एकने नाशिक-चोपडा, नाशिक-संभाजीनगर, तर नाशिक आगार क्रमांक दोनमार्फत नंदुरबार, जळगाव, पाचोरा, सप्तशृंगगड, मालेगाव आागरातून छत्रपती संभाजीनगर, शिवाजीनगर, चाळीसगाव, सटाणा आगारामार्फत नंदुरबार, जळगाव, सिन्नर आगारामार्फत अहिल्यानगर, शिर्डी, नांदगाव आगाराने पाचोरा, छत्रपती संभाजीनगर, इगतपुरी आगाराने धुळे, चोपडा, नंदुरबार, लासलगाव आगाराने शिवाजीनगर, नाशिक, कळवण आगाराने शिवाजीनगर, नाशिक, पेठ आगाराने अहिल्यानगर, शिवाजीनगर, येवला, शिर्डी, मालेगाव, पिंपळगाव आगाराने नाशिक-नंदुरबार, नाशिक-शिरपूर, नाशिक-पाचोरा, नाशिक-धुळे या मार्गावर जादा बसेस सोडल्या आहेत. याशिवाय नाशिक-सप्तशृंगगड, नाशिक-त्र्यंबकेश्वर, नाशिक- शिर्डी या मार्गावर दर अर्ध्या तासाच्या अंतराने बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. उन्हाळी सुट्ट्या लागल्यानंतर विद्यार्थ्यांना मामाच्या गावाला जाण्याचे वेध लागतात.

# सफाई ठेका रद्दसाठी कर्मचारी युनियन आक्रमक

## आयुक्तांच्या दालनासमोर जोरदार घोषणाबाजी

**नाशिक : प्रतिनिधी**

महापालिकेने साफसफाई ठेकेदारी रद्द करावी, या मागणीवरून सफाई कर्मचारी विकास युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी आक्रमक होत महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्या दालनासमोर जोरदार घोषणाबाजी केली. अचानक झालेल्या या प्रकारामुळे आयुक्तांच्या दालन परिसरात गोंधळ उडाला. यावेळी संतप्त कर्मचारी विकास युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी थेट मनपा आयुक्त खत्री यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त करिश्मा नायर यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले की, साफसफाई आउटसोर्सिंग ठेकेदारीबाबत कोणतीही कार्यवाही होत नसल्याचे चित्र आहे. आउटसोर्सिंग साफसफाई निविदा रद्द करणे गरजेचे असताना विशिष्ट ठेकेदाराला डोळ्यासमोर ठेवून, विशिष्ट टेकेदाराचा फायदा व्हावा म्हणून नियम धाब्यावर ठेवून पुन्हा निविदा प्रक्रिया राबवून साफसफाईची कामे ठेकेदारीने देण्याचा प्रयत्न करत आहे. म्हणजेच वंशपरंपरागत सफाई करणाऱ्या लोकांना व सफाई कामगारांना कोणत्याही प्रकारे विश्वासात न घेता त्यांना आंदोलन करण्यास भाग पाडीत आहे. दरम्यान, युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी ठेका रद्द करण्यासाठी गोंधळ घातल्याने पोलिसांना पाचारण करण्यात आले होते. खत्री यांच्या भेटीनंतर अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर यांच्याकडे युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी जाऊन निवेदन दिले. यावेळी सफाई युनियनचे सुरेश मारू, सुरेश दलोड, रणजित कल्याणी, अनिल बेग, रमेश मकवाना, रतीश मारू, राजेश चव्हाण उपस्थित होते.



# हिवताप प्रतिबंधासाठी नागरिकांनी काळजी घ्यावी : नायर

**नाशिक : प्रतिनिधी**

घरातील फुलदाणी व शोभिवंत झाडांचे पाणी नियमित बदलावे, फ्रीज डी फ्रॉस्ट ट्रेचे साचलेले पाणी आठवड्यात एकदा काढून टाकावे, अनावश्यक वस्तू जसे प्लास्टिकचे कप, पाण्याच्या रिकाम्या बाटल्या, करवंट्या, टायर, रंगाचे डबे यासारखे काढून टाकावे, घर परिसरात पाणी साचू देऊ नये, नवीन बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी पाणी साचून त्यामध्ये डास उत्पत्ती होणार नाही याची काळजी घ्यावी, ताप आल्यानंतर त्वरित रुग्णास मनपा दवाखाने, शासकीय रुग्णालय येथून उपचार करून घ्यावेत. हिवताप प्रतिबंधात्मक कार्यवाहीकरिता प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने काळजी घेण्याचे आवाहन अतिरिक्त आयुक्त करिश्मा नायर यांनी केले.

जागतिक हिवताप दिनाच्या निमित्ताने मनपाच्या आरोग्य विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात नायर बोलत होत्या. उपायुक्त नितीन पवार, मुख्य लेखापरीक्षक बळवंत गायकवाड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दत्तात्रय पाथरुट, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. तानाजी चव्हाण, सहा. वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत शेटे व डॉ. अजिता साळुंके, जिल्हा हिवताप अधिकारी नाशिक डॉ. एस. एस. पिवळतकर, जीवशास्त्रज्ञ डॉ. नितीन रावते, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद, हिवताप पर्यवेक्षक गिरीश चौधरी व किशोर पगार, मलेरिया विभागाचे अधिकारी व कर्मचारी, जिल्हा हिवताप कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी हिवताप निर्मूलनाची शपथ देण्यात आली. उत्कृष्ट काम करणाऱ्या १५ कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. मनपा हद्दीतील डास निर्मूलनाचे चांगले कामकाज करणारे पेस्ट कंट्रोल कंत्राटी कर्मचारी यांना त्यांचे कंत्राटदाराने गौरवपत्र देऊन सन्मानित केले.





### जनशांती धामात प्रदोषनिमित्त मिरवणूक

**ओझर : वार्ताहर**

निष्काम कर्मयोगी जगदगुरू जनार्दन स्वामी महाराजांचे उत्तराधिकारी शांतिगिरी मौनगिरी महाराज यांनी ओझर येथे निर्माण केलेल्या देवभूमी जनशांती धाम येथे प्रदोषनिमित्त अभिषेक पूजन, भगवान बाणेश्वर महादेव मुकुट व श्री जगदगुरू बाबाजी पालखी मिरवणूक सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात झाला. विधी पाठ, सत्संग, महाप्रसाद व महाआरतीने कार्यक्रमाची सांगता झाली. पहाटे ब्रह्ममुहूर्तावर नित्यनियम विधी, प्राणायाम, ध्यान, भागवत वाचन, महाआरती संपन्न झाली. दुपार सत्रात हरिश्चंद्र पवार, सुनील मोरे, शिवाभाऊ कांडेकर, अण्णासाहेब भडके, सिद्धेश्वर पवार, महेश शेलार यांच्या हस्ते भगवान बाणेश्वर महादेव अभिषेक व जगदगुरू स्वामी शांतिगिरीजी महाराज यांचे पूजन झाले. अभिषेकानंतर भगवान बाणेश्वर महादेवाचा मुकुट व पालखी मिरवणूक सोहळा उत्साहात संपन्न झाला.

# शेतकरी कर्जमाफीसाठी ‘छावा’चे बैलगाडी आंदोलन

## राज्यभरात जनआंदोलन उभारणार : करण गायकर

**नाशिक : प्रतिनिधी**

कर्जमाफी न देऊन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शब्द पाळलेला नाही. निवडणुकीच्या काळात त्यांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्ती करता येत नसेल तर त्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करीत आगामी काळात शेतकरी कर्जमाफीच्या मुद्यावरून राज्यभर आंदोलन करण्याचा इशारा छावा क्रांतिवीर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांनी दिला.

छावा संघटनेतर्फे काल शिर्डी येथे बैलगाडी मोर्चा काढण्यात आला.

आज देशाच्या सीमांवर आपले जवान शहीद होत आहेत. पर्यटक मृत्युमुखी पडत आहेत आणि त्याचप्रमाणे देशात व राज्यात शेतकरी आत्महत्यांचे प्रमाणही चिंताजनकरीत्या वाढले आहे. शासनाच्या चुकीच्या धोरणांमुळे आणि कर्जबाजारीपणामुळे शेतकरी रोज बळी पडत आहे. शेतकऱ्यांना मदत करण्याऐवजी चुकीचे वक्तव्य करून आत्महत्या करण्यास प्रवृत्त करीत आहेत. शेतकऱ्यांबद्दल बोलताना आपण एक शेतकरी आहोत याची जाणीव ठेवावी आणि ती नसेल तर नैतिक जबाबदारी स्वीकारून स्वतः पदमुक्त व्हावे. त्यांच्या या सर्व वक्तव्याचा निषेध करत शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी मिळावी यासाठी छावा क्रांतिवीर सेनेच्या वतीने शिर्डी येथे भव्य बैलगाडी मोर्चा काढण्यात आला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांबाबत वादग्रस्त, उपहासात्मक वक्तव्ये करून शेतकऱ्यांची थट्टा केली आहे. त्यामुळे दोघांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तत्काळ राजीनामा द्यावा, अन्यथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचा राजीनामा घेतला पाहिजे. या आंदोलनाचे नेतृत्व छावा क्रांतिवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांनी केले. आंदोलनात विजय वाहुळे, सुभाष गायकर, नवनाथ शिंदे, डॉ. किरण डोके, आशिष हिरे, अहिल्यानगर जिल्हाप्रमुख अविनाश शिंदे, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष संदीप राऊत, उत्तर महाराष्ट्र सरचिटणीस विठ्ठल भुजाडे, वैभव दळवी, अमोल शिंदे, दत्ता महाराज पवार, दादासाहेब जोगदंड, शिवम शिंदे, आकाश गाडे, संदीप वाघ, संदीप गुंजाळ, अनिल मंजुडे, शिवाजीराजे चौधरी, जालिंदर असणे, तुषार गोंदकर, राहुल शिंदे, राहुल दुसाने, नामदेव हिरे आदींसह उपस्थित होते.



छावा क्रांतिवीर सेनेची स्पष्ट भूमिका आहे. जोपर्यंत कर्जमाफी होत नाही, तोपर्यंत आंदोलन महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्हा, तालुका, गावपातळीवर सुरू राहील. शेतकऱ्याला मदत करण्याऐवजी दम दिला जात आहे. हे लोकशाहीला शोभणारे नाही. शेतकऱ्याचा अपमान खपवून घेतला जाणार नाही.
**-करण गायकर,** संस्थापक छावा



◀◀ भारत-अमेरिकेत टॅरिफ संघर्ष मिटणार लवकरच होणार द्विपक्षीय करार ◀◀ पान ३


नाशिक आज

# गांवकरी




◀◀ स्वाद काठियावाडचा - सौराष्ट्रच्या चवींचा अनुभव नाशिकमध्ये ◀◀ पान ३


■ नाशिक, शनिवार, दि. २६ एप्रिल २०२५



## महत्त्वाचे ▶▶▶▶

### विद्यार्थी परिषदेच्या नाशिकरोड शाखेतर्फे पाकिस्तानचा निषेध



**नाशिकरोड :** पहलगाम येथे दहशतवाद्यांनी २६ पर्यटकांची गोळ्या घालून हत्या केली. या कृत्याचा अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या नाशिकरोड शाखेने तीव्र निषेध केला. नाशिकरोडच्या शिवाजी पुतळा येथे पाकिस्तानचा ध्वज जाळून निदर्शने करण्यात आली. प्रदेश सहमंत्री मेघा शिरगावे, ओमकार आव्हाड, नगरमंत्री सार्थक आढाव, सहमंत्री प्रांजल ढोकणे, यश आढाव तसेच अन्य कार्यकर्ते उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी भारत माता की जय.., वंदे मातरम् आदी घोषणांनी आसमंत दणाणून सोडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानच्या व दहशतवाद्यांच्या कृतीस जशास तसे उत्तर द्यावे, अशी मागणी मेघा शिरगावेने केली. ही घटना माणुसकीला काळिमा फासणारी असून, आजचा युवक हे सहन नाही करणार, असे नगर सहमंत्री प्रांजल ढोकणे हिने सांगितले. पाकिस्तानला त्यांच्याच शब्दात उत्तर देण्याची वेळ आली असून, सरकारने पाकिस्तानबाबत प्रतिबंधात्मक निर्णय घेतल्याचे आम्ही स्वागत करतो, असे ओमकार आव्हाड याने नमूद केले.

### सुनील चोपडा यांची नियुक्ती



**नाशिकरोड :** जैन समाजाची १९०६ मध्ये स्थापन झालेल्या जैन कॉन्फरन्स, नवी दिल्ली या संस्थेवर नाशिकचे सामाजिक कार्यकर्ते सुनील मोहनलाल चोपडा यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. न्यू दिल्ली येथील कॅनॉट प्लेस परिसरात स्थित जैन कॉन्फरन्सचे केंद्रीय कार्यालय असलेली संस्था विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, गरजूंना वैद्यकीय सेवा, समाजप्रबोधन, साधुसंत सेवा, देशपातळीवर सामाजिक व धार्मिक प्रबोधन पुरोगामी विचारधारा रुजवणे असे विविध उपक्रम राबविण्यात येतात.

### ओझरला आज कीर्तन सोहळा

**कसबे-सुकेणे :** संत शिरोमणी गोरोबाकाका कुंभार पुण्यतिथीनिमित्त आज शनिवार दिनांक २६ रोजी ओझर शहर कुंभार समाजोन्नती मंडळाच्या वतीने सायंकाळी सात ते नऊ या वेळेत माधव महाराज घोटेकर यांचे कीर्तन बाणगंगा रोड वीटभट्टी (मारुती मंदिराजवळ) ओझर मिग येथे आयोजित करण्यात आले आहे. पुण्यतिथीनिमित्त दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पुण्यतिथी दिनी सकाळी साडेनऊ ते साडेदहा या वेळेत प्रतिमापूजन करण्यात येणार आहे. सकाळी साडेदहा ते साडेअकरा या वेळेत समाधी सोहळा व तीर्थप्रसाद सायंकाळी चार ते साडेपाच या वेळेत टाळ-मृदंगांच्या गजरात पालखी मिरवणूक, ग्राम प्रदक्षिणा काढण्यात येणार आहे. सायंकाळी साडेपाच ते साडेसहा या वेळेत बालगोपाळांसह भजनी मंडळाचा हरिपाठ होणार आहे.

### सिन्नर नगरपालिकेकडून अव्वाच्या सव्वा बिले

**नाशिक :** सिन्नर नगरपालिकेने नायगाव रोड भागातील रहिवाशांना अव्वाच्या सव्वा घरपट्टीची बिले दिल्यामुळे या भागात राहणाऱ्या नागरिकांची झोप उडाली आहे. घरपट्टीचे बिले कमी करून देण्याची मागणी महाराष्ट्र राज्य अपंग संघटनेचे अध्यक्ष के. बी. सांगळे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना निवेदन दिले आहे. नायगाव रोड या भागातील एकतानगर, आयटीआयजवळील वसाहतीतील नागरिकांना अव्वाच्या सव्वा बिले दिली आहेत. २०२३ ते २०२५ या कालावधीतील घरपट्टीची बिले देताना अव्वाच्या सव्वा दिली आहेत. ही बिले नगरपालिकेने जाणूनबुजून दिल्याचा आरोप सांगळे यांनी केला आहे.

# उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांविरोधात डिजिटल स्ट्राइक

## एलईडी स्क्रीनवर चेहरा झळकणार; १५६ स्पॉटवर सीसीटीव्हींची नजर

**नाशिक : प्रतिनिधी**

**महापालिकेने नागरिकांना घरातील कचरा टाकण्यासाठी घंटागाडीची व्यवस्था करून दिली आहे. मात्र, असे असूनही शहरातील अनेक भागात नागरिक नियमांची पायमल्ली करून उघड्यावर कचरा टाकून परिसराचे विद्रुपीकरण करीत आहे. अशा व्यक्तींना धडा शिकविण्यासाठी महापालिका डिजिटल स्ट्राइक करण्याच्या तयारीत आहे. आता उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांचे फोटो थेट मुख्य चौकात लावलेल्या एलईडी स्क्रीनवर दाखविण्यात येणार आहे. यानिमित्ताने तरी नागरिक उघड्यावर कचरा टाकण्याचे थांबवतील. त्यामुळेच महापालिका असा निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. शहरातील विविध भागात पालिकेने १५६ सीसीटीव्ही लावले आहेत.**

#### कंट्रोल रूमची मदत

जेथे सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत, त्या सर्वांची माहिती महापालिकेत तयार केलेल्या कंट्रोल रूममधून पालिकेला मिळणार आहे. शहरातील कोणत्या भागात? कुठे उघड्यावर कचरा टाकला हे सहज समजणार आहे. पालिका मुख्यालयाच्या तिसऱ्या मजल्यावरील रेकॉड रूममध्ये सीसीटीव्हीचा कंट्रोल रूम उभारला आहे. या कंट्रोल रूमच्या माध्यमातून उघड्यावर कोणी कचरा टाकत असेल तर ते दिसणार आहे.



शहराची लोकसंख्या वाढत असताना कचऱ्याचे प्रमाण वाढत असून, कचऱ्याच्या ब्लॅक स्पॉटमुळे दिवसभर अस्वच्छता असते. शहर परिसरात ज्या ठिकाणी उघड्यावर कचरा टाकला जातो असे ७८ ब्लॅक स्पॉट मनपाने यापूर्वीच शोधले आहे. याद्वारे ब्लॅक स्पॉटवर घाण टाकणाऱ्यांवर तब्बल १५६ सीसीटीव्हींचा वॉच आहे. घनकचरा संकलन विभाग दिवसाला चारशे छोट्या-मोठ्या घंटागाड्यांच्या माध्यमातून घरोघरी जात कचरा संकलन केला जातो. दिवसाला सुमारे सहाशे ते सातशे टन कचरा उचलला जातो. त्यासाठी मनपा ठेकेदाराला साडेतीनशे कोटी रुपये अदा करते. तरीदेखील शहरात उघड्यावर कचरा टाकण्याचे प्रमाण वाढत आहे. शहर परिसरात ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात उघड्यावर कचरा टाकला जातो, असे ७८ ब्लॅक स्पॉट मनपाने शोधले आहेत.

प्रत्येक ब्लॅक स्पॉटवर दोन असे एकूण १५६ सीसीटीव्ही बसविले जाणार आहेत. जेणेकरून उघड्यावर कचरा टाकणारे शोधता येतील. वाहनावरून कोणी कचरा टाकला व निघून गेला तरी सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून त्याचा वाहनाच्या नंबरवरून त्याचा शोध घेऊन त्याला स्क्रीनवर दाखवले जाणार आहे.

उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर तीनशे रुपयांपासून ते दहा हजारांपर्यंत हा दंडदेखील वसूल केला जाऊ शकतो. शहराची लोकसंख्या वाढत असताना कचऱ्याचे प्रमाणही वाढत आहे.

शहरातील कचरा संकलन करण्यासाठी महापालिका ठेकेदारांवर साडेतीनशे कोटींचा खर्च करते. मात्र, तरीही काही महाभाग रस्त्यावर कचरा फेकून शहराची सुंदरता नष्ट करत आहे. परंतु, आता याप्रकरणी महापालिका सक्त झाली असून, अशा व्यक्तींचे फोटे ब्लर करून डिजिटल स्क्रीनवर दाखवले जातील. जेणेकरुन पुढे कोणीही उघड्यावर कचरा टाकणार नाही.



## ‘टीडीएफ’चा स्तुत्य निर्णय; पुरस्कार नाकारत नोंदविला हल्ल्याचा निषेध

**नाशिक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य टीडीएफ संघटनेतर्फे काल पालघर येथे जीवनगौरव आणि आदर्श शिक्षक-शिक्षकेतर पुरस्काराचे वितरण सोहळा आयोजित केला होता. मात्र, पहलगाम येथील हल्ल्याचा निषेध म्हणून या पुरस्कार सोहळ्यावर नाशिक जिल्ह्यातील पुरस्कारार्थींनी बहिष्कार टाकत पुरस्कार न स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे.

नाशिक जिल्ह्यातील पुरस्कार प्राप्त शिक्षक शिवाजीराव निरगुडे, टी. एम. डोंगरे तसेच भाऊसाहेब शिरसाठ यांनी पुरस्कार सोहळ्याला अनुपस्थिती दर्शवावी, असा सर्वानुमते निर्णय पिंपळगाव हायस्कूल येथील बैठकीत घेण्यात आला.

टीडीएफ ही पंचसूत्रीवर चालणारी वैचारिक संघटना आहे. सामाजिक भान ठेवून पहलगाम येथील हल्ला हा मानवतेवर झालेला सर्वांत मोठा हल्ला आहे म्हणून पुरस्कार स्वीकारण्यासाठी जाऊ नये, असे प्रतिपादन ज्येष्ठ शिक्षक नेते बी. एस. सूर्यवंशी यांनी केले.

टीडीएफचा कार्यकर्ता हा विचारसरणीवर काम करत असतो. पुरस्कार येतात-जातात, माणूस मोठा असतो, पुरस्कार नाही. त्यामुळे आम्ही सर्वजण पुरस्कार स्वीकारण्यासाठी जाणार नाही, असे शिवाजीराव निरगुडे यांनी सांगितले.

या बैठकीसाठी बी. एस. सूर्यवंशी, रवींद्र मोरे, टी. एम. डोंगरे, एस. बी. शिरसाठ, किशोर जाधव, सी. पी. कुशारे, रामराव बनकर, अरुण पवार, बाळासाहेब ढोबळे, समीर जाधव, एम. आर. जाधव, नितीन डोखळे, विकास सोनवणे, राहुल सोनवणे, एम. आर. राजपूत, निखिल गांगुर्डे उपस्थित होते.

## मुद्दल कर्ज रकमेचे दहा हफ्ते करून द्या

### जिल्हा बँक कर्जदारांची आज बैठक

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्हा मध्यवर्ती बँकेने आणलेल्या सामोपचार तसेच कर्जफेड योजनेला थकबाकीदार शेतकऱ्यांचा विरोध असून, त्याऐवजी कर्जाच्या मुद्दल रकमेचे समान दहा हफ्ते करून द्यावेत, या मागणीसाठी आज थकबाकीदारांची बैठक बोलावण्यात आली आहे.

संपूर्ण कर्जमाफी नाही तर संपूर्ण व्याजमाफी या मागणीसाठी नाशिक जिल्ह्यातील ५६ हजार थकबाकीदार शेतकऱ्यांनी एक जून २०२३ पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन सुरू होते. या आंदोलनाला प्रतिसाद देऊन ११ एप्रिल रोजी नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये शेतकऱ्यांसमवेत व शेतकरी प्रतिनिधींसमवेत राज्य बँकेचे अध्यक्ष यांच्यासमवेत बैठक झाली.

कर्ज वसुलीस तीन महिने स्थगिती देण्यात येऊन शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्याचे आश्वासन कृषिमंत्र्यांनी दिले होते. या संदर्भात मुंबई येथे २३ एप्रिल रोजी मंत्रालयात अजितदादा पवार यांनी बैठक घेतली. मात्र, या बैठकीत शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय झाले नसल्याचा आरोप आहे.

शेतकऱ्यांना व्याजामध्ये सवलत देण्याचे ठरविण्यात आले असले तरी शेतकऱ्यांना मान्य नाही. संपूर्ण कर्जमाफी यावर ठाम असलेल्या शेतकऱ्यांनी व व्याजामध्ये सर्व व्याज सूट द्यावे व मुद्दलाचे १० हप्ते करून द्यावेत, या मागणीचा या बैठकीत कोणताही विचार न झाल्याने पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी नाशिक येथे २६ एप्रिल रोजी एक वाजता हुतात्मा स्मारकाजवळ बैठक आयोजित करण्यात आल्याची माहिती शेतकरी समन्वय समितीचे अध्यक्ष भगवान बोराडे, ९३८ आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे राज्य अध्यक्ष कैलास बोरसे, दिलीप पाटील, दगाजी आहेर, शेतकरी नेते प्रकाश शिंदे, खेमराज कोर,अर्जुन बोराडे, आनंद पाटील, विलास बोरस्ते, देवा वाघ, मोती नाना, प्रहार संघटनेचे गणेश निंबाळकर, शरद शिंदे, जगन काकडे, दत्तू बोडके, प्रशांत कड, दीपक पगार, नथू पाटील, मनसेचे तुषार गांगुर्डे, गंगाधर निखाडे, धोंडीराम थैली, भाऊदास ढिकले, शंकर ढिकले, निवृत्ती गारे, नाटेश्वर दत्तू, थोरात, दत्तू सुडके, सोपान कडलक, बाळासाहेब बोरस्ते, रमेश बोरस्ते, चिंधू पगार, रामराव मोरे, रमेश बोरस्ते, सुधाकर मोगल, दगाजी आहेर, जयराम बहिरम, आनंदा चौधरी यांच्यासह नाशिक जिल्ह्यातील सर्व शेतकरी संघटनेचे प्रमुख नेते, शेतकऱ्यांचे प्रतिनिधी या बैठकीत उपस्थित राहणार आहेत.

## शिंदे गावातील इमारतीतील सांडपाणी नागरिकांच्या घरात

**नाशिकरोड : विशेष प्रतिनिधी**

नाशिक-पुणे महामार्गावर असलेल्या शिंदे गावातील सिद्धी समृद्धी पार्क फेज- दोन या बिल्डिंगमधील बाथरूमचे सांडपाणी ड्रेनेज लाइन नसल्यामुळे थेट नागरिकांच्या घरात जात आहे. त्यामुळे रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे. संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे रहिवाशांनी सरपंच बाजीराव जाधव यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात नागरिकांचे म्हणणे आहे की, हे सांडपाणी दुर्गंधीयुक्त असून, परिसरात लहान मुलांना व नागरिकांना वासामुळे त्रास होत आहे. या पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, स्थानिक रहिवाशांनी शिंदे ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन सरपंच, उपसरपंच यांना वारंवार तक्रारी करूनही त्याचा काही फायदा होत नाही. संबंधित बिल्डिंगचा मालक सोपान शेलार, योगेश शेलार यांच्यावर कारवाई करावी, यासाठी अनेकदा ग्रामपंचायतीला निवेदनही दिले आहे. परंतु, कुठलीही दखल न घेतल्यामुळे नागरिक संतप्त झाले आहेत.



**नाशिकरोड : शिंदे गावचे सरपंच बाजीराव जाधव यांना निवेदन देताना नागरिक.**

यावेळी भाग्यवान जाधव, ज्ञानेश्वर नागरे, कचरू बोराडे, सुनील पाटील, शीतल माळवे, पप्पू कुमावत, पंढरीनाथ जाचक, धिरोडे, रमेश पवार, रोशन बारगळ, लक्ष्मण कहाणे, कांताबाई जाधव, गुलाब वर्मा, प्रभाकर बोराडे, सुदर्शन आंबेकर, नवनाथ शेलार, रंगनाथ गोसावी, मंगल बोराडे आदींनी शिंदे गावचे सरपंच बाजीराव जाधव यांची भेट घेऊन आपल्या व्यथा मांडून निवेदन दिले आहे.

## देवळालीत मुस्लिम बांधवांकडून निषेध

**देवळाली कॅम्प : प्रतिनिधी**

येथील मुस्लिम बांधवांनी सुन्नी मुस्लिम मशीद येथे नमाज पठणानंतर हिंदू - मुस्लिम ऐक्याचा नारा देत पहलगाम येथील भ्याड हल्ल्याचा निषेध केला. यावेळी देवळाली पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय पिसे यांना निवेदन देऊन या भ्याड हल्ल्याचा निषेध केला. नमाज पठणानंतर मशिदीसमोर सर्व मुस्लिम बांधवांनी काळ्या फिती बांधून निषेध केला. यावेळी हाजी रफिक शेख, गसुद्दीन कुरेशी, बाबू शेख, अमीन मोहंमद खान, श्याम कदम, विलास धुर्जड, शब्बीर रंगरेज, भरत वाघमारे, रज्जाक बोरिंगवाला, फिरोज शेख यांच्यासह हिंदू-मुस्लिम बांधव उपस्थित होते.



## प्रत्येक कर्मचाऱ्याने सतर्क राहण्याची गरज

### मोराळे : एकलहरेत अग्निशमन सप्ताह समारोप




**नाशिक : प्रतिनिधी**

प्रत्येक कर्मचाऱ्याने स्वतःची व कंपनीची हानी होऊ नये म्हणून सतर्क राहिले पाहिजे, असे मत नाशिक औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता राजेश मोराळे यांनी केले. एकलव्य अग्निशमन सेवा सत्ता समारोपप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. नाशिक औष्णिक विद्युत केंद्र एकलहरे येथे १४ ते २० दरम्यान अग्निशमन सेवा सप्ताह पार पडला.

या सप्ताहाच्या समारोपाच्या वेळी नाशिक औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता राजेश मोराळे, उपमुख्य अभियंता राजेश चव्हाण, प्रशांत लोटके, अधीक्षक अभियंता प्रवीण गोसावी, संतोष कुलकर्णी उपस्थित होते.

या सप्ताहानिमित्त येथील अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी विविध स्पर्धा, व्याख्याने, प्रात्यक्षिके आयोजित करण्यात आली होती.

भित्तिचित्र स्पर्धेत प्रथम पारितोषिक निशा परदेशी, द्वितीय पारितोषिक महेश तुपे तसेच घोषवाक्य स्पर्धेत प्रथम पारितोषिक नंदकुमार मोरे, द्वितीय पारितोषिक निशा परदेशी, तृतीय पारितोषिक विकास पावसे तसेच निबंध स्पर्धेत प्रथम पारितोषिक विकास पावसे, द्वितीय पारितोषिक नैना चव्हाण यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन मुख्य अभियंता राजेश मोराळे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाप्रसंगी राजेश काळे, सुयोग झुटे, दीपक सोनवणे, रवींद्र कचवा, प्रवीण जोशी, शिल्पा गोविंद, अनिरुद्ध जाधव, प्रवीण शेलार, पूजा आचारी, नंदकुमार मोरे, योगेश कापडणीस, सचिन बिडगर, योगेश बाविस्कर, तसेच डर्क इंडिया कंपनीचे विनायक हारक, नीलेश बोरसे, त्याचप्रमाणे अग्निशमन विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदकुमार मोरे, प्रास्ताविक राजेश काळे यांनी केले. तसेच आभार विनोद साबे यांनी मानले.

# द्वारका-नाशिकरोड उड्डाणपुलाला मेट्रोचा ‘मेगा ब्लॉक’

## महारेल व राष्ट्रीय महामार्गात समन्वयाचा अभाव, वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त

**नाशिक : प्रतिनिधी**

द्वारका ते नाशिकरोडदरम्यान उड्डाणपूल व्हावा, अशी मागणी दहा ते पंधरा वर्षांपासून होते आहे. वाहनधारकांच्या नशिबी दररोज वाहतूक कोंडी व अपघात होत असल्याचे चित्र आहे. याप्रकरणी नाशिकचे खा. राजाभाऊ वाजे विजयी होताच तत्काळ केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन उड्डाणपूल लवकर बांधून देण्याची मागणी केली. मात्र, सद्यस्थितीत नाशिकरोड-द्वारका उड्डाणपुलाबाबत कार्यवाही होत नसल्याचे चित्र आहे.

शहरात मेट्रो होणार असून, त्यासाठी मार्ग नियोजित केले जाणार आहे. तत्पूर्वीच या उड्डाणपुलाचे काम केल्यास पुढे अडथळे येऊ शकतात. यामुळे द्वारका-नाशिकरोड उड्डाणपुलाचे काम रखडल्याचे दिसते आहे.

नाशिकरोड ते द्वारका सर्कल हा रस्ता अत्यंत जीवघेणा झाला असून, या मार्गावर उड्डाणपूल व्हावा, ही मागील १५ वर्षांपासूनची मागणी अद्याप प्रलंबित आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६० वरील नाशिक शहरातील द्वारका सर्कल ते नाशिकरोड या रस्त्यावर उड्डाणपूल व्हावा, अशी मागणी गेल्या काही वर्षांपासून केली जात आहे.



खासदार राजाभाऊ वाजे यांनी निवडून येताच संसदेच्या पहिल्याच अधिवेशनाच्या वेळी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे नाशिकरोड ते द्वारका सर्कल उड्डाणपूल प्रकल्प उभारणीसाठी मागणी केली. या मार्गावरून दररोज हजारो वाहने ये-जा करतात. नाशिक शहरात येणारे व नाशिकरोडसह सिन्नर, पुण्याकडे जाणारी वाहने द्वारकेवरूनच जातात.

> शहरात मेट्रोचेदेखील काम होणार आहे. त्यामुळे नाशिकरोड–द्वारका उड्डाणपूल उभारण्यापूर्वी मेट्रोचे मार्ग निश्चित केले जाणार आहेत. त्यामुळे उड्डाणपुलामुळे त्यात काही विसंगती यायला नको. तसेच राष्ट्रीय महामार्ग व मेट्रोचे काम करणाऱ्या महारेलचा समन्वय होत नाहीये. राष्ट्रीय महामार्ग सदर उड्डाणपुलाचे काम करण्यास उत्सुक असून, याप्रकरणी आपले लक्ष आहे.
>
> **-खा. राजाभाऊ वाजे, नाशिक**



मात्र, सततच्या वाहतूक कोंडीमुळे वाहनधारकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. नाशिकरोड ते द्वारका सर्कल उड्डाणपूल प्रकल्पाला चालना द्यावी, अशी मागणी खासदार राजाभाऊ वाजे यांनी ना. नितीन गडकरी यांच्याकडे केली होती. त्यावेळी गडकरी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे वाजे यांनी म्हटले होते. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यापूर्वी हा उड्डाणपूल तडीस नेण्याची अपेक्षा आहे.

अग्रलेख

# एकतेचा संदेश

दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिल्यानंतर त्यांना त्यांचे मनसुबे साध्य करायचे असतात. त्यासाठी त्यांना कशाचेही भय नसते. संधी साधून ते हल्ला करतात. त्यांच्यात माणुसकी असण्याची अपेक्षा करताच येत नाही. जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये तेच घडले. या हल्ल्यामागे पाकिस्तानचा हात असल्याची कल्पना भारतासह साऱ्या जगाला आहे. पहलगाममधील बैसरन येथे पर्यटकांवर हल्ला झाल्यानंतर त्यांना धीर देणारे, त्यांना वाचवण्यासाठी पुढे सरसावणारे काश्मिरीच होते आणि सीमेपलीकडून आलेल्या हल्लेखोरांना मदत करणारेही स्थानिकच होते हेही समोर आले आहे. हल्ला करण्याआधी दहशतवाद्यांनी या भागाची रेकी केली तेव्हा त्यांना स्थानिक नागरिकांनी मदत केल्याची बाब समोर आली आहे. याचा अर्थ काश्मीरमध्ये दहशतवाद्यांना विरोध करणारे आणि दहशतवाद्यांना मदत करणारेही आहेत. जे स्थानिक लोक मदत करतात त्यांचा भारतद्वेष दिसून येतो. पण, त्याचवेळी आपले आणि आपल्या लोकांचे नुकसान होत असल्याचे त्यांच्या लक्षात येत नाही. ज्या पर्यटनावर बहुसंख्य काश्मिरींची रोजीरोटी अवलंबून आहे त्या रोजीरोटीवर या हल्ल्यानंतर संक्रात आली आहे. पण, याच्याशी दहशतवादी आणि त्यांना मदत करणाऱ्या स्थानिक लोकांना काहीही देणेघेणे नाही. स्थानिक लोकांच्या मदतीने दहशतवादी हल्ला होण्याचा कट रचला जात असल्याची माहिती भारतीय गुप्तचर यंत्रणांना मिळाली कशी नाही? हाच सर्वांत मोठा प्रश्न आहे. यावरच विरोधी पक्षांनी बोट ठेवले आहे. पहलगाममधील बैसरन येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ जणांना आपला जीव गमवावा लागला. या घटनेचा जगभर निषेध होत असताना दहशतवाद्यांना हल्ला करण्याची संधी मिळाली कशी? हा प्रश्न उपस्थित होत आहे. हे आपल्या गुप्तचर यंत्रणेचे अपयश आहे काय? असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे. या हल्ल्यानंतर दहशतवादी संघटनांविरोधात, त्यांना सहाय्य करणाऱ्या आपल्या शत्रू राष्ट्रावरील कारवाई आणि हल्ल्यानंतरच्या भारताच्या पुढील कारवाईबाबत चर्चा करण्यासाठी सरकारने नवी दिल्लीत सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. या बैठकीत विरोधी पक्षांनी सरकारच्या दहशतवादाविरोधातील सर्व प्रकारच्या कारवाईचे समर्थन केले आहे. तसेच पुढील कारवायांना पाठिंबाही दिला आहे. आपण एकजूट आहोत हे दाखवून देण्याची हीच वेळ असल्याचे विरोधकांनी स्पष्ट केले. विरोधी पक्षांनी सरकारला सर्वच प्रकारचे सहकार्य करण्याचे ठोस आश्वासन दिले असले, तरी याच विरोधी पक्षांनी संरक्षण व गुप्तचर यंत्रणेतील त्रुटींवरुन सरकारसमोर प्रश्न उपस्थित केले. पहलगाममध्ये झालेला हल्ला हा सुरक्षा व गुप्तचर यंत्रणेचे सर्वात मोठे अपयश असल्याचे विरोधकांनी नमूद केले. विरोधी पक्षांनी सर्वपक्षीय बैठकीत संरक्षण व गुप्तचर यंत्रणेतील त्रुटींवरून सरकारसमोर प्रश्न उपस्थित केले. त्यावर उत्तर देताना सरकारने नेमकी चूक कुठे झाली? याविषयी माहितीही दिली. सुरक्षा यंत्रणेत कुठे चूक झाली, याचा शोध सरकार घेत असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. यावरुन सुरक्षा व्यवस्थेत गफलत झाल्याचे सरकारने मान्य केल्याचे दिसत आहे. जर काय चुकीचे घडलेच नसते तर आज आपण येथे जमलो नसतो. सुरक्षा व्यवस्थेत काहीतरी चूक घडली आहे, ती शोधून काढण्याची गरज आहे, असे अमित शहा बैठकीत म्हणाल्याचे सांगितले जात आहे. बैठकीच्या अध्यक्षस्थानी असलेले संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी सर्वपक्षीय प्रमुख नेत्यांना घटनेबाबतची इत्यंभूत माहिती दिली. हल्ल्यानंतर सुरक्षाविषयक मंत्रिमंडळ समितीने घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांची माहितीही सर्वपक्षीय नेत्यांना देण्यात आली. पहलगाममध्ये सुरक्षा यंत्रणा कुठे होती? केंद्रीय राखीव पोलीस दल का तैनात करण्यात आले नाही? अशा प्रश्नांची सरबत्तीही विरोधकांनी केली. बैसरन पठार सुरू करण्याबाबतची कल्पना स्थानिक प्रशासनाने सुरक्षा यंत्रणांना दिली नव्हती, असे उत्तर केंद्र सरकारकडून देण्यात आले. याचा अर्थ, स्थानिक प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणा यांच्यात समन्वय नसल्याचे दिसून येते. अमरनाथ यात्रा सुरू होण्याच्या सुमारास अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाममध्ये सुरक्षा वाढविण्यावर भर दिला जातो. यावेळी तसे काही दिसून आले नाही. म्हणूनच काहीतरी गफलत झाली. दिनांक २० एप्रिलपासून बैसरनचे पठार सुरक्षा यंत्रणेच्या परवानगीविना पर्यटकांसाठी खुले करण्यात आले. याची माहिती पहेलगामच्या स्थानिक प्रशासनालाही नव्हती. पहेलगामच्या स्थानिक पर्यटन कंपन्यांनी पर्यटकांना घेऊन जाणे सुरू केले. पण, त्याची माहिती सुरक्षा व्यवस्थांना नव्हती. त्यामुळे बैसरन भागात निमलष्कराची वा पोलिसांची सुरक्षा तैनात केली गेली नाही, अशी माहिती बैठकीमध्ये देण्यात आल्याचे एका विरोधी पक्षाच्या नेत्याने सांगितले. अमरनाथ यात्रेवेळी बैसरनला पर्यटक जातात. त्यामुळे तेथे जूनपासून सुरक्षा व्यवस्था तैनात असते. पण, एप्रिलपासूनच पर्यटक जाऊ लागले होते. हजारो पर्यटक जात असताना याची माहिती ना पोलिसांना होती ना सैन्य दलांना. केंद्रीय राखीव पोलिस दलालाही (सीआरपीएफ) पर्यटक बैसरनला जात असल्याचे कळले नाही. गुप्तहेर संस्थांना देखील माहिती नव्हते, असेही बैठकीत सांगण्यात आले. हल्ला करण्यासाठी स्थानिक नागरिकांनी दहशतवाद्यांना मदत केली. पण, याची माहिती इतर स्थानिक नागरिकांनी सुरक्षा यंत्रणांपर्यंत पोहोचवली नाही. यामागचे कारण भीती हेच आहे. गुप्तचर यंत्रणांचे काम स्थानिक नागरिकांच्या सहकार्यावर अवलंबून असते. पण, स्थानिक नागरिकांना हल्ल्याची कल्पना असण्याची शक्यता गृहीत धरली, तरी त्यांनी भीतीपोटी गप्प बसणे पसंत केल्याचे एकंदरीत दिसून येते. कोठेतरी गफलत झाली म्हणून सरकारला विरोधकांनी धारेवर धरले असले, तरी सरकारला सर्वच प्रकारचे सहकार्य करण्याचे आश्वासनही दिले आहे. देश जेव्हा संकटात सापडतो तेव्हा सरकार विरोधी पक्षांना विश्वासात घेऊन पुढील कृती करत असते. भाजपाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने तेच केले आहे. परंतु, या बैठकीला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहिले असते, तर चांगले झाले असते. बिहारमधील मधुबनी येथील जाहीर सभेतून त्यांनी दहशतवाद्यांना कडक इशारा दिला. पण, हाच इशारा सर्वपक्षीय बैठकीत उपस्थित राहून दिला असता, तर चांगले झाले असते. ही गोष्ट बाजूला ठेवली, तरी भारत देश दहशतवादाविरुद्धच्या लढाईत एक असल्याचा संदेश पाकिस्तान आणि जगाला याच बैठकीतून देण्यात आला. राजकीय मतभेद बाजूला ठेवून सर्व पक्ष एक होतात तेव्हा देशाची एकता दिसून येते. राजकीय टीकाटिप्पणीत राजकीय पक्ष एकमेकांना देशविरोधी म्हणत असले, तरी तसे काही नसते.

# ऑपरेशन मेघदूत : भारतीय लष्करी दलांचे अदम्य साहस

भारताच्या लष्करी इतिहासात अनेक धाडसी मोहिमांनी आपला ठसा उमटवला आहे आणि त्यातील एक महत्त्वपूर्ण मोहीम म्हणजे ऑपरेशन मेघदूत. ही मोहीम भारताच्या तिन्ही लष्करदलांनी विशेषतः भारतीय सैन्य आणि हवाईदलाने संयुक्तरीत्या राबवलेली अत्यंत महत्त्वाची आणि ऐतिहासिक कारवाई होती. ऑपरेशन मेघदूत १३ एप्रिल १९८४ रोजी सुरू करण्यात आली आणि यामध्ये भारताने जगातील सर्वांत उंच रणभूमी असलेल्या सियाचीन हिमनगावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. या मोहिमेने भारताच्या लष्करी क्षमतेचा, धोरणात्मक दूरदृष्टीचा आणि जवानांच्या अपार धैर्याचा परिचय संपूर्ण जगाला दिला.

सियाचीन हिमनग हा काराकोरम पर्वतरांगेतील एक दुर्गम आणि अत्यंत थंड परिसर आहे. येथे तापमान -५० अंश सेल्सिअसपर्यंत खाली जाते आणि या ठिकाणी श्वास घेणेदेखील कठीण असते. १९७० च्या दशकात पाकिस्तानने सियाचीन परिसरात हळूहळू घुसखोरी करण्याचा प्रयत्न सुरू केला होता. त्यांनी या भागात अनेक आंतरराष्ट्रीय गिर्यारोहक मोहिमा आयोजित करून आपल्या नियंत्रणाचा आभास निर्माण करण्याचा डाव खेळला. भारताला पाकिस्तानच्या या हालचालींची माहिती मिळाल्यानंतर भारतीय लष्कराने पुढाकार घेऊन या भागावर आधीच ताबा मिळवण्याचा निर्णय घेतला. सियाचीन प्रदेश हा भारतासाठी सामरिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण हा भाग पाकिस्तानला चीनशी थेट भू-सीमारेषा जोडण्यापासून रोखतो. दुसरीकडे, पाकिस्तानसाठी हा भाग थेट प्रवेशद्वारासारखा आहे. ज्यामुळे त्यांना जम्मू आणि काश्मीरवर दावा करण्यास बळ मिळते. सियाचीनवरील वाद फाळणीच्या वेळी सीमारेषा नीट न ठरल्यामुळे निर्माण झाला. भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांनी या भागातील वाद नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि शांतता राखण्यासाठी अनेक करार केले. १९४९ मध्ये भारत-पाकिस्तान युद्धानंतर दोन्ही देशांनी "कराची करार" केला. या करारानुसार एक युद्धविराम रेषा आखली गेली. पण त्यात सियाचीन प्रदेशाचा बराचसा भाग स्पष्टपणे नमूद केला गेला नव्हता. ही युद्धविराम रेषा ९८४२ या नकाशातील बिंदूवर संपते. १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धानंतर "ताश्कंद करार" झाला, जो भारताचे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री आणि पाकिस्तानचे राष्ट्रपती अयुब खान यांच्यात झाला. या करारानुसार युद्धविराम रेषेला "लाइन ऑफ कंट्रोल" असे नाव देण्यात आले आणि सियाचीनला "नो मॅन्स लँड" (कोणत्याही देशाचा ताबा नसलेला भाग) घोषित करण्यात आले. पाकिस्तानने या दावाहीन भागाकडे एक संधी म्हणून पाहिले, कारण हा भूभाग सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आणि अद्याप कोणाच्याही ताब्यात नव्हता. त्यामुळे सियाचीन हिमनदीवर पाकिस्तानचा ताबा बसू नये म्हणून भारताने ऑपरेशन मेघदूत सुरू केले.

सन १९७० च्या दशकात कर्नल नरिंदर कुमार, जे भारतीय लष्करातील एक शिस्तप्रिय अधिकारी व गिर्यारोहक होते, यांनी काश्मीरचा एक अमेरिकन-निर्मित नकाशा पाहिला ज्यामध्ये सियाचीन हिमनदीचा भाग पाकिस्तानमध्ये दाखवण्यात आला होता. पाकिस्तानने अनेक गिर्यारोहण मोहिमांना सियाचीन भागातील शिखरे पाकिस्तानच्या बाजूने सर करण्यासाठी फक्त परवानगीच दिली नाही तर या मोहिमांना पाकिस्तान सरकारकडून परवाने दिले जात असे. पाकिस्तान लष्कराचा एक अधिकारी या मोहिमांमध्ये सोबतसुद्धा असे. या गिर्यारोहकांना पाकिस्तान सैन्याने



दिलेला नकाशा (जो जर्मन मोहिमेतील एका सदस्याकडून भारतीय गुप्तचर संस्थांना मिळाला) सियाचीनला पाकिस्तानचा भाग दाखवतो आणि LOC ला NJ-९८४२ पासून काराकोरम खिंडीपर्यंत जोडतो. या कारामतीला उत्तर म्हणून भारतीय लष्कराने या भागाचा अभ्यास

योगेश चकोर
८१४९८८९७४३

करण्यासाठी परवानगी घेतली. कर्नल बुल कुमार यांच्या नेतृत्वाखाली १९७८ मध्ये मोहीम राबवण्यात आली आणि १९८१ पर्यंत त्यांनी संपूर्ण सियाचीन हिमनदीचा चीनच्या सीमेपर्यंत नकाशा तयार केला, तसेच साल्टोरो पर्वतरांगांपलीकडील भागाचे फोटो आणि व्हिडिओ गोळा केले. १९८४ मध्ये भारतीय गुप्तचर संस्थांना पाकिस्तानकडून "अबाबील" नावाच्या मोहिमेची योजना असल्याचे समजले आणि त्यांनी लंडनमधून मोठ्या प्रमाणात अंटार्क्टिक वस्त्र, हिमालयी तंबू आणि गिर्यारोहण साहित्य खरेदी केल्याचेही लक्षात आले.

या गुप्तचर अहवालाच्या आधारावर तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी ऑपरेशन मेघदूतसाठी परवानगी दिली. भारत सरकारकडून हिरवा कंदील मिळाल्यानंतर तेव्हाचे लष्करप्रमुख जनरल अरुण वैद्य यांनी उत्तर लष्कर कमांडर लेफ्टनंट जनरल पी. एन. हूण आणि ब्रिगेडियर विजय चन्ना यांना साल्टोरो रांगा तत्काळ ताब्यात घेण्याचे आदेश दिले. ही योजना कॅबिनेट कमिटी ऑन सेक्युरिटीमध्ये मांडली गेली आणि पंतप्रधान इंदिरा गांधींनी तिला तत्काळ मंजुरी दिली. सियाचीन हिमनदीवर ऑपरेशन मेघदूतची जबाबदारी कुमाऊँ रेजिमेंटच्या एका बटालियनवर सोपवण्यात आली. त्यांना लडाख स्काउट्सच्या एका कंपनीने आणि कुमाऊँच्या आणखी दोन कंपन्यांनी पाठिंबा दिला. संपूर्ण हिमवस्त्र आणि सुसज्ज उपकरणांनी सज्ज कुमाऊँ रेजिमेंट आणि लडाख स्काउट्सचे जवान सियाचीन बेस कॅम्पवर जमले. या मोहिमेपूर्वी, सैनिकांनी कठोर प्रशिक्षण घेतले, ज्यामध्ये हिमावर जिवंत राहण्याचे कौशल्य, बर्फावर चढाई (स्नो क्राफ्ट, आइस क्राफ्ट) आणि मानसिक व शारीरिक तयारी यांचा समावेश होता. ऑपरेशन मेघदूतचे नेतृत्व मेजर आर. एस. संधू यांनी केले.

भारतीय हवाई दलाच्या IL-७६ आणि AN -३२ ट्रान्सपोर्ट विमानांनी लेह येथे मोठ्या प्रमाणात लॉजिस्टिक सामग्री पोहोचवली. यानंतर, कॅप्टन संजय कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखालील पुढील भारतीय सैन्यदलाने सियाचीन हिमनदीवर उतरणी केली आणि बिलाफोंडला या महत्त्वाच्या दऱ्यावर हिंदुस्थानी निशाण फडकविले. अतिशय कमी वेळात, भारतीय लष्कराने सियाला, बिलाफोंडला आणि ग्योंगला हे तीन प्रमुख दर्रे आणि साल्टोरो रांगेवरील प्रमुख उंच शिखरे ताब्यात घेतली. जेव्हा पाकिस्तानी सैन्य तिथे पोहोचले, तेव्हा त्यांना मोठा धक्का बसला आणि भारतीय लष्कराच्या जोरदार प्रतिकारात त्यांना मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागले. नंतर पाकिस्तानने पश्चिम भागातील रांगेवर कब्जा केला, जिथून त्यांना भारतीय संरक्षण व्यवस्थेचा आढावा घेता येत होता आणि त्यांनी तेथून भारतीय तळावर हल्ला चढवला. यानंतर दोन्ही बाजूंनी जोरदार गोळीबार झाला आणि शेवटी पाकिस्तानी सैनिकांना माघार घ्यावी लागली आणि त्यांनी ती रांग रिकामी केली.

ऑपरेशन मेघदूतनंतर, भारतीय सैन्याने अत्यंत प्रतिकूल हवामान आणि कठीण भूभागात विजय मिळवलेले प्रदेश कायम ताब्यात ठेवण्यासाठी अहोरात्र मेहनत घेत आहे, जे सीमा व्यवस्थापनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. पाकिस्तानने सियाचीन हिमनदीवरील ताबा पुन्हा मिळवण्यासाठी निरंतर प्रयत्न सुरू ठेवले आणि अनेक मोहिमा राबवल्या. मात्र, आजही भारतीय लष्कर सियाचीन हिमनदीचे ७६ किमी लांब आणि २५५३ चौ. किमी संपूर्ण क्षेत्र, तसेच तिच्या उपहिमनद्या, सर्व प्रमुख दर्रे आणि साल्टोरो पर्वतरांगेची उंच शिखरे ताब्यात ठेवून आहे. सियाचीनवर नियंत्रण मिळवल्याने भारताला संरक्षण, आर्थिक आणि नैतिक दृष्टीने अनेक फायदे मिळाले, या भागाचे देखभाल व संचालन खर्चिक असले तरी सियाचीन पाकिस्तानच्या ताब्यात गेला असता तर त्यांनी लडाखमधील भारतीय लष्करी हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी रडार व निरीक्षण केंद्रे उभारली असती. यामुळे चीन आणि पाकिस्तान यांच्यात समन्वय निर्माण होऊन, कोणत्याही संघर्षाच्यावेळी संयुक्त हल्ला करण्याची शक्यता वाढली असती. सियाचीनवरील नियंत्रणामुळे भारतीय लष्कराला नुब्रा खोऱ्यात संरक्षणात्मक पायाभूत सुविधा उभारण्याची गरज भासली नाही, जे अत्यंत खर्चिक ठरले असते. हा भाग लेहकडे जाणाऱ्या मार्गांचे संरक्षण करतो, जे लडाखचे प्रमुख शहर आणि प्रशासकीय केंद्र आहे. सियाचीन क्षेत्र काराकोरम खिंडीजवळ आहे, ज्यामार्गे काराकोरम महामार्ग जातो आणि तो पाकव्यवस्थापित काश्मीरमधील गिलगिट-बाल्टिस्तान भागाला चीनच्या झिंजियांग प्रांताशी जोडतो. सियाचीन एक प्रकारचा "निगराणी टॉवर" म्हणून कार्य करतो, ज्यामुळे भारताला पाकिस्तानच्या गिलगिट आणि बाल्टिस्तान भागांवर लक्ष ठेवता येते. ऑपरेशन मेघदूत हे एक असे मिशन होते, ज्याचे सियाचीन क्षेत्रावर अनेक परिणाम झाले. यामुळे भारताला जम्मू आणि काश्मीरवर आपली स्थिती मजबूत करण्याची संधी मिळाली आणि पाकिस्तानच्या या प्रदेशावर असलेल्या दाव्याला नैतिक पराभव मानले गेले. तरीही, आजही प्राकृतिक आपत्ती आणि प्रतिकूल वातावरण पाकिस्तानला सियाचीनवर पुनःप्रयत्न करण्यापासून रोखू शकलेले नाहीत आणि यामुळे भारताला आपल्या सैनिकांची आणि उपकरणांची देखभाल करण्यासाठी उच्च खर्च करावा लागतो. हा भाग इतका प्रतिकूल आहे की, ऑपरेशन मेघदूतदरम्यान शहीद झालेल्या सैनिकांच्या अवशेषांचा शोध फक्त ३८ वर्षांनी २०२२ मध्ये अनपेक्षितपणे लागला. तथापि, गेली ४१ वर्षे भारतीय सैनिकांचा निर्धार अत्यंत मजबूत आहे, जे त्यांच्या सतत उपस्थिती आणि ताब्याच्या ठिकाणी नियंत्रण ठेवण्यात दिसून येते हे त्यांच्या अविचल निष्ठेचे आणि जिद्दीचे प्रतीक आहे. ऑपरेशन मेघदूतचा सारांश सियाचीन बेस कॅम्पवरील एक स्मारक करत करत दिला जाऊ शकतो, ज्यावर योग्यपणे लिहिले आहे "हिमात कडवटलेले, शांत राहणारे, जेव्हा तुरुंग वाजेल, तेव्हा ते उठतील आणि पुन्हा चालतील!"

(लेखक हे भोंसला मिलिटरी स्कूलमध्ये एनसीसी अधिकारी आहेत.)

# जिंदगी...कैसी है पहेली?



ऐंशी ते नव्वदच्या दशकातील हिंदी चित्रपटातील गाणी ऐकायला आवडतात. ही गाणी अर्थपूर्ण तर आहेतच आणि श्रवणीय आहेत. या गाण्यांची खासियत अशी की, ही गाणी गोड आवाजाच्या गायकांनी गायली आहेत आणि कानाला सुसह्य होणारे संगीत कितीही वेळा ऐकले तरी मन भरत नाही. लांबच्या प्रवासात ही गाणी हमखास ऐकावी वाटतात. नुकतेच मुंबई ते लातूर या प्रवासात हिंदी चित्रपटातील गाजलेली गाणी ऐकत होतो आणि एक लोकप्रिय गाणे अनपेक्षितपणे सुरू झाले...

जिंदगी कैसी है पहेली? कभी तो हंसाये, कभी यह रुलाये...मानवी जीवनाचा खरा अर्थ सांगणारे हे गीत ऐकताना ऐकणारा अंतर्मुख होऊन जातो. मानवी जीवनाचा खरा अर्थ समजून घेऊ लागतो.

हे गीत ऐकल्यावर लक्षात येते की, मनुष्याची जिंदगी एक कोडं आहे. हे कोडं भल्याभल्यांना सुटत नाही. कैक लोकांना तर मानवी जीवनाचा खरा अर्थ कधीच कळत नाही. ते लोक मानवी जीवनाचा अर्थ समजून घेण्याच्या फंदात पडतही नाहीत. मिळालेच आहे मानवी जीवन तर जगायचे कसेही? कशाला जास्त ताण घ्यायचा? असे त्यांचे म्हणणे असते. कदाचित ते खरे असेलही, पण मनुष्य जीवन हे तकलादू व क्षणभंगुर आहे. मानवी जीवनात जेवढे सुख आहे, तेवढेच दुःख पण आहे. माणूस सुखाला हपापलेला आहे आणि दुःखाला मात्र फार घाबरतो. इथेच त्याचे चुकते आणि जीवन जगायचे कसे हसत हसत की रडत रडत हे त्याला शेवटपर्यंत कळत नाही. जीवनात सुखदुःख येणे हे व्यक्तीच्या कर्माचे फलित असते असे म्हटले जाते. चांगले कर्म केले की जीवनात सुख मिळते आणि वाईट कर्म केल्यावर समोर दुःखाचा डोंगर उभा राहतो, हे अगदी सत्य आहे.

परंतु, नेहमी चांगले कर्म करणाऱ्या आणि नेक व प्रामाणिक वागणाऱ्या सुहृदयी व्यक्तींच्या वाट्याला नेहमी दुःख येते आणि जे लोक वाईट वर्तनात, वाईट विचारांत आकंठ बुडालेले असतात आणि नेहमी कुकर्म करतात, त्यांच्या जीवनातील सुखाचा झरा कधीच आटत नाही. आहे की नाही गंमत? न सुटणारे मनुष्य जीवनाचे कोडे?

संजय अर्थमवार माझा वर्गमित्र. स्वभावाने प्रेमळ, वागायला व बोलायला अतिशय चांगला. हुशार बुद्धीचा. पण आर्थिक परिस्थितीने गांजलेला. काही कारणास्तव शिक्षण पूर्ण करू शकला नाही. परिणामी, कपाळावर सुशिक्षित बेकाराचा शिक्का कायमस्वरूपी लागला. पण त्याने हार मानली नाही. टेलरिंग व्यवसाय करत करत तो मार्केटिंग क्षेत्रात उतरला. थोडी धावपळ होत आहे, पण तो त्याच्या मुलीला व मुलाला इंजिनिअरिंगचे उच्च शिक्षण

बबन गुळवे
उमरगा कोर्ट ता. अहमदपूर

शिकवत आहे. त्याने त्याच्या जीवनाचे कोडे कष्टाच्या बळावर सोडवले आहे.

नंदू सूर्यवंशी हा आणखी एक माझा वर्गमित्र. तो शेतकरी आहे आणि जोडधंदा म्हणून त्याने एक शेतमाल वाहतुकीसाठी टेम्पो खरेदी केला. गावातील शेतकऱ्यांचा शेतमाल आपल्या गाडीने पण माफक भाड्याने अडतीला नेऊन घालण्याचे काम करतो. घरात आता सुखच सुख येणार होते पण नियतीने त्याच्या जीवनात फार मोठा कुटिल डाव खेळला आहे. सुखाच्या ऐवजी त्याचे कुटुंब एका वेदनेने व दुःखाने भाजून निघत आहे. त्याचा एक मुलगा ज्याचे वय अवघे २२ वर्षे आहे, तो किडनी विकाराने ग्रस्त आहे. सगळे उपचार करून झाले, खोऱ्याने पैसा घातला पण योग्य उपचार मिळाला नाही. आठवड्यातून दोन वेळा डायलिसिस करावे लागते. पण मुलाच्या जीवनाची शाश्वती नाही! किती ही हृदयद्रावक घटना? मन सुन्न करणारी! दीपक रणक्षेत्रे हा माझा मित्र अतिशय कष्टाळू. हरामाची कमाई त्याला मान्य नव्हती. बांधकाम व्यवसायात त्याचा चांगला जम बसला होता. नियतीने अचानक त्याच्या जीवनात दुःखाचा डोंगर आणला. मुलगी व मुलगा एका विचित्र आजाराने दगावले.त्याला स्वतःला अर्धांगवायू झाला आणि त्याच्या जीवनात काळोखाचा कुटिल खेळ सुरू आहे. जगायचे कसे हा त्याच्या पुढे फार मोठा प्रश्न निर्माण झाला आहे!

त्यामुळे जिंदगी कैसी है पहेली?कभी तो हंसाये, कभी यह रुलाये हे गीत ऐकून हा लेख लिहिताना मनाला खूप वेदना झाल्या. चांगल्या लोकांनी जीवन जगावे कसे? हा प्रश्न मनात रुंजी घालत राहिला.

# सोन्याच्या विटा, मंदिरांचा विकास, आरोग्य आणि शिक्षणाचा उजेड!

तमिळनाडू सरकारने नुकतेच एक स्तुत्य पाऊल उचलले आहे. राज्यातील मंदिरांमध्ये भक्तांनी अर्पण केलेल्या एक हजार किलोंपेक्षा अधिक सोन्याचे दागिने वितळवून त्या २४ कॅरेट सोन्याच्या विटांमध्ये रूपांतरित करण्यात आले. या विटा बँकांमध्ये ठेवून त्यातून दरवर्षी १७.८१ कोटी रुपयांचे व्याज मिळवले जात आहे. विशेष म्हणजे हे उत्पन्न मंदिरांच्या विकासासाठी वापरण्यात येत आहे. हे एक दूरदृष्टी असलेले आणि आर्थिक शिस्तीचा आदर्श असणारे पाऊल म्हणावे लागेल.

हे उदाहरण महाराष्ट्रासाठी आणि इतर राज्यांसाठी प्रेरणादायी ठरावे. महाराष्ट्रात पंढरपूरचा



श्री विठोबा, शिर्डीचे साईबाबा मंदिर, मुंबईचा लालबागचा राजा, तुळजापूरची भवानी माता, जेजुरीचा खंडोबा अशी असंख्य श्रद्धास्थाने आहेत जिथे लाखो भाविक देणगी स्वरूपात सोने-चांदी अर्पण करतात. या संपत्तीचा वापरही तमिळनाडूच्या धर्तीवर विकासात्मक कामांसाठी व्हावा, ही काळाची गरज आहे.

मंदिरांमध्ये अर्पण झालेली ही संपत्ती केवळ गाभाऱ्यात शोभेची वस्तू म्हणून न ठेवता तिचा जनकल्याणासाठी वापर करणे, हेच खरे धर्मकार्य ठरेल. आज ग्रामीण भागातील हजारो गावांमध्ये अद्यापही सुसज्ज आरोग्यसेवा नाही, चांगले शाळा-कॉलेज उपलब्ध नाहीत. अशा वेळी मंदिर व्यवस्थापनाकडून मिळणाऱ्या उत्पन्नातून मोफत किंवा

जनमनाचे प्रतिध्वनी

माफक दरात दवाखाने, रक्तपेढ्या, शाळा, वसतिगृहे उभारण्याचे कार्य होणे आवश्यक आहे.

अर्थात, यासाठी पारदर्शक यंत्रणा आणि जबाबदारीनिशी काम करणाऱ्या समित्यांची गरज आहे. जसे तमिळनाडूमध्ये निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली तीन समित्या नेमण्यात आल्या, तशीच व्यवस्था इतर राज्यांतही होणे गरजेचे आहे. मंदिरांशी संबंधित धर्मादाय संस्था, राज्य सरकार आणि स्थानिक स्वयंसेवी संस्था यांचा समन्वय साधून समाजाभिमुख उपक्रम राबवता येतील. मंदिरांचा अर्थ हा केवळ आध्यात्मिक उन्नतीपुरता मर्यादित नसून, तो सामाजिक भल्यासाठीही असावा. देवाच्या नावावर जमा झालेली संपत्ती गरजूंच्या आरोग्य, शिक्षण, रोजगारासाठी वापरली गेली तर ती खरी 'देवसेवा' ठरेल. आज तमिळनाडूने एक आदर्श उभा केला आहे. आता महाराष्ट्रासह संपूर्ण देशाने या दिशेने पावले टाकावी, हीच अपेक्षा. **-मच्छिंद्र ऐनापुरे**

## संतांनी भगवंताला सगुणात आणले

सर्वांत अर्पणभक्ती श्रेष्ठ आहे. पूजा करताना 'मी तुझा दास आहे' असे म्हणावे, म्हणजे प्रेम येते. यात लाज वाटायचे काहीच कारण नाही. आधी भगवंताचे दास व्हावे आणि मग पूजा करावी. आम्ही इतर कित्येकांचे दास होतो, आणि इतक्यांतून उरेल तेव्हा भगवंताचे दास होणार; मग पूजेत अर्पणभक्ती कशी येणार ? आपल्याला जे जे आवडते ते ते मनाने भगवंताला अर्पण करावे. इथे सर्व काही मनानेच करायचे असते. नुसते शरीराने काबाडकष्ट केले म्हणजे प्रेम येतेच असे नाही. चित्त विषयाकडे ठेवून भगवंताची सेवा करणे म्हणजे अंगचोरपणा आला. असा अंगचोरपणा करू नये. भगवंताकडे मन लागायला सगुणोपासना उत्तम होय. सर्व लोक या ना त्या रूपाने सगुणाचीच उपासना करणारे असतात. ठरलेली वेळ आणि ठरलेले साधन असावे, म्हणजे त्यामध्ये प्रेम येते. आपण ज्याची उपासना करतो तो तरी सगुणामध्येच असतो ना ? म्हणून त्यालासुद्धा मग ती सवय लागते. आपण ज्या मूर्तीची उपासना करतो त्या मूर्तीमध्ये तेज वाढत असते. ज्या मूर्तीची उपासना एखाद्या साधूने केलेली असेल त्या मूर्तीमध्ये फार तेज असते, आणि ते पुष्कळ काळ टिकते. शिवाय ते इतरांनाही उपयोगी पडते. जगाचे खरे स्वरूप कळण्यासाठी सगुण उपासनाच कारणीभूत आहे.



विचारधन

गांवकरी® गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
मुख्य कार्यालय : 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com

बाजार - कंपन्या - मनोरंजन



## ओलेक्ट्राने सादर केला जीएफआरपी रीबार : स्टीलपेक्षा उत्तम पर्याय

**हैदराबाद:** ओलेक्ट्रा ने एमईआईएल बजेट मीटदरम्यान जीएफआरपी रीबार (ग्लास फायबर प्रबलित पॉलिमर रीबार) लॉन्च केला आहे. काँक्रिटला मजबूत करण्याच्या वाटचालीत हे मोठे तांत्रिक यश मानले जात आहे. या नवीन उत्पादनाचे उद्घाटन एमईआईएलचे व्यवस्थापकीय संचालक श्री पी. व्ही. कृष्ण रेड्डी यांच्या हस्ते झाले. जीएफआरपी रीबार हा स्टीलपेक्षा दोन पट जास्त ताकदवान : ९५०-११०० MPa, स्टीलपेक्षा चार पट हलके: हाताळणे व वाहतुकीस सोपे, गंजरोधक, चुंबकीय नसलेले व जलरोधक: दीर्घकाळ टिकणारे, पर्यावरणपूरक: स्टीलसाठी उत्तम पर्याय आहे. ओलेक्ट्रा सीएमडी के. व्ही. प्रदीप म्हणाले, हे उत्पादन बांधकाम उद्योगात क्रांती घडवेल. हे खर्चाची बचत, कमी देखभाल व जास्त काळ टिकणारे ठरेल. याच्या उपयोगामुळे बांधकाम प्रकल्पांसाठी नवी मानके तयार होतील. जीएफआरपी रीबारचा उपयोग समुद्री प्रकल्प, रस्ते, पूल डेक, औद्योगिक बांधकामे यांसारख्या ठिकाणी केला जाऊ शकतो. हे स्टीलच्या तुलनेत अधिक टिकाऊ व विश्वासार्ह आहे. ओलेक्ट्रा, MEIL समूहाचा भाग आहे. कंपनीची २००० साली स्थापन झाली. भारतामध्ये इलेक्ट्रिक बसेस सुरू करणारी ही अग्रणी कंपनी आहे. आता रीबार उत्पादनामुळे ओलेक्ट्रा पायाभूत सुविधा क्षेत्रातही आपला ठसा उमटवत आहे.

## 'वीर हनुमान' मालिकेत मातेच्या प्रेमाचा सन्मान



**मुंबई :** सोनी सबवरील वीर हनुमान या मालिकेत एका कुतुहलाने भरलेल्या बालकापासून ते शक्तिशाली दिव्य योद्धा हनुमान बनण्यापर्यंतचा मारुतीचा प्रवास रेखाटला आहे. पुराणकथा, अ‍ॅक्शन आणि भावना यांची सुंदर सांगड घालत ही मालिका एका चमकदार शैलीत ही पुराणकथा सादर करते. या मालिकेत छोट्या मारुतीच्या भूमिकेत आन तिवारी, केसरी आणि अंजनीच्या भूमिकेत आरव चौधरी आणि सायली साळुंखे तर वाली आणि सुग्रीवच्या दुहेरी भूमिकेत माहिर पांधी दिसत आहेत. अलीकडच्या भागात, मारुती अणिमा सिद्धीच्या साहाय्याने सूक्ष्म रूप धरण करून कालदंतचा पराभव करतो, ते प्रेक्षकांनी पाहिले. पण या विजयानंतर एक वेगळीच समस्या उभी राहते. तो आपल्या मूळ रूपात परत येऊ शकत नाही. पाताळ कालीच्या आशीर्वादाने सामर्थ्य प्राप्त करणारा कालदंत मारुतीवर सूड उगवत त्याला शाप देतो की, फक्त अंजनीच्या बलिदानानंतरच मारुती त्याच्या मूळ रूपात येता येईल. आगामी भागांमध्ये, प्रेक्षक एक भावनिक लढा बघतील. अंजनी निःस्वार्थपणे आपला आत्मा पाताळ कालीच्या स्वाधीन करण्यास सज्ज होते आणि आपल्या जीवनाच्या बदल्यात आपल्या मुलाला त्याचे मूळ रूप परत मिळण्यासाठी देवीची करुणा भाकते. हनुमानाला जेव्हा हे समजते, तेव्हा तो पाताळ लोकात जातो आणि भयानक राक्षसांशी युद्ध करून आपल्या आईचे रक्षण करतो. देवी अंजनीची भूमिका करत असलेली सायली साळुंखे म्हणते, आईचे प्रेम अमर्याद असते. जीवन किंवा मृत्यूचे बंधन देखील त्यास रोखू शकत नाही. प्रत्येक मातेमध्ये अशी असामान्य, अकल्पनीय शक्ती उफाळून येते. हीच आईच्या प्रेमाची ताकद आहे - ती नियतीला देखील दाद देत नाही आणि स्वतःच आपल्या त्यागाची आणि धैर्याची कहाणी लिहिते.

## स्वातंत्र्यदिनी भरत जाधव यांचा ट्रिपल धमाका

**मुंबई :** चित्रपट, मालिका आणि नाटक अशा मनोरंजनाच्या विविध माध्यमांमध्ये चतुरस्र अभिनेते भरत जाधव यांनी स्वतःची एक वेगळी छाप पाडली आहे. स्वतःचा एक प्रचंड मोठा चाहता वर्गही त्यांनी निर्माण केला. अभिनयासोबतच निर्मिती क्षेत्रातही त्यांनी पाऊल टेवलं. मराठी रंगभूमीवर 'सही रे सही', 'श्रीमंत दामोदर पंत', 'ऑल दि बेस्ट', 'आमच्या सारखे आम्हीच' अशी अनेक नाटकं त्यांनी गाजवली असून, काहीतरी नावीन्यपूर्ण देण्याकडे भरत जाधव यांचा कायमच कल राहिला आहे. त्यामुळे यंदाही असेच काहीतरी नवीन घेऊन येण्यास भरत जाधव सज्ज झाले आहे. काही वर्षांपूर्वी १५ ऑगस्ट रोजी 'पुन्हा सही रे सही' या नाटकाचा शुभारंभ करण्यात आला होता. याच खास क्षणांचं औचित्य साधत भरत जाधव येत्या १५ ऑगस्ट रोजी नाट्यरसिकांसाठी ट्रिपल धमाका घेऊन येत आहेत. यात एकाच दिवशी तीन वेगवेगळ्या नाटकांचे प्रयोग एकाच नाट्यगृहात प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहेत. बोरिवलीच्या प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृहात हे प्रयोग होणार असून या दिवशी रसिकांना भरत जाधव यांच्या वेगवेगळ्या पात्रांची झलक अनुभवायला मिळणार आहे. यावेळी सकाळी 'अस्तित्व', दुपारी 'मोरूची मावशी' तर सायंकाळी 'पुन्हा सही रे सही' या तीन नाटकांचे प्रयोग होणार आहेत. वैशिष्ट्य म्हणजे 'पुन्हा सही रे सही' या नाटकाचा ४४४४ वा प्रयोग यावेळी होणार असून, या प्रयोगाला राज ठाकरे यांची उपस्थिती लाभणार आहे.

# भारत-अमेरिकेत टॅरिफ संघर्ष मिटणार लवकरच होणार द्विपक्षीय करार

**नवी दिल्ली : टॅरिफ आणि जागतिक व्यापार युद्धाची भीती हळूहळू कमी होत असून, अनेक देश अमेरिकेशी चर्चा करत आहेत. यादरम्यान अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या परस्पर शुल्कामुळे (रेसिप्रोकल टॅरिफ) निर्माण झालेल्या जागतिक संकटाच्या पार्श्वभूमीवर भारतासाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. अमेरिकेसोबत द्विपक्षीय व्यापार करार करणारा भारत लवकरच पहिला देश बनू शकतो. अमेरिकेचे अर्थमंत्री स्कॉट बेसंट यांनी भारत आणि अमेरिकेतील व्यापार करार अंतिम टप्प्यात असल्याचे संकेत दिले आहेत.**



भारत अमेरिकेसोबत व्यापार करारावर स्वाक्षरी करणारा पहिला देश बनू शकेल, कारण मुद्दे सोपे आहेत, ज्यामुळे करार 'खूप सोपा' होईल अशी बेसंट यांनी अपेक्षा वर्तवली आहे. अमेरिकेने भारतीय निर्यातीवर २६% प्रत्युत्तरात्मक शुल्क लादले, पण नंतर शुल्क आकारणी ९० दिवसांसाठी पुढे ढकलली. ज्याची मुदत ८ जुलै रोजी संपेल. मात्र, सध्या इतर देशांप्रमाणे सध्याच्या धोरणानुसार भारतावर १० टक्के शुल्क आकारले जात आहे. दोन्ही देशांमधील व्यापार करार अंतिम झाला तर, ट्रम्पच्या 'परस्पर शुल्काच्या' तावडीतून सुटणार भारत पहिला देश बनेल. अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हान्स भारत दौऱ्यावर असताना अमेरिकेच्या अर्थमंत्र्यांचे विधान समोर आले आहे.

काही पत्रकारांसोबत झालेल्या गोलमेज बैठकीत बेझंट म्हणाले की, भारतासोबतच्या व्यापार चर्चा यशस्वी निष्कर्षापर्यंत पोहोचण्याच्या अगदी जवळ आहेत. याचे कारण असे की, जगातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेल्या देशाने कोणतेही खूप जास्त कर लादलेले नाहीत. भारतात कमी नॉन-टॅरिफ व्यापार अडथळे आहेत, असे बेझंट यांनी जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या वार्षिक बैठकीच्या बाजूला एका कार्यक्रमात सांगितले. यासोबतच चलन पातळीवर कोणतीही समस्या नाही, सरकारी अनुदान आहे पण खूप कमी असल्याचही त्यांनी स्पष्ट केलं. त्यामुळे भारतासोबत करार करणे खूप सोपे आहे.

राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी इतर देशांनी अमेरिकन वस्तूंवरील शुल्क आणि नॉन-टॅरिफ अडथळे दूर करावे आणि अमेरिकेची व्यापार तूट कमी करावी, अशी मागणी केल्याचेही अहवालात पुढे म्हटले. २०२४ मध्ये भारतासोबत अमेरिकेची व्यापार तूट ४५.७ अब्ज डॉलर्स होती तर अमेरिकेला भारतातून ३% आयात होते. दोन्ही देशांमधील संबंध सतत मजबूत होत असून ट्रम्प यांच्या धोरणानुसार, जर कोणताही देश अमेरिकन वस्तूंवर जास्त शुल्क लादत असेल तर अमेरिका तितक्याच प्रमाणात प्रत्युत्तरात्मक शुल्क लादते. २ एप्रिल रोजी अमेरिकेने भारतावर २६% पर्यंत शुल्क आकारले होते, जे जुलैपर्यंत स्थगित केले.



## स्वाद काठियावाडचा - सौराष्ट्रच्या पारंपरिक चवींचा अनुभव नाशिकमध्ये

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

सौराष्ट्र आणि गुजरातची पारंपरिक चव आणि सौराष्ट्री खाद्यसंस्कृतीचा गंध नाशिकमध्ये दरवळतोय. एक्स्प्रेस इन हॉटेलमधील 'आस्टर' या खुल्या भोजनस्थळी 'स्वाद काठियावाडचा' या खास जेवण महोत्सवाची रंगत सुरू झाली आहे. २५ एप्रिलपासून ४ मेपर्यंत दररोज संध्याकाळी ७.३० वाजता सुरू होणारा हा महोत्सव नाशिककरांना सौराष्ट्रातील पारंपरिक आणि गावरान चवींचा खास अनुभव देतो आहे.

प्रसिद्ध स्वयंपाकतज्ज्ञ प्रताप चहर यांच्या मार्गदर्शनाखाली पूनम देढिया यांनी साकारलेला हा महोत्सव केवळ अन्न नव्हे तर संस्कृती, परंपरा आणि प्रेमाने साजरे केलेले एक खाद्यपर्व आहे. रिंगणा नो ओलो (धुरकट वांग्याची भाजी), कुरकुरीत थेपला, लसणिया बटेटा (तिखट बटाट्याची भाजी), बाजरीचा रोटलो (तूप, लोणी व गुळासोबत) असे अस्सल गुजराती पदार्थ पाहुण्यांना थेट तयार करून गरमागरम दिले जात आहेत. महोत्सवाच्या ठिकाणी पारंपरिक गुजराती वातावरणाची रचना करण्यात आली आहे. मातीची भांडी, कंदील, पारंपरिक पोशाखातील कर्मचारी, फोक आर्टचे फलक आणि थेट वाजवले जाणारे लोकवाद्य यामुळे पाहुण्यांना एका खास सांस्कृतिक प्रवासाचा अनुभव मिळतो आहे.

जीएम संजय रामनंद यांच्या मार्गदर्शनाखाली जनसंपर्क अधिकारी केविन संचेती, व्यवस्थापक प्रणव ज्योती, इस्माईल शेख आणि शेफ पूनम देढिया, प्रताप चहर यांच्या सहभागाने हा महोत्सव अधिकच आकर्षक बनला आहे.

# नाबार्डकडून ॲग्री-फिनटेक स्टार्टअपची समभाग खरेदी

## ग्रामीण पत डिजिटायझेशनला या उपक्रमातून मिळणार चालना

**मुंबई :**

राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेने(नाबार्ड) २४÷७ मनीवर्क्स कन्सल्टिंग प्रायव्हेट लिमिटेड या पुढील पिढीतील कृषी फिनटेक उपक्रमातील समभाग खरेदी केला आहे. नाबार्डची ही पहिली गुंतवणूक आहे, ज्यामुळे ग्रामीण भारतातील डिजिटल परिवर्तनाची वचनबद्धता अधिक दृढ झाली आहे.

२४÷७ मनीवर्क्स कन्सल्टिंग प्रायव्हेट लिमिटेडचा फ्लॅगशिप प्लॅटफॉर्म, ईकिसान क्रेडिट (eKCC), सहकारी बँका, PACS आणि आरआरबीसाठी डिझाइन केलेली पूर्णपणे डिजिटल कर्ज उत्पत्ती प्रणाली आहे. eKCC प्लॅटफॉर्म जमिनीच्या नोंदी, आधार, eKYC, कोअर बँकिंग सिस्टम आणि eP-CS अखंडपणे समाकलित होते, जे ग्रामीण भागातील कर्जांचे चक्र सुरुवातीपासून शेवटपर्यंत स्वयंचलित आणि डिजिटल झाले आहे.

गेल्या अडीच वर्षांत नाबार्डने विविध बँकांमध्ये eKCC प्रायोगिक तत्त्वावर सुरू केले आहे आणि हा मंच आता देशभरात कार्यान्वित करण्यासाठी सज्ज आहे.

नाबार्डचे अध्यक्ष शाजी के.व्ही. म्हणाले की, ग्रामीण वित्तपुरवठ्यात नावीन्यपूर्णता आणि प्रभाव निर्माण करणाऱ्या स्टार्टअपला पाठिंबा देताना नाबार्डला अतिशय अभिमान वाटत आहे. eKCC कृषी कर्ज वितरणात प्रवेश, पारदर्शकता आणि कार्यक्षमता सुधारण्याची क्षमता दर्शविली आहे. या धोरणात्मक सहकार्यामुळे सहकारी बँका, पॅक्स आणि आरआरबी यांना घटक लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना जलद, पारदर्शक आणि अधिक समावेशक कर्ज सेवा प्रदान करण्यास मदत करतील.

या स्टार्टअपने एआयएफ-आयएस हा डिजिटल मंचही विकसित केला आहे - एआयएफआयएस म्हणजे कृषी पायाभूत सुविधा निधी अंतर्गत व्याज अनुदान दाव्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी तयार करण्यात आलेला एक डिजिटल मंच आहे. एआयएफआयएस मंच व्याज अनुदान दाव्यांचे क्षणोक्षणी (रिअल-टाइम) प्रमाणीकरण आणि वितरण करते. नाबार्डचे डीएमडी श्री. जी. एस. रावत यांसंगी म्हणाले, सध्याच्या साखळीतील अखेरच्या टोकाला असलेल्या संस्थांना डिजिटल आविष्कारांच्या माध्यमातून सक्षम बनवले पाहिजे, हा विश्वास नाबार्डच्या गुंतवणुकीतून प्रतिबिंबित होतो. eKCC हा एक सक्षम आकार असलेला आणि प्रत्यक्ष कामकाजाच्या ठिकाणी योग्य पर्याय प्रदान करणारा मंच आहे. २४७ मनीवर्क्स कन्सल्टिंग प्रायव्हेट लिमिटेडचे संस्थापक आणि सीईओ रणजीत गौतम म्हणाले, ही भागीदारी ग्रामीण भारतासाठी तंत्रज्ञानावर आधारित तसेच सर्वसमावेशक कर्जपुरवठ्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या आमच्या ध्येयाला आणखी बळकट करते. आमचे पर्याय साखळीतील अगदी शेवटच्या घटकांच्या गरजांचा विचार करून तयार करण्यात आलेले आहेत.

२४÷७ मनीवर्क्स कन्सल्टिंग प्रायव्हेट लिमिटेडचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत गौतम म्हणाले, ही भागीदारी ग्रामीण भारतासाठी तंत्रज्ञान-चलित, सर्वसमावेशक कर्जपुरवठ्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या आमच्या ध्येयास पुष्टी देते. आमचे पर्याय साखळीतील अगदी शेवटच्या घटकांच्या गरजांचा विचार करून तयार करण्यात आलेले आहेत.

## दहशतवादी हल्ल्यातील पीडितांना एलआयसीकडून मदतीचा हात

**मुंबई :**

दहशतवाद जगाला लागलेला मोठा शाप आहे. भारत गेल्या अनेक दशकांपासून दहशतवादाविरुद्ध लढत असून, आता पुन्हा एकदा काश्मीरमधील पहलगाममध्ये निःशस्त्र पर्यटकांवर गोळीबार करून दहशतवाद्यांनी संपूर्ण देशाला हादरवून टाकले. या हल्ल्यात सुमारे २६ जणांचा मृत्यू झाला असून, याआधी २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात सुमारे १६६ निष्पाप लोकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतरही देशात वेगवेगळ्या ठिकाणी दहशतवादी हल्ले झाले. ज्यात निष्पाप लोकांचा बळी गेला.

भारतीय जीवन विमा महामंडळाने पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील पीडितांना मदत करण्यास आणि आर्थिक मदत देण्यासाठी दाव्यांची निपटारा प्रक्रिया जलद करण्याचे आश्वासन दिले. दहशतवादी हल्ल्यात निष्पाप नागरिकांच्या मृत्यूबद्दल एलआयसीने तीव्र दुःख व्यक्त केले आहे. एलआयसीने म्हटले आहे की, मृत्यू प्रमाणपत्राऐवजी दहशतवादी हल्ल्यामुळे पॉलिसीधारकाचा मृत्यू किंवा केंद्र किंवा राज्य सरकारांनी दिलेल्या कोणत्याही भरपाईचा सरकारी नोंदीमध्ये उपलब्ध असलेला कोणताही पुरावा मृत्यूचा पुरावा म्हणून स्वीकारला जाईल.

एलआयसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक सिद्धार्थ मोहंती म्हणाले की, दावेदारांपर्यंत पोहोचण्यास आणि पीडित कुटुंबांचे दावे जलदगतीने निकाली काढण्यासाठी सर्व प्रयत्न केले जातील. त्यांनी सांगितले की, दावेदार मदतीसाठी जवळच्या एलआयसी कार्यालयाशी संपर्क साधू शकतात. मृत व्यक्तीचे नॉमिनी किंवा दावेदार ०२२-६८२७६८२७ वर कॉल करू शकतात.

## सुनील शेट्टीचा सिनेमा आता पाकमध्ये प्रदर्शित होणार नाही

**मुंबई :**

बॉलिवूड अभिनेता सुनील शेट्टीचा आगामी चित्रपट 'केसरी वीर : लीजेंड्स ऑफ सोमनाथ' सध्या चर्चेत आहे. हा चित्रपट संपूर्ण जगात प्रदर्शित होणार होता. त्यासोबतच पाकिस्तानमध्येही प्रदर्शित होणार होता. मात्र, पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर निर्मात्यांनी मोठा निर्णय घेतला आहे. हा चित्रपट पाकिस्तानमध्ये प्रदर्शित करणार नसल्याचे त्यांनी घोषित केले आहे.

सुनील शेट्टीचा आगामी ऐतिहासिक ड्रामा 'केसरी वीर : लीजेंड्स ऑफ सोमनाथ' पाकिस्तानात रिलीज होणार नाही. काश्मीरच्या पहलगाम येथे अलीकडेच झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर चित्रपटाच्या निर्मात्याने आपला संताप व्यक्त करत ही मोठी घोषणा केली आहे. हा चित्रपट १६ मे रोजी चित्रपटगृहात रिलीज होणार आहे. 'केसरी वीर : लीजेंड्स ऑफ सोमनाथ' या ऐतिहासिक अ‍ॅक्शन-ड्रामामध्ये सूरज पंचोली, विवेक ओबेरॉय आणि आकांक्षा शर्मा यांच्या मुख्य भूमिका आहेत. हा चित्रपट १४व्या शतकात शूर योद्ध्यांनी सोमनाथ मंदिराच्या रक्षणासाठी केलेल्या लढ्याची कथा पुन्हा जिवंत करेल. चित्रपटाचा ट्रेलर लॉन्च, २९ एप्रिल रोजी मुंबईत प्रदर्शित होणार आहे.

# प्रेस्टिज हॉटेल व्हेंचर्सने सेबीकडे दाखल केला डीआरएचपी

**मुंबई :**

प्रेस्टिज हॉटेल व्हेंचर्स लिमिटेड ही भारतातील व्यावसायिक व पर्यटकांसाठी लक्झरी, अपर अपस्केल आणि अपर मिडस्केल स्तरातील हॉस्पिटॅलिटी मालमत्तांवर लक्ष केंद्रित करणारी, एक हॉस्पिटॅलिटी मालमत्ता मालक व विकासक कंपनी आहे. तिने आपल्या प्राथम रेड हेरिंग प्रॉस्पेक्टसची प्रत बाजार नियामक भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाकडे दाखल केली आहे.

या आरंभिक सार्वजनिक समभाग विक्रीमध्ये प्रत्येकी ५ दर्शनी मूल्यसह नवीन इक्विटी शेअर्सचा समावेश आहे, ज्याची एकूण किंमत १,७०० कोटींपर्यंत आहे. याबरोबरच, प्रत्येकी ५ दर्शनी मूल्यासह १,००० कोटींच्या इक्विटी शेअर्सचा विक्रीसाठीचा प्रस्ताव आहे. विक्रीसाठीचा हा प्रस्ताव प्रेस्टिज इस्टेट्स प्रोजेक्ट्स लिमिटेड यांच्याकडून आहे. प्रेस्टिज हॉटेल व्हेंचर्स लिमिटेड ११२१.२७६ कोटींची अंदाजे रक्कम निव्वळ उत्पन्नातून वापरण्याचा प्रस्ताव ठेवते. यामध्ये कंपनी व तिच्या महत्त्वाच्या उपकंपन्यांनी, साई चक्र हॉटेल्स प्रायव्हेट लिमिटेड आणि नॉर्थलँड होल्डिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, घेतलेल्या ३९७.२४ कोटींच्या कर्जाचे पूर्ण किंवा अंशतः परतफेड/पूर्वपरतफेड करण्यासाठी ७२४.०२८ कोटींची गुंतवणूक या उपकंपन्यांमध्ये केली जाईल. याबरोबरच कंपनी अज्ञात न ठरविलेल्या अधिग्रहणांद्वारे आणि इतर रणनीतिक उपक्रमांद्वारे अजैविक वाढ साधण्यासाठी व सर्वसाधारण कॉर्पोरेट कारणांसाठी निव्वळ उत्पन्नातील निधीचा वापर करण्याचा विचार करत आहे.

प्रेस्टिज हॉटेल व्हेंचर्स लिमिटेड ही एक हॉस्पिटॅलिटी मालमत्ता मालक आणि विकासक कंपनी आहे, जी भारतातील व्यावसायिक आणि पर्यटन हेतूने प्रवास करणाऱ्या ग्राहकांसाठी लक्झरी, अपर अपस्केल व अपर मिडस्केल श्रेणीतील हॉस्पिटॅलिटी मालमत्तांवर लक्ष केंद्रित करते. ही कंपनी प्रेस्टिज ग्रुपचा भाग आहे आणि तिचे प्रवर्तक प्रेस्टिज इस्टेट्स प्रोजेक्ट्स रिअल इस्टेट डेव्हलपमेंटमध्ये ३८ वर्षांचा अनुभव असलेली कंपनी आहे. ३१ डिसेंबर २०२४ रोजी या प्रवर्तक कंपनीचे बाजार भांडवलीकरण ७९१.६६ अब्ज इतके होते. ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत प्रेस्टिज हॉटेल व्हेंचर्सच्या पोर्टफोलिओमध्ये एकूण सात चालू हॉस्पिटॅलिटी मालमत्ता आहेत.


# एथर एनर्जी लिमिटेडचा आयपीओ सोमवारी उघडणार

**मुंबई :**

एथर एनर्जी लिमिटेड त्यांच्या १ दर्शनी मूल्याच्या (इक्विटी शेअर्स) इक्विटी शेअर्सची प्रारंभिक सार्वजनिक ऑफर (ऑफर) सोमवार (दि. २८) रोजी उघडण्याचा प्रस्ताव ठेवत आहे. अँकर इन्व्हेस्टर बिडिंगची तारीख बोली/ऑफर उघडण्याच्या तारखेच्या एक दिवस आधीची म्हणजेच शुक्रवार (दि. २५ आहे, तर बोली/ऑफर बंद होण्याची तारीख ३० एप्रिल आहे.

ऑफरचा किंमत बँड प्रति इक्विटी शेअर ३०४ वरून प्रति इक्विटी शेअर ३२१ पर्यंत निश्चित करण्यात आला आहे. किमान ४६ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ४६ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावता येईल. IPO मध्ये २६,२६० दशलक्षपर्यंतच्या इक्विटी शेअर्सचा नवीन इश्यू आणि विक्री करणाऱ्या शेअर होल्डर्सकडून ११,०५१,७४६ पर्यंतच्या इक्विटी शेअर्सची ऑफर फॉर सेल समाविष्ट आहे. यामध्ये तरुण संजय मेहता यांचे ९८०,००० पर्यंत इक्विटी शेअर्स, स्वप्निल बबनलाल जैन यांचे ९८०,००० पर्यंत इक्विटी शेअर्स, कॅलेडियम इन्व्हेस्टमेंट प्रा. लि.चे ६,००३,४६० पर्यंत इक्विटी शेअर्स, नॅशनल इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर फंड II चे २,६३४,५१४ पर्यंत इक्विटी शेअर्स, इंटरनेट फंड III प्रा. लि.चे ४००,००० पर्यंत इक्विटी शेअर्स, आयआयटीएम इन्क्युबेशन सेलकडून ३१,०५० पर्यंत इक्विटी शेअर्स, आयआयटीएमएस रुरल टेक्नॉलॉजी अँड बिझनेस इन्क्युबेटरकडून ४,१९१ पर्यंत इक्विटी शेअर्स (एकत्रितपणे कॉर्पोरेट सेलिंग शेअरहोल्डर्स) आणि अमित भाटिया (वैयक्तिक सेलिंग शेअरहोल्डर)कडून १८,५३१ पर्यंत इक्विटी शेअर्सचा समावेश आहे.

या ऑफरमध्ये पात्र कर्मचाऱ्यांसाठी (कर्मचारी आरक्षण



भाग) प्रत्येकी १ च्या दर्शनी मूल्याचे १,००,००० पर्यंत इक्विटी शेअर्सचे आरक्षण समाविष्ट आहे. कर्मचारी आरक्षण भाग वगळून दिलेली ऑफर यापुढे नेट ऑफर म्हणून ओळखली जाईल. कर्मचारी आरक्षण भाग (कर्मचारी सवलत) मध्ये बोली लावणाऱ्या पात्र कर्मचाऱ्यांना प्रति इक्विटी शेअर ३० ची सूट दिली जात आहे.

ही ऑफर सेबी आयसीडीआर नियमांच्या नियम ३१ सह एससीआरआरच्या नियम १९(२) (ब) च्या अंतर्गत दिली जात आहे. सेबी आयसीडीआर नियमांच्या नियम ६(२) नुसार बुक बिल्डिंग प्रक्रियेद्वारे ही ऑफर दिली जात आहे. सेबी आयसीडीआरच्या नियम ३२(२) नुसार, निव्वळ ऑफरच्या ७५% एवढे संस्थात्मक खरेदीदारांना (क्यूआयबी आणि असा भाग, क्यूआयबी पोर्शन) प्रमाणानुसार वाटपासाठी उपलब्ध असेल, परंतु आमची कंपनी बीआरएलएमशी सल्लामसलत करून, सेबी आयसीडीआर नियमांनुसार विवेकाधीन आधारावर अँकर गुंतवणूकदारांना क्यूआयबी पोर्शनच्या ६०% पर्यंत वाटप करू शकते, ज्यापैकी किमान एक तृतीयांश देशांतर्गत म्युच्युअल फंडांसाठी उपलब्ध असेल, अँकर इन्व्हेस्टर लोकेशन किमतीवर किंवा त्याहून अधिक वैध बोली स्थानिक म्युच्युअल फंडांकडून मिळू शकतात. अँकर इन्व्हेस्टर पोर्शनमध्ये सबस्क्रिप्शन कमी झाल्यास किंवा वाटप न झाल्यास, उर्वरित इक्विटी शेअर्स नेट क्यूआयबी पोर्शनमध्ये जोडले जातील.

निव्वळ QIB भागाच्या ५% फक्त म्युच्युअल फंडांना प्रमाणानुसार वाटपासाठी उपलब्ध असतील आणि निव्वळ QIB भागाचा उर्वरित भाग सर्व QIB बोलीदारांना (अँकर गुंतवणूकदारांव्यतिरिक्त) वैध बोली ऑफर किमतीवर किंवा त्याहून अधिक मिळाल्या, तर म्युच्युअल फंडांसह प्रमाणानुसार वाटपासाठी उपलब्ध असेल.

सर्व संभाव्य बोलीदारांना ब्लॉक केलेल्या रकमेद्वारे अर्ज समर्थित प्रक्रियेचा वापर करणे अनिवार्य आहे, त्यांच्या संबंधित बँक खात्यांची माहिती (UPI यंत्रणा वापरणाऱ्या UPI बोलीदारांसाठी UPI आयडीसह) प्रदान करून, ज्यामध्ये ऑफरमध्ये सहभागी होण्यासाठी SCSB द्वारे किंवा प्रायोजक बँकेद्वारे बोलीची रक्कम ब्लॉक केली जाईल. ASBA प्रक्रियेद्वारे ऑफरच्या अँकर गुंतवणूकदार भागात सहभागी होण्याची परवानगी अँकर गुंतवणूकदारांना नाही.

## ई-कॉमर्स फसवणूक रोखण्यासाठी ॲमेझॉनची रणनीती

**नाशिक :** भारताच्या गजबजलेल्या बाजारपेठेत फसवणूक आणि गैरवर्तन झपाट्याने वाढत असल्याने ती चिंतेचा विषय बनली आहे. ऑनलाइन खरेदीत वाढ होत असताना, अ‍ॅमेझॉन आपल्या मंचाचे संरक्षण करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित उपाययोजना राबवत आहे. जसजशी प्रगती होत आहे, तसतशी समस्यांची गुंतागुंतही वाढत चालली आहे. गेल्या काही वर्षांमध्ये देशात सोशल मीडिया, ई-कॉमर्स, उद्योग आणि फिनटेक क्षेत्रांमध्ये फसवणुकीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. पीडब्ल्यूसी इंडिया यांच्या अलीकडील अहवालात असे नमूद केले आहे की, अशा फसवणुकीच्या घटनांपैकी तब्बल ५७% प्रकरणं या प्लॅटफॉर्मशी संबंधित आहेत. ही फसवणूक अनेक प्रकारांनी समोर येते आणि त्यामागे काही अप्रामाणिक प्रवृत्तींचा संगनमताने चाललेला डाव असतो. विक्रेत्यांशी संबंधित समस्या : काही विक्रेते मार्केटप्लेसवर फसवणुकीचे प्रकार करतात. जसे की, खराब वस्तू पाठवास कमी होतो आणि मार्केटप्लेसची विश्वासार्हता बाधित होते. ग्राहकांना सुरक्षित आणि विश्वासार्ह खरेदीचा अनुभव मिळावा यासाठी अ‍ॅमेझॉनने आपल्या मार्केटप्लेसवर विविध उपक्रम राबवले आहेत. हे सर्व उपक्रम ग्राहकांचा अनुभव अधिक सुरक्षित आणि समाधानी बनवण्यासाठी आहेत : सुरक्षा उपाययोजनांमध्ये सुधारणा: वन-टाइम पासवर्ड (ओटीपी)च्या माध्यमातून डिलिव्हरीची खात्रीशीर पडताळणी केली जाते. हे पाऊल खासकरून मौल्यवान किंवा संवेदनशील वस्तूंच्या वितरणासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

# गांवकरी लाईफ स्टाईल


नाशिक, शनिवार, दि. २६ एप्रिल २०२५





# वेळेचं महत्त्व

**गणेश खाडे**



वेळेचं महत्त्व समजल्याशिवाय जीवनातील वेळ बदलत नाही हे वास्तव समजून घेतलं पाहिजे तर जीवन हितं होईल. ज्या पद्धतीने ज्या कार्यासाठी आपण वेळेची गुंतवणूक करू, त्याच प्रमाणात भविष्यात त्याचे दुपटीने लाभ अथवा हानी स्वरूप परिणाम आपल्याला परत मिळतात. वेळेच्या गणिताचा आयुष्यावर प्रभाव निर्माण होतच असतो, तो प्रभाव आपल्याला समजला पाहिजे.वेळेचा दुरुपयोग हा आनंददायी वाटत असतो. दुरुपयोग करताना मज्जा येते, हसू येते. आपण बेभान होतो, पण त्याचे परिणाम मात्र घातक असतात. परिणाम आल्यावर दुःख अनावर होतं.विशेष म्हणजे, हे परिणाम अपरिवर्तनीय असतात. काळाचं उत्तम पीक ज्याला घेता आलं त्याचं आयुष्य बहरल्याशिवाय राहत नाही. वेळेचा दुरुपयोग करून आपलं आयुष्य आणि भविष्यात उद्ध्वस्त करून घेण्यामध्ये कोणतं शहाणपण आहे. म्हणून वेळेचा दुरुपयोग करण्यापेक्षा सदुपयोग करून स्वतःचं उज्ज्वल भविष्य घडवणं हे कधीही हितकारक ठरतं. वेळ ही पैसा तर नक्कीच नाही, पण पैशापेक्षा कमीही निश्चित नाही. आपला दिवसभरातील जास्तीत जास्त वेळ कार्यमग्न राहून वेळेचा सदुपयोग केला पाहिजे. पण आपण जास्तीत जास्त वेळ काहीच न करता निरर्थक बाबींवर आपला अमूल्य वेळ खर्च करतो हे वास्तव असून, हेच भयानक वास्तव घरोघरी, गल्लोगल्लीमध्ये, त्याचप्रमाणे सर्वदूर पसरल्याने त्याचे विपरीत परिणामदेखील अनुभवास येत आहेत. ही परिस्थिती बदलली पाहिजे. त्यासाठी अगोदर आपली मानसिकता बदलली पाहिजे. मानसिकता बदल्याशिवाय वेळेचं महत्त्व आपल्या गळी उतरणार नाही.घडी गेली तर पिढी जात असते तरीसुद्धा आपण दिवसभरातील कित्येक तास आणि आयुष्यातील कित्येक दिवस काही वर्षे हे निरर्थक घालवतो. ही बाब आपल्यासाठी, कुटुंबासाठी तसेच राष्ट्रासाठी खरंच घातक आहे. पण याची जाणीव सामाजिक पातळीवर, कौटुंबिक पातळीवर कोणालाही नाही. आपल्या जीवनशैलीमध्ये अनेक शोक (ज्याला आपण करमणुकीची साधनं संबोधतो) निर्माण झाले आहेत हे सगळे शोक पूर्ण करण्यासाठीच आपल्याला वेळ कमी पडतो. मग यामधून हितकारक काय घडेल याकडे वेळीच लक्ष देणं गरजेचं आहे. वेळेचं महत्त्व योग्य वेळी ज्याला समजलं त्यासाठी जीवन सुलभ होतं तर ज्याला योग्य वेळी वेळेचं महत्त्व पटत नाही, कळत नाही, उमजत नाही त्याचं जीवन उद्ध्वस्त झाल्याशिवाय राहत नाही. म्हणून वेळेच्या बाबतीत खूप जागरूक, दक्ष, सावध राहिलं पाहिजे. वेळ चुकली तर आयुष्य चुकतं. सृष्टीवर सगळं काही बदलता येतं, पण वेळ बदलता येत नाही. वेळेला खूप गंभीरतेने घेतलं गेलं पाहिजे. वेळ अमूल्य आहे, निर्णायक आहे. पण आपल्यासाठी वेळेचं महत्त्व शून्य आहे. ना महत्त्व, ना गांभीर्य काहीच नाही. वेळेचं नियोजन नसल्याने आयुष्य चौपट होत आहे, पण आपल्याला याची जाणीव होत नाही. हेच सगळ्यात मोठं आश्चर्य आहे.आयुष्य चौपट झाल्यावर मात्र आपण धावाधाव करतो, पण ही धावपळ निरर्थक ठरते.वेळेचं योग्य महत्त्व जाणलं गेलं पाहिजे.वेळेचं महत्त्व समजलं तर पश्चात्ताप करण्याची वेळ येत नाही. वेळ ही खूप निर्णायक आणि महत्त्वपूर्ण व मौल्यवान असते. कोणत्याही परिस्थितीत आपण वेळेचं मूल्यमापन करू शकत नाही.धन, द्रव्य, संपत्ती ही गेली तर परत मिळवता येईल, पण एकदा का आयुष्यातील वेळ निघून गेली तर पुन्हा ती वेळ परत मिळत नाही अथवा मिळवता येत नाही.

वेळेचं महत्त्व अनमोल असल्याने वेळीच सचेत व्हा. आपल्या आयुष्यात वाईट वेळ येऊ नये ही मानसिकता असेल तर वेळेचं महत्त्व जाणून घ्या. वेळेचं महत्त्व आपल्याला योग्य वेळी जाणता आलं तर अशी कोणतीही वाईट वेळ आपल्या आयुष्यात दाखल होणार नाही. प्रवेश करणार नाही.ज्यामुळे आपल्याला पश्चात्ताप होईल. गावोगावी, गल्लीगल्लीत कट्ट्यावर, तसंच टीव्हीसमोर, मोबाइलमध्ये, तसेच वेगवेगळ्या करमणुकीच्या साधनामध्ये व्यर्थ गप्पांमध्ये आपण किती वेळ वाया घालवतो आहेत याचा विचार आपण कधी करणार आहेत का? वेळेचं गणित हे जीवनातील अर्थकारणावर परिणाम तर टाकतोच, पण जीवनाची दशा आणि दिशा बदलतं, पण हे गणित आपण जाणून घेत नाहीत. त्यामध्ये आणखी भर पडत आहे ती मोबाइल आणि स्वस्त डेटा पॅक ज्यामुळे आपला दिवस कुठे जातोय याचा थांगपत्ता लागयला तयार नाही. आपण बेकार आहोत की, आपल्याकडं काही रोजगार आहे नाही याची जाणीव होईल एवढा विचार करण्यासाठीसुद्धा आपल्याकडं वेळ आज नाही. मग हीच परिस्थिती राहिली तर पुढे काय? मोबाइल अतिरिक्त वापराचा काही विशेष फायदा नसून, तोटेच जास्त आहेत. फलनिष्पत्तीमध्ये शारीरिक नुकसान, मानसिक नुकसान, त्याचबरोबर आर्थिक नुकसान आणि पदरी पडतो तो फक्त फुकटचा टाइमपास ठरतो. अयोग्य वेळी जाग येऊनसुद्धा काही उपयोग नाही म्हणून योग्य वेळी जागृत व्हा. वेळेचं महत्त्व ओळखून स्वतःला घडवा. वेळ हातातून निघून गेली तर पश्चात्तापाशिवाय काही हाती लागत नाही. म्हणून योग्य वेळी जागृत होऊन वेळेचं महत्त्व जाणून घ्या. वेळ व्यर्थ घालवू नका. वेळेची योग्य गुंतवणूक केली तर होणारा लाभ हा निश्चितच लाभदायक असतो.

## नरदेह निधान लागले हाती

**गिरीश उदास**
**९४२२७६३४१२**

अनेक जन्माची पुण्याई म्हणून हा नरदेह मनुष्याला लाभला. या मृत्युलोकात अनेक सजीव आहेत. त्यापैकी हा अमूल्य मनुष्य जन्म आपल्याला लाभला त्याचे कारण जाणून घेणे गरजेचे आहे. नरदेह लाभाचे महत्त्वाचे साध्य हे ईश्वराला जाणण्यासाठी आहे व त्यासाठी देहरूपी शरीर हे साधन कारण पृथ्वीवरील मनुष्य सोडून एकाही सजीवामध्ये ही क्षमता नाही.

**याच देही घडे देवाचे भजन ।**
**आणिक हे ज्ञान नाही कोठे ।।**

असे असूनही मनुष्याला आपल्या या महान कर्तव्याचा विसर पडून इतर सर्व क्षणिक सुख देणाऱ्या व नंतर अनंत दुःख देणाऱ्या अनेक गोष्टींमध्ये तो रमतो. मनाला येईल तसा वागतो. हा संसार परत थोडाच मिळणार आहे? या भावनेनी स्वैराचार करतो व या उन्मादात ईश्वराला जाणण्याचा, प्राप्त करण्याचा व त्यायोगे चिरंतर सुख भोगण्याच्या प्रयासापासून परांगमुख होतो व पर्यायाने अंती अनेक दुःख भोगतो.

हा देहरूपी घोडा भगवंतांनी आपल्याला उधार दिला आहे, परंतु त्याला आपले मनच पाहिजे तिकडे हाकीत आहे. विवेकाचा लगाम हाती ठेवल्यास हा देहरूपी घोडा ताब्यात राहील. साधुसंत आपल्याला जागे करतात. जो स्वतःचे हित साधतो तो साधू व असा साधू इतरांना मार्गदर्शक, वाटाड्या होऊ शकतो. ज्यांनी आपलंच हित साधलं नाही तो दुसऱ्याला काय मार्गदर्शन करणार?

जगतगुरू श्रीमंत तुकोबा म्हणतात :

**नरदेह निधान लागलें हातीं ।**
**उत्तम सार उत्तम गती ।**
**देवचि होईन म्हणती ते होती ।**
**तरि कां चित्तीं न धरावें ।।**

अशा या मौलिक आयष्याचे सार्थक करायचे असेल तर निष्काम भक्तिभावाने ईश्वराला शरण जा. त्याच्या नामचिंतनाचा मार्ग धरा. कारण ईश्वर मागणाऱ्याकडे लक्ष देत नाही, परंतु जो निरपेक्ष वृत्तीने भगवंताला चित्ती धरतो त्याला त्याचा साक्षात्कार होईलच. नव्हे नव्हे देवत्व ही प्राप्त होईल. हे संतवचन आहे. खरेच होणार....

मनुष्य स्वभाव म्हणजे दुःखात परमेश्वराचा आठव आणि सुखात विसर. तत्त्व हे आहे की परमेश्वराचे नामचिंतन हे आनंददायी असल्याने अत्यंत सुखात असताना ते घडावे. असे झाल्यास दुःखाची चिंता कशाला?

**दुख में सुमिरन सब करें**
**सुख में करे न कोय ।**
**जो सुख में सुमिरन करे**
**तो दुख काहे को होय ।।**
**सुख में सुमिरन ना किया**
**दुख में करता याद ।**
**कहे कबीर उस बंदे की**
**कौन सुने फ़रियाद ।।**

# वास्तुशास्त्र शाप की वरदान?



**वास्तुशास्त्र या विषयावर बोलताना आजपर्यंत आलेल्या अनुभवावरून नक्कीच मानवी जीवनात सकारात्मक परिवर्तन करण्यासाठी व मानवी जीवनाची प्रगती करण्यासाठी उपयुक्त असे शास्त्र आहे.**

**सारंग तरडे**
**वास्तुशास्त्रतज्ज्ञ**

हे शास्त्र लोकांनी शास्त्र म्हणून स्वीकार करावा. शास्त्र यासाठी म्हणतो की शास्त्रालाही मर्यादा असतात. जसे की वैद्यकीयशास्त्र.. वैद्यकीयशास्त्राला काही मर्यादा आहेत. शास्त्र म्हटले की, मर्यादा येतात आणि शास्त्राचा वापर करताना त्यासाठी हे नियम असतात ते नियम पाहिले गेले पाहिजे..नाही तर वास्तुशास्त्र केले आहे.

आपण कसेही वागायचे याला काही अर्थ नसतो. वास्तुशास्त्राचा उपयोग करून शास्त्रीयदृष्ट्या घराचे ज्या त्या तत्त्वात विभागणी करून योग्य तो फायदा त्या जातकाला मिळतो.

गैरसमज... वास्तुशास्त्र फक्त मोठ्या लोकांसाठीच आहे असा गैरसमज काही लोकांमध्ये आहे.. व यासाठी खूप प्रमाणात पैसे मोजावे लागतात असाही गैरसमज आहे.. परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो, अगदी दहा बाय दहा रूममध्ये राहणाऱ्या माणसासाठीही कमी खर्चात अगदी घरातल्या वस्तूंचा उपयोग करून वास्तुशास्त्र साधता येते व त्याचा फायदा घेता येतो.

काही अति बुद्धिवादी लोक याचा विरोध करताना दिसतात. परंतु, यातील काही लोक दिवसा विरोध करून रात्री ज्योतिष, वास्तू यांचा सल्ला घेतात. त्यामुळे माणसाने आपली स्वतःची प्रगती, अडचणी, या सगळ्यांचा अभ्यास करून आपल्या भारतीय वैदिक वास्तुशास्त्र याचा वापर आपल्या जीवनात करावा. शेवटी आपल्याला आपले एकच सांगतो..

किनाऱ्यावर उभे राहून, दगड मारणे सोपे असते, दुसऱ्याच्या दुःखाकडे, हो, का? म्हणून हसणे तर सोपेच असते.

यासाठी जातकाच्या..

दुःखात समरसून, त्याला उपाय देत, पाण्यात झोकून त्याला बाहेर काढणे खरे काम आहे.

खरे सांगतो त्यासाठी वास्तुशास्त्र हा एक मोठा आधार आहे....

## आजार पळवणारी फुले...

हृदयरोगासाठी सूर्यफुलाचे तेल चांगले असते. रक्तविकार, योनीशूल, यकृतरोग आणि फुफ्फुसांच्या विकारात सूर्यफुलांचा चांगला उपयोग होतो. जास्वंदाची फुले मलरोधक, केशवर्धक असतात. फुलांचा रस केसांना लावल्यास केसांचा पांढरेपणा कमी होतो. ही फुले तुपात तळून खाल्ली तर श्वेतप्रदर विकारात आराम होतो.

फेस्टिव्ह फॅशन

# बजेटमध्ये ब्रँडेड फील?

## हे शॉपिंग हॅक्स ट्राय कर!






**कॉलेजचं पहिलं वर्ष असो, ऑफिसचा पहिला वीक असो किंवा अचानक ठरलेली फ्रेंड्स पार्टी - लूक भारी असलाच पाहिजे, नाही का? पण दरवेळी ब्रँडेड शॉपिंगसाठी खिशाला परवडणं शक्य नसतं मग प्रश्न असा, बजेटमध्ये फॅशन कशी करू?**

**ज्योती हांडगे**
फॅशन डिझाइनर पुणे

उत्तर सोपंय : हॅक्स! हो, काही स्मार्ट शॉपिंग हॅक्स आणि थोडी स्टाईल सेंस असली की बजेटमध्ये ब्रँडेड फील सहज मिळू शकतो! चला तर मग, स्टायलिश आणि सेन्सिबल बनवणारे हे फॅशन हॅक्स उलगडूया - फक्त मैत्रीण स्टाइलमध्ये!

**१. ब्रँडेड दिसायचंय? मग 'फिट'ला प्राधान्य दे!**

सगळ्यात महत्त्वाचं - फिट म्हणजेच फिनिश! तू किती महाग ब्रँडचा टॉप घालतेयस हे कुणाला लक्षातही येत नाही, पण ते तुझ्यावर परफेक्ट बसतंय का? हे मात्र सगळे बघतात. कधी कधी साधी जीन्स आणि फिनिश्ड टॉप तुझा लूक ब्रँडेडहून भारी करू शकतो!

**२. थ्रिफ्टिंग = ट्रेंडी आणि स्टाईल!**

म्हटलं की 'थ्रिफ्ट स्टोअर्स' हे फक्त इंस्टाग्रामवरच नाही, आपल्या जवळच्याही मार्केटमध्ये असतात. दुसऱ्यांनी वापरलेले? - Nope! ते 'प्री-लव्हड' असतात!

**शॉपिंग टिप :** थ्रिफ्ट स्टोअर्समध्ये शांतपणे वेळ दे आणि ब्रँडेड टॅग असलेले पण हाफ प्राइसमध्ये मिळणारे खजिने शोध!

**३. जुनं-गुनं करा नवीन!**

आईचा जुना दुपट्टा, ताईचा ओव्हरसाइज शर्ट किंवा आपलाच विसरलेला स्कार्फ - थोडा क्रिएटिव टच दिलास की न्यू ट्रेंड तयार!

DIY मंत्र : एक ओव्हरसाइज शर्ट + बेल्ट = ड्रेस! स्वतःच्या हाताने तयार केलेली स्टाईल ही सर्वात खास असते आणि बजेटफ्रेंडली सुद्धा!

**४. ॲक्सेसरी म्हणजे 'लुकचा टर्निंग पॉइंट'**

कधी साधा व्हाइट टॉप असतो, पण त्यावर ऑक्सिडाइज्ड झुमके आणि बिंदी घातली की लोक विचारतात - कुठून घेतलंस?

हॅक : स्ट्रीट मार्केटमध्ये 3-for-100 मिळणारे नेकपीसेस, ब्रेसलेट्स आणि बॅग्ज हे ब्रँडेड फिलचं सीक्रेट वेपन आहेत!

**५. सेल म्हणजे शॉपिंगचा सण!**

ब्रँडेड शॉप्समध्ये सुद्धा End of Season Sale येतो आणि खऱ्या फॅशनिस्टा त्यावेळीच शिकार करतात!

टिप : Myntra, -jio, HM², Westside यांची सेल अलर्ट्स ऑन ठेव.

बजेटमध्ये ब्रँडेड स्वॅग यालाच म्हणतात!

**६. Mix it like Magic!**

एकच टॉप, वेगवेगळ्या बॉटम्ससोबत मिक्स कर- तुझं लूकबुक तयार होईल - तेही एका कपड्यातून चार वेगळे लूक!

Try this : त्या प्लेन टी-शर्टसोबत पलाझो, दुसऱ्या दिवशी डेनिम, तिसऱ्या दिवशी स्कर्ट आणि चौथ्या दिवशी दुपट्टा घालून इंडो-वेस्टर्न!

**७. स्टाइल म्हणजे फक्त कपडे नाही, ती ॲटिट्यूड असते!**

सगळ्यात शेवटी - तुझं हसणं, चालणं, स्वतःवरचा कॉन्फिडन्स आणि तुझ्या फॅशनमागची गोष्ट! जेव्हा तू एक सिंपल कुरती स्वतःच्या वॉक आणि स्माईलमुळे ग्रँड बनवतेस - तेव्हा कोणताही ब्रँड हरतो!

**फॅशन मंत्र :** तू जशी आहेस, तशीच कमाल आहेस! Let's Wrap It Stylishly! फॅशन ही स्पर्धा नाही - ती स्वतःशीच असते! कोण काय घालतंय यापेक्षा तू तुझ्या बजेटमध्ये किती हटके घालतेयस, हेच खरी गोष्ट आहे! तर या आठवड्यात, -TM² balance चेक न करता, ही हॅक्स वापर आणि तुझ्या लूकमध्ये भरभरून आत्मविश्वास भर! आणि हो - जेव्हा लोक विचारतील, कुठून घेतलंस? तेव्हा हसून सांग, माझं सिक्रेट आहे!

# उन्हाळ्यात घाला असे कपडे



**उन्हाळ्यात काय कपडे घालावे आणि काय घालू नये हेच कळत नाही. कपडे निवडताना काही गोष्टींचा विचार अगदी सावधपणे करायला हवा, जेणेकरून उन्हाच्या झळा लागणार नाहीत. आणि हे सगळं करताना आपण स्टायलिश कसे राहू हे सुद्धा तेवढंच महत्त्वाचं आहे.**



१: उन्हाळा असल्यामुळे तुम्ही कपडे निवडताना अतिशय सैल कपडे निवडा. जेवढं कमी फॅब्रिक तुमच्या अंगाला लागेल तेवढं कमी गरम होईल.

२.कमी गरम होण्यासाठी सुती कपड्यांचा वापर करा. अतिशय घट्ट, अंगाला चिटकणारे कपडे वापरू नका।

३. भडक रंगाचे कपडे घालू नका : या दिवसांत भडक रंगाचे कपडे अजिबात घालू नका. खास करून काळा रंग टाळा. लाईट एब्सोर्ब करणारे रंगाचे कपडे या दिवसांत वापरा.

४. जितका जास्त गडद रंगाचे कपडे तुम्ही घालाल तितके ऊन जास्त प्रमाणात लागेल.

५. उन्हाळ्यात तुम्ही कॉटनचा वापर जास्त करा. त्यांनी गरम कमी होईल आणि ऊनदेखील कमी लागेल.

६.उन्हाळ्यात तुम्ही हाफ कपड्यांपेक्षाही जर तुम्ही पातळ कपडे परिधान कराल तर तुम्हाला जास्त आरामदायी वाटेल.

# ऑफिसमध्ये परफेक्ट लूकसाठी हे ट्राय करा



**स्लीक चैन** - तुम्ही ऑफिसला जाताना स्लीक चैन पँटसूट आणि कॉटन कुर्ता सेटसोबत घालू शकता. ही चैन तुमच्या लुकला एकदम परफेक्ट बनवेन. त्यामुळे एकदा ही स्लीक चेन नक्की ट्राय करा.

**चंकी गोल्डन क्सेसरीज** - चंकी गोल्डन क्सेसरीज ही सध्या चांगलीच ट्रेंडमध्ये आहे. ब्लॅक को-ऑर्डर सेटसोबत हिरव्या रंगाचे जॅकेट परिधान करू शकता. त्यासोबत गोल्डन कानातले घालू शकता.

**हूप्स अँड रिंग्स** - हूप्स अँड रिंगसला महिला मोठ्या प्रमाणात पसंती दर्शवताना दिसत आहेत. फॉर्मल को-ऑर्ड्स आणि पँटसूट सोडून, तुम्ही एथनिक पोशाखांवरही अशा ॲक्सेसरीज ट्राय करू शकता.

**पर्ल ॲक्सेसरीज** - पर्ल ॲक्सेसरीज तुम्हाला क्लासी आणि हटके दिसायला मदत करतात. तसंच ड्रॉप इअररिंग्स व्यतिरिक्त, तुम्ही पेंडेंट देखील घालू शकता. या



ॲक्सेसरीजमुळे तुमचा लूक परफेक्ट दिसेल, त्यामुळे ही ॲक्सेसरीज नक्की ट्राय करा.